
वर्णमुद्रा

# वर्णमुद्रा

इ–जर्नल
(मुद्रितप्रत, केवळ
खासगी वितरणासाठी)

अंक सोळावा / मार्च–एप्रिल २०२४

किंमत : १५०/– देणगीमूल्य (मुद्रितप्रतीसाठी)



# अनुक्रमणिका


। मुखपृष्ठ ।

वसंत आबाजी डहाके

। सुरुवातीचे काही शब्द ।

मनोज सुरेंद्र पाठक

। कविता ।

प्राची आश्राजी सरवदे, रवींद्र इंगळे चावरेकर, संजीव खांडेकर

। स्मरणसूक्त ।

दिलीप चव्हाण

। चित्रे/रेखाचित्रे/छायाचित्रे ।

वसंत आबाजी डहाके

। कथा ।

अभिषेक वाघमारे

। लेख/ललित लेख/टिपण/मुलाखत ।

प्रभाकर बागले, सुरेंद्र दरेकर, दीपक बोरगावे, किरण शिवहर डोंगरदिवे,

शिरीष चिंधडे, पुरुषोत्तम देशमुख

शैलेंद्र मेहता यांची मुलाखत : अथर्व देशमुख

। गंभीर किंवा गमतीदार ।

विकास पालवे यांची फेसबुक पोस्ट



। संपादन साहाय्य ।

नंदिनी देशमुख, शरद बिन्नोर, अभिषेक वाघमारे

। निर्मिती साहाय्य ।

उमा नाबर, महेश गवाणकर, भाग्यश्री बनहट्टी

# सुरुवातीचे काही शब्द

दर अंकागणिक बागले सरांचा आनंद आणि काही प्रेमळ तक्रारी वाढत आहेत.

तक्रार अशी की, सुरुवातीचे दोन शब्द केवळ दोनच का? आतील मजकुराविषयी संपादकांना काय वाटते ते थोडक्यात मांडले पाहिजे. 'आणि त्यासह तुमची एखादी कवितासुद्धा असावी, म्हणजे आपसूकच आम्हांला तोसुद्धा लाभ!' हे जरा कठीणच आहे सर. कुछ तो लोग कहेंगे. क्या कहेंगे मालूम हैं? साला ये तो तुम्हारे खत में हमारा सलाम लिख रहा हैं ? तेव्हा तेवढं सोडून बाकीच्या आज्ञा मी पाळण्याचा प्रयत्न करतो. हं पण एक करता येईल, एखादी आवडलेली किंवा अनुवाद केलेली कविता सुरुवातीच्या दोन शब्दांसोबत पुरवणी म्हणून देता येईल.तसा प्रयत्न करतो.

आता उदाहरणार्थ ह्या अंकात काय आहे? एक तर तुमचेच डॉ. बाबासाहेबांना लिहिलेले कळकळीचे आणि कृतज्ञ पत्र आहे. त्यात तुम्ही जसिंता केरेकट्टी आणि राजू केंद्रेंविषयी बाबासाहेबांना अवगत केले आहे. अलीकडे फोफावत चाललेल्या जातीय अस्मितांचे काय करायचे, हे काळजीने तुम्ही त्यांच्या कानावर घालता आहात.

'स्मरणसूक्त' सदराकरिता मी आवर्जून दिलीप चव्हाणकडून आईविषयीचे टिपण मागवून घेतले आहे. ते 'मिळून साऱ्याजणी' आणि फेसबुकवर पूर्वी आलेच होते, परंतु वर्णमुद्राच्या पानांवर ते असणे मला महत्त्वाचे वाटले. दिलीपची आई, म्हणजे ही 'सुधामावशी' काय बाई असेल? दहावीत ज्या काळी इंग्रजी व गणितात हमखास गोता खाऊन लोक शिक्षणच सोडून देत त्याकाळी ही सुधामावशी शाळेत न जाता घरीच इंग्रजी शिकली आणि दहावीत उत्तम गुणांनी उत्तीर्णसुद्धा झाली. पुढे तिच्या ह्या कुवतीचे आपल्या सरंजामी व्यवस्थेने काय मातेरे केले ते मुळातूनच वाचा. ह्या काळातील सगळ्या स्त्रियांच्या नशिबात हेच असावे का अशी शंका येते, कारण की मनोज सुरेंद्र पाठक यांनी एका कवितेतून आपल्या आईविषयी अशीच एक आठवण मांडली होती – 'खोटं बोलणं' नावाची ती कविता आहे.

**'शिक्षिकेची नोकरी करणं, जी महत्त्वाकांक्षा होती तिची**
**तिला कधी पूर्ण होऊ दिलं नाही**
**आमच्या पूर्ण पुरुषोत्तम बापाने'**

ह्या त्या ओळी आहेत.

अंक काढणं, साहित्य मिळवणं ह्या प्रक्रियेत क्वचित अभावितपणे एखादा आनंदी क्षण उगवतो. सोलापूर जिल्ह्यातील कुण्या प्राची सरवदे ह्या मुलीच्या कविता काही ध्यानीमनी नसताना मेलवर मिळाल्या. ह्या अंकुरास नीट खतपाणी मिळाले तर भविष्यात हे झाड चांगलेच रुजेल अशी आशा आहे. इतर दोघे म्हणजे आपले रवींद्र इंगळे चावरेकर आणि संजीव खांडेकर तर तेल लावलेले पैलवानच. असा

कविता विभाग सुदृढ झाला आहे.

संपादक मंडळातील सदस्य अभिषेक वाघमारे यांची टर्मिनस ही कथा गूढातून एका तत्त्वज्ञानात्मक उंचीवर पोचते. जीएंच्या वळणाची ही भाषा केवळ बांडगूळ वाटत नाही तर त्या भूमीत रुजून उगवलेली वाटणे हे आनंददायी आहे.

वर्णमुद्राच्या प्रकाशित पुस्तकांची परीक्षणे/टिपणे ही केवळ त्यांची भलावण करणारी नसून त्यानिमित्ताने संपृक्त असे चिंतन रवींद्र दामोदर लाखे, किरण शिवहर डोंगरदिवे आणि शिरीष चिंधडे ह्यांनी केलेले आहे.मनोज सुरेंद्र पाठकच्या ‘ अधिसत्ता ’ संग्रहातील एका कवितेवर ज्येष्ठ लेखक शिरीष चिंधडे ह्यांनी लिहिले आहे.संपादक असल्याने मनोज सुरेंद्र पाठकच्या कवितेवरील टिपण कसे घेणार, हा प्रश्न उभा राहिला होता. शेवटी विचार केला की, ह्या निमित्ताने चिंधडे सर काही महत्त्वाचे सांगू पाहत आहेत, तेव्हा एवढे पाप क्षम्य ठरेल. एरवीही आपण ‘ आपला विकास आपल्याच हाती ’ योजनेचे समर्थक असतोच असतो.

‘तत्त्वभान’ ह्या पुस्तकाविषयीची सर्वंकष चर्चा सुरूच राहणार अशी चिन्हे आहेत. सुरेंद्र दरेकर आणि दीपक बोरगावे ह्यांनी फेसबुकवर दिलेल्या दीर्घ प्रतिक्रिया प्रकाशित केल्या आहेत, शिवाय दरेकरांची ती दहा टिपणे ह्या अंकापासून क्रमशः देत आहोत.

डहाके सरांच्या चार ओळीसुद्धा हुरूप वाढविणाऱ्या असतात. ह्या अंकात तर त्यांची अलीकडे काढलेली रेखाटने आणि मुखपृष्ठसुद्धा आहे. इथे जैनने सनातन प्रश्न विचारला तर त्यात काही वावगे ठरणार नाही.मुखपृष्ठ आणि रेखाटने डहाके सरांची असणे हे अंकासाठी एक मूल्य ठरावे.

फेसबुक पोस्ट्स जरी मी ‘गंभीर किंवा गमतीदार’ सदराखाली टाकत असतो, तरी गमतीआडचे गांभीर्य आणि गांभीर्यातील गंमत लक्षात यावी असा तो प्रयत्न असतो. ह्या अंकात विकास पालवे यांनी ‘मनसमझावन’ ह्या कादंबरीवर लिहिलेली पोस्ट आहे. पालवेंनी वर्तमान काळातील जाती धर्म पंथातील रुंदावत चाललेल्या दरीविषयी लक्ष वेधले असून, ‘मनसमझावन’चे समकालीनत्व कसे महत्त्वाचे आहे ते अधोरेखित केले आहे.

काही नवीन नावे सोडली तर बव्हंशी अंकात घरचीच मंडळी जास्त आहे. आणि गणगोत जसजसे विस्तारत जाते आहे, तसतशी ह्या मंडळींची संख्या वाढतच राहणार आहे.

एकूण वाटचाल आनंदाची आहे. ह्यात सहभागी व्हा आणि ह्या आनंदाला शतगुणित करत चला.

जैनला अजून काय हवे ?

**मनोज सुरेंद्र पाठक**



## प्राची आश्राजी सरवदे

### १) खिडकी

मी सहज खिडकी उघडली अन्
मंद हवा मनात शिरली अगदी जसा
मनाचा हळवा कोपरा उघडावा अन्
साऱ्या आठवणींचा सुगंध दरवळावा तशी
कुठले तरी स्वतःचे स्वप्न, अपेक्षा,
जबाबदाऱ्या, कर्तव्ये
सारं सारं उराशी बांधून नव्या जगात येणाऱ्या
कित्येक नशिबाच्या स्पर्धकांपैकी मी एक
भाषेपासून भावनांपर्यंतचा साराच बदल
गावाकडची मैत्री इथं आली की
फक्त फॉर्मलिटी होते
रुढीच्या सवयी शहरातल्या हॅबिटशी
जुळवताना केलेली तडजोड
आणि या जगात स्वतःला बदलण्याची
केलेली हळवी धडपड
सारं- सारं त्या खिडकीतून पाहताना
त्या वेदनांचा वन्स मोअर होतो
रोजच्या धावपळीत जगण्यात सारं शहर व्यस्त
मी मात्र उभीच त्या खिडकीशी वेळेसोबत
रेंगाळत
अचानक बाहेर भविष्य दिसतं
समोर स्वप्नाची सत्यता किंवा भविष्याच्या
वेधात हरून-हरवून गेलेला चेहरा
नैराश्य, दुःख, एकटेपणा डोळ्यांतून
घळकन् खाली पडतात
पण
त्या साऱ्यांचे चेहरे आठवतात
ज्यांनी किती कष्टाने सारी जिंदगी विकून
भरल्या डोळ्यांनी गावातून माझी पाठवणी केली
ती खिडकी
सारखी आठवण करून देते
गावाकडची हवा, भावनांचा बगीचा,
माझं मायेने गच्च भरलेलं अंगण, आणि
माझं स्वप्नसुद्धा यांची
म्हणून बंद करते मी ती खिडकी दृढपणे
माझ्या मनासारखंच माझं पाऊलही माझ्या
अंगणाकडे वळेल या भीतीने
अन्
सारी ध्येयाची साधनं हाती घेते
खिडकी बंद करून
ᛩ

### २) पत्रास कारण की

नव्या शहरात राहून
नव्या माणसांना जाणून
जुन्या भावनांना नव्या
शब्दांत मांडण्यासाठी
कोऱ्या पानांवर अश्रू गाळणे आहे...

काहीतरी गमावून
एकांताला समजावून
आठवांना आठवत
काहीतरी मिळवण्यासाठी
कोऱ्या पानांवर भविष्य आखणे आहे...

ध्येयाकडे धावताना
घाव सारे सोसताना
परक्या भिंतींत राहताना
आई-बापाची मान उंचावण्यासाठी
कोऱ्या पानांवर हिशोब सारा मांडणे आहे...

शब्दात घाव मांडते
घावात सुख शोधते
सुखात घर पाहते
अल्लड मनाची समजूत काढण्यासाठी
भरलेल्या पत्रास माझ्याच पत्त्यावर पाठवून देते.

## रवींद्र इंगळे चावरेकर



### १) जे पडत नाहीत अरण्यातून बाहेर.

रानात जागोजाग पेटलेल्या
वणव्याच्या ज्वाळांना
पळसफुलांची बाग समजून
जे पडत नाहीत अरण्यातून बाहेर
वणव्याच्या धुराला समजतात
दाटून आलेले मेघ
ते नसतात तुझे अनुयायी.

तुझे अनुयायी भागवत नाहीत
स्वप्नातील पाण्याने तहान
ते तहानेसाठी खोदतात
स्वतःच स्वतःचा झरा
गाळ खाली बसून
पाणी स्वच्छ होण्याची
पाहतात वाट.

वाटतात स्वच्छ पाणी
ओंजळी ओंजळीने भरभरून
येत्या-जात्या पांथस्थाला.
काठावर रुजवून
एक पिंपळाचे बी
वाढत्या खोडासह
होत जातात कृश.

तेव्हा, महापरिनिर्वाणाच्या दिवशी
ओठावर हसू असते त्यांच्या.

## २) रात्री अपरात्री

घरात केला प्रवेश
मी घेतो एक दीर्घ श्वास
स्वीच ऑन करण्यापूर्वी.
कोणतेही झुरळ
ठेवू शकते कुरतडून
माझ्या किचनमधली
गॅसनळी.

जीवघेण्या शत्रूंना
राहू देणे किचनमधे
अगतिकता असते माझी.

काही छिद्रं घराची तर
कधीच बंद करता येत नाहीत मला
अपरिहार्य असते त्यांचे अस्तित्व
माहीत असूनही
थंड जागेचे असते आकर्षण
विषारी सर्पांना.

स्वीच ऑन केल्यावर
मी तपासून घेतो.
मोरी आणि देवघर.

टी.व्ही.ऑन करून पहुडतो
दिवाणावर, आणि पाहतो
पुलवामाची बातमी
हळहळ आणि अस्वस्थता
साहजिक प्रतिक्रिया असते माझी
इच्छा असूनही
करता येत नाही मला
टी.व्ही.बंद.
एका जाहिरातीनंतर

सुरू होतो तेथेच
आधुनिक महाभारताचा एपिसोड
ज्यात मीही असतो
एक महत्त्वपूर्ण पात्र.

दिलेले असतात माझ्या हाती
रथाच्या अश्वांचे लगाम
आणि बसविलेले असते
कृष्णाच्या जागेवर
सारथी बनवून.

परंतु काढून घेतलेला असतो
अर्जुनाने माझ्याकडून
उपदेशाचा हक्क.
तो गांडीव सावरून असतो उभा
युद्धाच्या जय्यत तयारीत

धर्मराजाचा लावून मुखवटा
तो खुलेआम म्हणतो
‘नरो वा कुंजरो वा’
आणि विकासाची चाके
स्पर्श करू लागतात जमिनीला.
शिखंडीला करायला लावतो नेतृत्व
आणि बेचिराख होतात भीष्माचार्य.
दुर्योधनाच्या मांड्या फोडताना
पाळत नाही कोणतेच युद्ध नियम.
आणि कर्णाचे फसलेले चाक तर
त्याचा सुवर्णदात उपटून घेण्याची
दैवी संधीच वाटते त्याला.

या एपिसोडने
मीही भरून येतो
युद्धज्वराने
टी.व्ही.बाहेर
मला दिसत नाहीत


पुलवामाच्या कोणत्याच
कमजोर कड्या

मी अंथरतो
मनातल्या मनात
अर्जुनासाठी
कमलदलाच्या पाकळ्या

दिल्लीपर्यंतच्या राजरस्त्यावर

तेव्हा मीच माझ्या किचनमधील
गॅसनळी कुरतडणारे झुरळ होतो
हे कळतही नाही मला.
ꢃ

## संजीव खांडेकर




### अवकाळ

माझा जन्म झाला, आणि
अर्धा एक तास झाला असावा.
मला थोडी थोडी जाग येऊ लागली.
आपण जवळपास
अर्ध्या तासाने म्हातारे झालो आहोत
या जाणिवेने मी हातपाय हलवू लागलो.
म्हातारपणात सांधे दुखतात
गुडघे दुखू लागतात
म्हणून
थोडा व्यायाम करावा असे सांगतात;
म्हणून हात पाय हलवले.
तर
भोवती जमलेल्या सगळ्या
आया-बायांनी टाळ्या वाजवल्या.
डॉक्टर मावशी पापा घेत म्हणाली,
बघा बघा, आताची मुलं
किती लवकर मान धरतात,- आमच्यावेळी
महिना दोन महिने लागायचे.
म्हणाली, बघा बघा, कसा हसतोय गुलाम
आमच्यावेळी हसायला
चांगले दोन महिने लागायचे
हे ऐकून मी चांगलाच बावरलो.
आपली पिढी फारच लवकर मोठी होते आहे
म्हातारी होते आहे;
याचे मला जाम टेन्शन येऊ लागले.
‘चिंगी महिन्याची झाली नाही तोच..’
सरी, बिंदल्या, वाळे, साखळ्या खणकत, ताशे, वाजंत्री, बेंडबाज्या वाजवत आणि नळे चंद्रज्योती पाजळत;
ढुंगण हलवत,- साला रांगायलाही लागणार

या कल्पनेने माझे हृदय धपापू लागले.
रागही आला.
म्हणून मी जगावर नेम धरून मुतलो!
पण कसचे काय
जग तर सोडाच,
पण साधे दुपटेही ओले झाले नाही.
डायपर गुंडाळल्याने,–
मुतायची
(स्व: प्राणाने) उंच तुतारी फुंकायचीही सोय नव्हती
साधी मस्त मुतायची इच्छाही मरून गेली.
'मीच्युरेट (micturate) सिंड्रोम!'
फ्रॉइड म्हणाला असता.
'संस्कृतीची हीच ती सुरुवात!'
म्हणाला असता.
माझा डायपर मानव्याचा जरीपटका झाला असता
मूत्रविसर्जन कदाचित मग
पंचकर्माचाही भाग झाला असता.असो.
तसेच
मुती करण्याची वाढलेली
व वारंवार छळणारी इच्छा
म्हणजे
आपले प्रोस्टेट वाढले की काय अशीही शंका
मला जन्मतःच आल्याने
आपले वय वाढते आहे याची जाणीव तीव्र झाली
स्वाभाविकच आपली पिढी फारच लवकर
म्हातारी होऊ लागल्याने,
जे विशीत व्हायचे ते दहाव्या वर्षी;
तिशीत होणार ते विशीत,
चाळीशीत व्हायचे ते तिशीत, तर
पन्नाशीतले चाळीशीत
व,
साठीचे पन्नाशीतच, अशा क्रमाने झाल्याने
मला दहाव्या बाराव्या किंवा
सातव्या आठव्या वर्षांतच मूल होऊन,
मी विशीतच नातू व तिशीत पणतू पाहणार
याचा आनंद आणि दुःख दोन्ही दाटून आले.
त्यावर उपाय म्हणून आपण आपल्या आधीच्या पिढीतील स्त्रीबरोबर संसार थाटावा म्हणजे
निदान ती आपल्यासारखी
लवकर म्हातारी होणार नाही, व
आपल्याला तरणीताठी सोबतीला मिळेल अशी
आयडिया पाळण्यातच तरळून गेली.
सुंदर खाशी सुबक ठेंगणी,
वय चवदाची.... ओठ पोवळी, हनु चिंचोळी,
लाली गुलाबी गालांवरची
अशी नाट्यगीते पाळण्याची दोरी हलवीत कोणी
ऐकवावीत असेही वाटून गेले.
पण नवा 'शारदा कायदा' तर येणार नाही ना
अशी धास्तीही वाटली.
भरीस भर म्हणून आमच्या काळात जन्मलेल्यांना
शंभर सव्वाशेपर्यंत मरण निश्चितच नसल्याने
आपले जग म्हाताऱ्यांचेच
याची खंत वाटू लागली.
अंगभर दात–ओठ फुटून जागोजाग
ते खावेत असेही वाटून गेले
पण त्यामुळे आपण नुस्तेच
दात आणि ओठ आहोत की काय
असेही वाटले.
वाढणाऱ्या वयाच्या वेगाची भीती वाटू लागली.
वेग वाढला की अवकाश अरुंद होते काय?
अरुंद अवकाशात उडणे असह्य होते काय?
त्या अवकाशाचा ठिपका
म्हणजे मी, किंवा माझा जन्म;
म्हणजे कोणा कृष्णविवराच्या
दातेरी कुंपणावरचा
(त्याच्या) लाळेचा बुडबुडा असेल काय ?
अवकाश संपत आलेला
मिणमिणता साबण फुगा ?!
उलगडणारी समोर आमची बाळंतीण विश्वे

म्हणजे
साबण फुग्यांची खेळकर वलये असतील काय?
साबणफुग्यातील इंद्रधनूची ओलसर जीभ,
आणि तिच्यावर तोललेले खुळखुळ्याचे निमिष,
पायांनी फुग्यासारखे उडवीत
जेव्हा मला पाळण्यात जाग आली;
आणि ट्यँहा करायला मी आ वासला,

तेव्हा
आणि आत्तासुद्धा,
हे रंगीत निपल –
माझ्या ओठात कोंबणाऱ्या
मातेला वा मावशीला,
मला फुटलेल्या, फुटून पांढऱ्या झालेल्या,
माझ्या
दाढी मिश्या दिसल्या असतील काय ?





# आईची शाळा

## दिलीप चव्हाण



वडील वारल्यानंतर आईला माहेरी निमंत्रित करण्यात आलेलं होतं. नवरा मेला की बाईला आधी माहेरी बोलावले जाते. एकदा माहेराला जाऊन आल्यानंतरच ती इतर कुठल्या ठिकाणी जाण्यासाठी मोकळी होते. माहेराशी जुळलेल्या अशाच प्रतीकात्मक प्रथांच्या माध्यमातून स्त्रियांना माहेराचा जो कोपरा उपलब्ध होतो त्यावरच त्या आयुष्यभर सासरच्या यातना सहन करीत राहतात. नवरा मेल्यानंतर तिचे सांत्वन करण्याचा पहिला हक्क तिला नवऱ्याच्या घरी पाठविणाऱ्या माहेरच्या लोकांचा! केवढा हा दैवदुर्विलास!

तर, अशा या रिवाजाला धरून मामाने आईला माहेरचा निरोप पाठविला होता. म्हणून आईला नांदेडला आणण्यापूर्वी मी तिला तिच्या माहेरी घेऊन जायला निघालो होतो.

तरुणपणी माहेरच्या आठवणींनी रात्री ओल्या करणाऱ्या स्त्रियांच्या आयुष्यातून त्यांचे वय जसजसे वाढत जाते तसतसे माहेर तुटत जाते. त्या जेव्हा वृद्ध होतात, तोपर्यंत त्यांचे माहेर जवळपास पूर्णपणे तुटलेले असते. त्यांचे आई-वडील, इतर थोरले नातेवाईक हे जग सोडून गेलेले असतात. नवी पिढी त्यांना फारशी ओळखेनाशी झालेली असते. भाऊदेखील कधीकधी परक्यासारखे वागायला लागतात.

अशा 'विधवा' स्त्रीची माहेरभेट कधीकधी केवळ एक सोपस्कार म्हणून घडविली जाते.

स्त्रियांना मालमत्तेत वारसा हक्क असूनही 'माहेरच्या साडी'साठी बहुतेक स्त्रियांनी त्या हक्कावर पाणी सोडलेले असते. वृद्धापकाळी त्या जेव्हा अशा घरात प्रवेशतात, तेव्हा बालपणीच्या बऱ्यावाईट आठवणींपलीकडे त्यांची साथ देणारं खरं तर दुसरं तिथं फारसं कुणीच नसतं! भावनांचा कोण कल्लोळ दाटत असेल त्यांच्या मनात हे कल्पनेच्या कितीही गगनभराऱ्या घेतल्या तरी मला आकळू शकत नाही.

मलकापूरहून आईच्या माहेराकडे जाताना रस्त्यात खामगाव हे गाव होते. खामगाव हे बुलढाणा जिल्ह्यातील सर्वांत मोठे आणि एकमेव औद्योगिक चेहरा असलेले शहर! लॉकडाऊन असल्याने रस्ते जवळपास निर्मनुष्य होते. कार भरधाव वेगाने मार्गक्रमण करीत होती. मला हे गाव फारसे परिचित नसले तरी या गावाच्या एकंदर आधुनिक बाजामुळे लहानपणापासून हे माझे एक आवडते गाव होते. या गावाविषयी एक अनामिक आकर्षण माझ्या मनात असे! जसजशी कार खामगावमधून धाचू लागली तसतशी आई अधिक व्याकूळ झाली. मला रस्ता माहीत नसल्यामुळे तीच मार्गदात्री होती. यापूर्वी जवळपास अठ्ठावन्न वर्षे ती याच शहरातून माहेरी गेलेली होती. अंजुमन हायस्कूल म्हणजे तिचे दहावीच्या परीक्षेचे केंद्र! या हायस्कूलसमोरून कार जाणार हे तिला माहिती होतं! त्याआधीच तिच्या मनात आठवणी दाटून येत होत्या.

या गावात तिने १९६०-मध्ये एक महिना राहून मॅट्रिकची परीक्षा दिली होती. तिचे माहेर खामगावपासून ५० किलोमीटर अंतरावर. त्याकाळी खेडोपाडी दहावीपर्यंत शाळा नसायच्या. अकोट हे तालुक्याचे गाव तिच्या गावापासून केवळ आठ किलोमीटर अंतरावर! आज या गावात अनेक महाविद्यालये आहेत; परंतु साठ वर्षांपूर्वी या भागातून दहावीची परीक्षा देण्यासाठी थेट खामगाव गाठावे लागे.

आईचा जन्म एका सामंतशाहीचे अवशेष असलेल्या कुटुंबात झाला. ते अगदी सामंती कुटुंब नसले; तरी वाडा आणि जमीनजुमला हे कोणे एके काळी सामंती असल्याची आठवण करून देत होते. सामंतशाहीच्या काहीतरी अवशेषरूपी खाणाखुणा अशा कुटुंबांमधूनही दीर्घकाळ दिसून येत असत. किमान गतकालीन वैभवाच्या खऱ्याखोट्या आठवणींत रमणे, हे असेच!

आईच्या आईचे नाव शकुंतला. आजीने आईचे नाव 'सुधा' असे ठेवले होते. पण नाव सुधा ठेवले म्हणजे आयुष्य मधुर होतेच, असे नाही. आजी चौथीपर्यंत शिकलेली होती. त्याकाळी चौथीपर्यंत शिकलेल्या बाईस शिक्षिकेची नोकरी मिळत असे. पण देशमुख स्त्रीने नोकरी करू नये, या सामंती रूढीमुळे तिचे शिक्षण एका अर्थाने 'वाया' गेले.

आईचे वडील हे सरळमार्गी, देवभोळे आणि पुरोगामी विचारांचे. त्यांना कम्युनिस्ट विचारप्रणालीचे आकर्षण होते. लोकशाही मार्गाने जेव्हा जगात पहिल्यांदा केरळचे सरकार हे कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली निर्माण झाले तेव्हा सर्व कार्यकर्ते-आमदार हे सायकलवरून विधानभवनात गेले होते, याचे त्यांना फारच कौतुक असे. त्यांच्याकडे मास्कोहून सोव्हियत संघ हे नियतकालिक यायचे. आम्ही लहान असताना या नियतकालिकाकडे फार विस्मयाने बघत असायचो. त्यातील मजकूर कळायचा काही नाही; परंतु त्यांची गुळगुळीत रंगीत पाने ही माझ्या वह्या-पुस्तकांची कव्हर्स व्हायची आणि मग वर्षभर मग त्या पानांचे वाचन!

थोडक्यात, आजोबा हे पुरोगामी विचारांचे होते. आपल्या मुलीला शिकविले पाहिजे हा विचार कदाचित अशाच कम्युनिस्ट प्रभावातून त्यांच्यापर्यंत पोचला असेल. सोव्हियत संघच्या अंकात

रुबाबदार, सुशिक्षित स्त्रियांची छायाचित्रे छापून येत असत. त्याचाही एक प्रभाव असेलच! माझी आई, म्हणजे आजी–आजोबांची सर्वांत थोरली मुलगी! ती गावातल्या शाळेत शिकली खरी; परंतु, त्या गावात सातवीपर्यंतच शाळा होती. पुढे शिकण्यासाठी शाळा नसल्याने शिक्षणात खंड पडत असे आणि गॅप घेऊन दहावीच्या परीक्षेसाठी दुसऱ्या गावात जावे लागे.

आई लहानपणापासून एक चुणचुणीत मुलगी होती. भारत स्वतंत्र झाला, तेव्हा ती केवळ चार वर्षांची होती. गावातून निघालेल्या मिरवणुकीत ती आजोबांच्या खांद्यावर बसून सहभागी झाली होती. तिला तो दिवस आणि मिरवणूक आजही पंच्याहत्तर वर्षांनंतरही लख्खपणे आठवते.

सातवीपर्यंत शालेय शिक्षण झाल्यानंतर पुढील शिक्षण पूर्ण करण्याची तिची दुर्दम्य इच्छाशक्ती होतीच. मग तिने महत्प्रयासाने दहावीचा फॉर्म भरला आणि खामगावमधील अंजुमन हायस्कूल हे तिला परीक्षेचे केंद्र म्हणून मिळाले.

परीक्षा देण्यासाठी खामगावसारख्या गावात जाणे हे त्याकाळी फारच दुष्कर होते. शेवटी आजोबा आणि आई एक महिन्याच्या तयारीने खामगावात पोचले. त्यांनी शाळेजवळच एक खोली भाड्याने घेतली. त्या खोलीत रात्री कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास करायचा आणि परीक्षा द्यायची असा हा दिनक्रम सुरू राहिला.

तिला पुस्तकंही पुरेशी मिळाली नव्हती. त्याकाळी मॅट्रिकची परीक्षा ही मोठी परीक्षा समजली जाई. त्यासाठी आवश्यक ती पुस्तकं जिल्ह्याच्या ठिकाणी – म्हणजे अकोला इथे – मिळत. तिला आवश्यक ती सर्व पुस्तकं शेवटपर्यंत मिळालीच नाहीत. जे काही मिळालं होतं, त्याआधारेच तयारी करण्यावाचून प्रत्यवाय नव्हता. आजोबा कुठल्यातरी खाणावळीतून डबा आणीत. आजोबा एकच वेळ जेवीत आणि आईचं लक्ष सारं परीक्षेकडे! त्यामुळे एकच डबा त्या दोघांना पुरत असे.

अंजुमन हायस्कूल हा अजूनही एक अतिशय रम्य परिसर आहे. ब्रिटिश काळामध्ये बांधलेली ही इमारत निजाम आणि गॉथिक शैलीचा एक सुंदर मिलाफ वाटतो. इतक्या दशकांनंतरही या इमारतीचं थोडंसही विद्रूपीकरण झालेलं नाही. रचना, रंग, आकार, मूळची शैली...सर्व काही जसेच्या तसे. त्यात कुठले अल्टरेशन नाही, कुठल्या आधुनिकीकरणाच्या गचाळ खुणा नाहीत. म्हणजे, कुठे इकडेतिकडे इलेक्ट्रिक वायर वगैरे लोंबकळत नाहीयेत.

मुख्य दरवाजापासून शाळेची इमारत काहीशा अंतरावर आहे. आईसाठी हे अंतर कमी नव्हते. साठ वर्षांपूर्वी परीक्षेला उशीर होऊ नये म्हणून कदाचित ती या भव्य दरवाजापासून धावत तिच्या बेंचपर्यंत गेली असेल....आता मात्र ती माझ्या हाताला धरून हळूहळू एकेक पाऊल पुढे टाकत होती.

सुरुवातीला त्या शाळेत जाण्यात बरीच अनुत्सुक असलेली ती शाळेत गेल्यावर मात्र बरीच सुखावली. गतस्मृती एकदम जाग्या झाल्या. तिने या केंद्रावर मॅट्रिकची परीक्षा देऊन आता तब्बल साठ वर्षे झालेली होती. आपल्या पूर्वायुष्यातील एका अतिमहत्त्वाच्या ठिकाणी पुन्हा साठ वर्षांनंतर पोचणे, असा अनुभव अगदीच विरळा! त्यासाठी पहिल्यांदा किमान ७०–८० वर्षे नीट जगावे लागेल. स्मृती शाबूत ठेवावी लागेल. मुख्य म्हणजे जगण्यावर प्रेम करावं लागेल....जगण्यात कितीही प्रतिकूलता असली तरी!

आईला हळूहळू सर्व आठवायला लागले. तिचा तो परीक्षेचा वर्ग, कुणीतरी चितळे सर, त्यांनी उंच अशा टेबलावर उभे राहून दिलेल्या विविध सूचना, तिचा बेंच, तिची उत्तरं लिहिण्याची शैली वगैरे वगैरे. शेवटी, परीक्षा संपवून महिनाभराने बापलेक परत गावी गेले.

त्याकाळी मॅट्रिकच्या परीक्षेला विशेष असे महत्त्व होते. परीक्षा अतिशय गांभीर्याने घेतली आणि दिली जायची. आजच्यासारखे पुस्तकांचे ढीग घरात नसायचे, पाठ्यपुस्तकांवरील गाईड, शब्दकोश असं सारंच दुर्लभ! घरात वर्तमानपत्रदेखील येत नसे. लोक टेलिफोन केवळ चित्रपटांमध्ये बघत असत. तिच्या माहेरात अर्थात सिनेमादेखील टूरिंग टॉकीजच्या माध्यमातून पुरुषांनाच केवळ उपलब्ध असे. असो!

तर, मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होणे, हे एक दिव्यच होते. ही परीक्षा उत्तीर्ण होणे म्हणजे बंगालची खाडी पोहून जाण्यासारखे आहे, असे ब्रिटिश काळात म्हटले जायचे. स्वातंत्र्योत्तर काळातही या परीक्षेची काठिण्यपातळी काही कमी करण्यात आलेली नव्हती. काही महिन्यांनी आईच्या परीक्षेचा निकाल लागला आणि ती पहिल्या श्रेणीत परीक्षा उत्तीर्ण झाली. विशेष म्हणजे कोणत्याही अध्यापनाशिवाय तिला इंग्रजीमध्ये चाळीसपैकी बत्तीस गुण मिळाले होते.

भारतात भाषेशी लिंगभाव जुळलेला आहेच. स्त्रियांना इंग्रजी शिकवू नये, असा युक्तिवाद वासाहतिक काळात करण्यात आलेला होता. स्त्रिया मात्र अंधारात चाचपडत शालेय इंग्रजीच्या माध्यमातून जे इवलेतिवले आधुनिकतेचे कवडसे येत असत त्याच्या दिशेने मार्गक्रमण करीत होत्या. दहावीपर्यंत इंग्रजी शिकलेल्या आईने मला माझ्या दहावीपर्यंत इंग्रजी शिकविले. पुढे चालून मी इंग्रजीत एम.ए., पीएच्. डी. वगैरे केलं खरं! पण मला असं सतत वाटतं राहतं की, मी जे काही इंग्रजी शिकलो ते महाराष्ट्राच्या सीमेवरील एका मध्यम आकाराच्या गावातील एका मराठी माध्यमाच्या शाळेत आणि अर्थात आईकडूनही! आज एम.ए. इंग्रजीचा अभ्यासक्रम पूर्ण करून आणि आणि नंतर प्राध्यापक होऊनही या नव्या पिढीचे इंग्रजीचे 'दिव्य' ज्ञान बघून मागच्या पिढीने साधनं नसताना इंग्रजीसारखी दूरस्थ भाषा कशी शिकली असेल, याचे आश्चर्य वाटत राहतेच! आई कधी माझ्याशी इंग्रजीत बोलली नाही; पण माझा एक दाक्षिणात्य ख्रिस्ती मित्र जेव्हा अहमदनगरला घरी येत असे तेव्हा आईचे त्याच्याशी इंग्रजीत संभाषण करण्याचे धाडस आणि जिद्द बघून मी स्तिमित व्हायचो.

पुढे पुस्तकं आणि इतर साधनांच्या अभावात तिने अकोल्याला जाऊन प्री-डिग्रीची परीक्षा दिली. तिथेही असाच अनुभव. रेल्वे स्टेशनजवळील कुठल्यातरी माधवाश्रम हॉटेलमध्ये राहून तिने परीक्षा दिली; पण ती प्री-डिग्रीची परीक्षा उत्तीर्ण होऊ शकली नाही. काही विषयांची पुस्तकं तिला शेवटपर्यंत उपलब्ध होऊ शकली नाहीत. पुस्तकं नाहीत म्हणून ती रात्ररात्र रडत असे. पण अशा लाखो स्त्रियांचं रडणं हे काळोख्या रात्रींनी गिळंकृत केलेले असायचे. सामंतशाहीतील रात्री स्त्रियांच्या किंकाळ्यांवरच पोसल्या जायच्या जणू काही!

पुढच्या परीक्षेतील हे अपयश आणि त्या काळात समजले जाणारे वाढते वय लक्षात घेऊन तिचे लग्न अठराव्या वर्षी करून देण्यात आले. ज्या घरात तिचा नववधू म्हणून प्रवेश झाला ते एक अजूनही फारसे न ढासळलेले सामंती कुटुंब होते.

आता अगदी पारंपरिक कुटुंबांमध्येदेखील शिक्षित मुलींना सून म्हणून मागणी असली तरी त्या काळात शिक्षित सुनेकडे काहीशा संशयाने बघितले जात असे. या सासरकडच्या कुटुंबाची तीच अवस्था होती. निरक्षर सासू आणि अत्यल्पसाक्षर जेठाण्या! अशा कुटुंबातही त्या काळात एक शिकलेली सून - म्हणजे मॅट्रिक झालेली - ही अनफिटच होती. अशावेळी, तिचे शिक्षण हे तिच्या द्वेषाचे कारण ठरले.

पुढे शिकण्याची इच्छा तिने सासरच्या लोकांकडे बोलून दाखविली; पण सहा फूट जाड भिंती

असलेल्या त्या हवेलीत तिची ही आर्त हाक ऐकण्यासाठी कुणाकडे संवेदनशील कान होते? दिवसभर मी माझी सगळी कामं करेन आणि रात्री अभ्यास करेन, अशा शब्दांत तिने कुटुंबीयांपुढे तिची व्यथा मांडली. पण तिचं ऐकणार कोण होतं?

इतर लोक ऐकत नाहीत म्हणून तिने नवऱ्याकडे मोर्चा वळविला आणि आर्जव केले. पण नवरा म्हणाला, तुला शिकून कुठे नोकरी करायची आहे? आईला नोकरी करायची आहे की नाही, हे तिला विचारण्यात आलेले नव्हतेच! तिला नोकरी करायची नाही, हे गृहीत धरून तिला पुढे शिकू न देण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय जेव्हा वडिलांनी तिला सांगितला, तेव्हा माहेराहून आणलेल्या पेटीत जपून ठेवलेली मॅट्रिकची ती प्रथम श्रेणी मिळविलेली गुणपत्रिका ती घेऊन आली आणि ती फाडून तिचे तुकडे तिने वडिलांच्या तोंडावर फेकले! कुणीतरी एवढा उद्वेग व्यक्त करीत आहे, याचीदेखील कुणी नोंद घेतली नाही. गुणपत्रिकाच फाडल्यामुळे सुंठेवाचून खोकला गेला असेच त्यांना वाटले असणार! आता गुणपत्रिकाच नाही तर कशी शिकणार? तिची प्री-डिग्रीची परीक्षा उत्तीर्ण करून पुढे पदवी घेण्याची इच्छा अपूर्णच राहिली.

तिकडे माहेरी आईच्या पाठच्या बहिणींचे शिक्षणदेखील अपूर्ण राहिले. सर्वांत धाकट्या बहिणीचे शिक्षण तर मॅट्रिकच्या परीक्षेची फी भरण्याएवढे पैसे नव्हते म्हणून अपूर्ण राहिले होते. एकाचवेळी मामा आणि मावशीची फी भरायची होती. अशावेळी मामाचे शुल्क भरले गेले. आजोबांनी इथे पड खाल्ली!

या घटनेच्या जवळपास वीस वर्षांनंतर जिल्ह्यात स्त्रियांसाठी एक शिवणकला-वर्ग सुरू करण्यात आला. तेव्हा तिला त्या गुणपत्रिकेची आवश्यकता निर्माण झाली, तेव्हा तिलाच खटपट करून ती नागपूरहून मिळवावी लागली. या शिवणकला वर्गात जिल्ह्यातील ६०० स्त्रियांमध्ये तिचा पहिला क्रमांक आला होता. तिच्या 'शिवणकला वही'त तिने माप घेऊन शिवून इस्त्री करून चिटकवलेले इवलेइवले झबले, फ्रॉक, शर्ट, पॅन्ट, सफारी, मिडी, चड्डी, ब्लाऊज असे एक-ना-अनेक कपडे आम्ही खूप विस्मयाने बघत असू! जिल्ह्यातील कुणा अधिकाऱ्याने तिला तिची वही मागितली होती; पण तिने ती देण्यास नकार दिला. तिच्या गुणवत्तेचे ते जणू काही एक छोटे शिल्पच होते! आम्ही कित्येक वर्षे आल्यागेल्या पाहुण्यांना आईची ती 'शिवणकला वही' आणि 'प्रमाणपत्र' कौतुकाने दाखवीत असू. स्त्रियांच्या प्रज्ञेचं असं गृहिणीकरण केलं जातं! त्यांचे श्रम हे असे घरबशे राहतात. पदवी घेऊन विद्वान होण्याचे स्वप्न बघणाऱ्या स्त्रीला झबले शिवण्यात स्वत:ची कला आणि बुद्धिचातुर्य शोधावे लागले! हे ज्ञान नंतर तिने इतर स्त्रियांना शिवणकला शिकविण्यात वापरले.

या शिवणक्लासच्या आधी आणि नंतर आईने व्यवसाय म्हणून मसाले तयार करणे, शेवया करणे, हलव्याचे दागिने करणे, फुलवाती करणे, कुरड्या करणे, पापड लाटणे, शिवणक्लास चालविणे, रुखवंत करणे, रांगोळी क्लास घेणे-करणे, खानावळ चालविणे, मिठाच्या पिशव्या भरणे, गिरणी चालविणे, ज्योतिषशास्त्र शिकून जन्मकुंडल्या तयार करणे असे एक-ना-अनेक उद्योग केले. नीतिमत्तेने अर्थार्जन करणे, हे तत्त्व जपताना नेमके किती अर्थार्जन झाले असेल, ते तिचे तिलाच ठाऊक? स्त्रियांचे श्रम हे अल्पवेतनीच राहतात.

आईने एक महिला सहकारी संस्थादेखील चालविली. परंतु, तिचा विकास फारसा झाला नाही. ती मूर्तिकलेतदेखील पारंगत होती. ती अध्यात्मिक प्रवचनही देत असे. पण अध्यात्मातही तिने ज्ञानसाधनेऐवजी भक्तीचा मार्ग निवडला आणि तिने तिची प्रज्ञा भक्तीत बुडविली. सासरच्या घरात अनुसरल्या जाणाऱ्या रामदासी संप्रदायाला कवटाळून ती अधिकच कर्मकांडी बनली.

नवरात्रापूर्वी ती घरातच सार्वजनिक शारदोत्सव साजरा करीत असे. या काळात ती महिनाभर नाटके वाचून काढी. मग एक नाटक निश्चित करून गल्लीतील तमाम स्त्रियांना घेऊन या नाटकाची तालीम घरी महिनाभर चाले. मग आईने दिग्दर्शित केलेल्या या नाटकातील पुरुष पात्रंही स्त्रियाच वठवीत असत. पुरुष पात्रं जर पुरुषांना वठवायला दिली तर नाटकाचाच खोळंबा होईल, असं तिला वाटे. ग्रामीण भागात परपुरुषासोबत स्त्रीपात्र वठवायला कदाचित स्त्रिया तयार होणार नाहीत किंवा त्यांना घरातून विरोध होईल, अशीही काहीशी भीती होती. नाटक कोणतेही असले तरी मुख्य पुरुषपात्र आई वठवीत असे. ही नाटकं केवळ स्त्रियांनाच खुली असत. व्यक्तिगत आयुष्यात पुरुषसत्तेचा बळी असलेल्या आईला घडीभर जो पुरुषार्थ गाजवायला मिळत होता, त्यातून ती सुखावून जात असेल का? 'कुलवधू', 'चांदणे शिंपीत जा' अशी ती पारंपरिक नाटकं असत.

आम्ही सर्व भावंडे लहान असताना आईचे हे व्यवसाय, हौस सुरू होते. एकत्र कुटुंबातून विभक्त झाल्यानंतरच तिच्या या कलागुणांना वाव मिळाला. तिने एक खानावळ चालविण्याचाही प्रयत्न केला, पण अयशस्वी! देशमुख स्त्रियांना हे शोभतं का? असे टोमणे तिला हे उद्योग करताना उत्तर आयुष्यातही खावेच लागले.


अनेक स्त्रियांकडे असतो, तशा रात्रओल्या आठवणींचा साठा तिच्याकडे आहे. तिने आत्मकथा लिहावी, असा मी खूप आग्रह धरला. पण त्यातून आपल्या घराण्याचं नाव खराब होईल, असं तिला वाटतं! मी म्हणालो, ज्या घराण्यानं तुला कोणतंही सुख दिलं नाही, त्याच्या नावाचा विचार तू का करतेस? तर, क्षणभर ती दिङ्मूढ होते. पण तिच्याकडे उत्तर नसतं!

अठराव्या वर्षी स्वत:चे लग्न झाल्यामुळे स्वत:च्या आयुष्यातील विकासाच्या पुढील वाटा बंद झालेल्या तिने अनुभवल्या असतानादेखील तिने आणि माझ्या वडिलांनी माझ्या बहिणीचे लग्न अठरा वर्षे पूर्ण होताच लावून दिले. तालुक्याच्या गावातील कॉलेजमधील मुलं टारगट असतात, हे कारण तिच्या अवेळीच्या लग्नासाठी पुरेसे ठरले. तिचेही शिक्षण अर्धवट राहिले.

शेवटी, अंजुमन हायस्कूलमधून बाहेर पडताना मला आजी, आई, मावशी आणि बहिणीच्या शिक्षणाच्या कथा आणि व्यथा आठवत राहिल्या. अंजुमन हायस्कूल सोडताना अक़लाख़ मोहम्मद खान 'शहरयार' यांच्या गाण्यातील ''इस अंजुमन में आपको आना हैं बारबार....मुश्किल नहीं है कुछ भी अगर ठान लीजिए'' या ओळी आठवत राहिल्या! सध्यातरी स्त्रियांना या शाळारूपी अंजुमनमध्ये येण्याला काय पर्याय आहे?


❑

(पूर्वप्रसिद्धी – मिळून साऱ्याजणी)



# मनोगत





## वसंत आबाजी डहाके




मला पांढरा कागद आणि काळी शाई या दोन गोष्टी खूप आवडतात. समोर अफाट पांढरा अवकाश पसरलेला असतो. त्यात काळ्या शाईची पाखरं उडत राहावी किंवा काळ्या मासोळ्या तरंगत राहाव्या असं वाटतं. कधीकधी वेडीवाकडी झाडं उगवतात. कधी चेहरे डोकावतात. दगडधोंडे, भिंती याही आकार घेतात. डोळ्यांच्या खाचा असलेल्या, तोंड नसलेल्या मानवसदृश आकृती उमटतात. कधी नुस्ता रेषांचा खेळ असतो.


एकीकडे कविता लिहिणं किंवा दुसरं काही लिहिणं चाललेलं असतंच. ते जसं सुचणं असतं, तसंच हेही. प्रसंग, स्थिती, मनोवस्था यांचा आणि या रेखाटनांचा संबंध असणारच.

नुस्त्या रेषा, नुस्त्या आकृती म्हणूनही या रेखाटनांकडे पाहता येईल. अर्थात नुस्त्या रेषा, नुस्त्या आकृती असं काही नसतं. आपला भवताल आणि त्याचा आपल्या मनोदशेवर पडणारा प्रभाव असतोच. डोळे आहेत पण बुबुळं नाहीत, तोंडच नाही म्हणजे काही बोलणंच नाही, उंच फैलावलेले हात म्हणजे कुणाला तरी हाकारणं आहे, दोन व्यक्ती दिसताहेत पण त्यांच्यात बरंच अंतर असावं, मूक जमाव आहे, किरट्या आकृती आहेत आणि त्यांच्याभोवती कोसचे कोस अवकाश पसरलेला आहे... असं काहीही काळ्या रेषांतून पांढऱ्या कागदावर उमटत राहतं.









# टर्मिनस

## अभिषेक वाघमारे

मीटरगेज पॅसेंजरच्या बोगीतल्या सामानाच्या एका रॅकवर अंगाचं मुटकुळं करून तो झोपला होता. त्याने हळूच डोळे किलकिले करून पाहिलं. कारखान्यातून निघाल्यावर केवळ चाचणीच्या वेळेसच एखादेवेळी फिरला असावा अशा वाटणाऱ्या पंख्यावर त्याचे नवेकोरे जोडे आरामात विसावले होते. डिसेंबर महिन्यातील त्या उत्तररात्री गाडीचे प्रत्येक टप्पर मरणाच्या थंडीने थडथडत होते. डब्यांना जोडणारे यांत्रिक सांधेही संधिवाताने आखडून गेल्यासारखे वाटत होते. अशा स्थितीत तोंडाला बांधलेल्या एका फटुकड्या रुमालाखेरीज त्याच्याकडे पांघरण्यासारखं काहीच नव्हतं. मोठ्या मुष्किलीने मिळालेल्या छटाकभर जागेत थंडीशी दोन हात करत तो कसातरी निजला होता. झोपेत अडथळा आणणारे बूट आपण केव्हा काढून त्या पंख्यावर ठेवले हे आता त्याला आठवतही नव्हतं. आता मात्र त्याची झोप पूर्णपणे उडाली होती. त्याच्या पायाशी त्याच्यासारखंच पाय दुमडून झोपलेल्या एका लहान पोराला धक्काही न लागू देता, तो मागे सरकून बसला. इतका वेळ उशाला घेतलेली बॅग एकदम दूर झाल्यामुळे मानेला मुंग्या आल्यासारखं वाटलं त्याला.

कुणास ठाऊक कसं, पण उतरण्याचं स्टेशन जवळ आलं की आपोआपच जाग येते. निदान त्याच्यासारख्या पट्टीच्या प्रवाशाला तरी. आपल्याला त्या ठिकाणी जायचं असतं, म्हणूनच तर आपण त्या गाडीत चढलेलो असतो ना! तसंच ते आपलं गंतव्य स्थानसुद्धा जवळ आलं की सिग्नल देतं, मी

येतोय, मी येतोय. दिवस भरत आलेल्या गर्भासारखं. त्यालाही आता तशीच जाग आली होती. स्टेशन आता काही फार दूर नव्हतं.

त्याची नजर खाली वळली. मध्येच गेलेल्या कुठल्यातरी दिव्याच्या प्रकाशाची एक तिरीप आत डोकावून गेली. पण तेवढ्याच वेळात डब्यात बसलेली असंख्य थकली-भागलेली, मळकी परंतु समाधानी सदरे, पायजमे, साड्या, पातळं, टोप्या, फ्रॉक, मफलरं चमकून गेली. मांजराच्या चपळाईने तो खाली उतरला. पंख्यावरचे बूट पुन्हा पायांत अडकवले. उशाची बॅग खांद्याला लटकवली आणि वाळूत पडलेल्या पाण्याच्या ओघळासारखी त्याने त्या गर्दीतून दरवाज्यापर्यंत वाकडीतिकडी वाट काढली. एव्हाना गाडी प्लॅटफॉर्मला लागली होती.

खाली उतरण्यासाठी दरवाज्याच्या कडेला असलेल्या हँडलला त्याने स्पर्श केला अन् थंडीची एक शिरशिरी फटाक्याच्या चुरचुरणाऱ्या वातीसारखी त्याचे सर्वांग चुरचुरत गेली. गाडीबाहेर पाऊल टाकल्यावर आता वेळ पायांची होती. एखादा थंडगार पाणसर्प आपल्या पायांना वेटोळे घालून बसला की काय असं क्षणभर त्याला वाटलं. त्याने पाय खरंच झटकूनही पाहिला, पण ही थंडीचीच किमया म्हणून तो स्वतःशीच हसला.

गाडी आली तशी शांततेने निघून गेली.

आता जरा सावरत त्याने सभोवताली नजर टाकली. पिवळसर धुक्कट ओलसर प्रकाशाने स्टेशन भरून गेलं होतं. देवानेही टाकून दिलेल्या एखाद्या पुरातन देवालयाच्या अंधाऱ्या प्रदक्षिणामार्गात जसा प्रकाशयुक्त काळोख असतो तशीच स्थिती. गाभाऱ्यातील समईचा झरोक्यातून बाहेर पडू पाहणारा उजेड किंवा त्याच प्रदक्षिणामार्गात कुणा निष्ठावंत भक्ताने ठेवलेली कोनाड्यातली दिवलाणी या दोहोंचा मिळून होईल एवढाच उजेड. प्लॅटफॉर्मच्या सुरुवातीला असलेली स्टेशनच्या नावाची पाटी दिसण्याचा तर प्रश्नच नव्हता.

'हे आणखी एक स्टेशन... अशी किती स्टेशनं पाहिली आपण? प्रत्येक जण वेगळं.'

पुंजक्यापुंजक्यातून बाहेर पडणारा प्रकाश उतारकरूला आवश्यक तेवढंच दाखवत होता. रेल्वेची ही एक खासियतच आहे. गरजेपुरतं तेवढंच प्रवाशाला दाखवायचं. बाकी त्याला दाखवण्यात काही अर्थ नसतो आणि प्रवाशालाही त्यात स्वारस्य नसतं. त्यामुळे प्लॅटफॉर्मवर त्याला दिसतात त्या फक्त पाट्या, ऐकू येतात ते भोंगे आणि भेटतात ते भामटे!

'हे स्टेशनही काही वेगळं दिसत नाही.' त्याने इकडेतिकडे पाहिलं. सर्वत्र चिडीचूप. छताला उंच बसवलेल्या ट्यूबलाईटवर एक दोन फकड्या फडफड करत होत्या, एवढंच. अजून तर बराच पल्ला गाठायचा होता. जगाच्या या भागात तो प्रथमच आला होता. कुठपर्यंत आलोय ते बघावं तरी म्हणून त्याने खांद्याला लटकवलेली बॅग काढली. त्यातून मोबाइल काढला. नेटवर्क कव्हरेज तर नव्हतंच. ऑफलाईन मॅपवर लोकेशन दाखवायलाही जीपीएसचा सिग्नल मिळत नव्हता. 'सिग्नल नॉट फाउंड- अनेबल टू लोकेट'. तितक्यात मोबाइलच्या बॅटरीनेही राम म्हटला. त्याने मोबाइल परत बॅगमध्ये टाकून दिला. आता तो त्याच्या जगापासून खऱ्या अर्थानं डिसकनेक्ट झाला. 'थोडा वेळसुद्धा कनेक्टिव्हिटी नसेल तरी आपण स्वतःपासूनच डिस्कनेक्ट झालोय असं का वाटत असेल? इतकी हताश भावना का येत असेल? ते जाऊ देत. पण पुढचा रस्ता मात्र आता कुणाला तरी विचारायला हवा.' तो आता त्या अंधारात कुणाचे बोलणारे दात चमकताना दिसतात का ते पाहू लागला.

त्याने प्लॅटफॉर्मची चक्कर मारली. या अंधाऱ्या टोकापासून ते त्या अंधाऱ्या टोकापर्यंत. सगळी हवा

निरुत्साहाने भरली होती. प्रवाशांसाठी ठेवलेलं जुनाट बोचरं बाकडं धुळीचं घोंगडं गुंडाळून बसलं होतं. स्वतःच रद्दीत जमा झालेलं बुकस्टॉल, अक्षरं विटून गेलेले रेल्वे मजदूर युनियनचे बोर्ड, रिझर्वेशन चार्ट लावण्याचा फुटक्या काचेचा नोटीसबोर्ड, सगळ्यांवरच एक निरुपयोगी कळा आली होती. कायम प्रवाशांचीच वाट पाहत आहे अशी वाटणारी वेटिंग रूम एवढंच काय तर तिकीट खिडकीच्या मागेही कधी कुणी बसलं असावं असं वाटत नव्हतं.

'आता सकाळ होईपर्यंत तरी वाट पाहण्याशिवाय गत्यंतर नाही. अन् या अनोळखी गावात स्टेशनच्या बाहेर भटकणंही काही कमी धोक्याचं नाही. तेव्हा आता इथेच टाईमपास केलेला बरा.' तोवर तो प्लॅटफॉर्मच्या एका टोकाला असलेल्या नळापर्यंत आला आणि एक पाय भिंतीला टेकवून, थकून उभा राहिला. आपल्या बाजूलाच पाण्याचा नळ असल्याची त्याला अचानक जाणीव झाली. त्याने त्यातली एक पितळी तोटी पिरगाळून पाहिली. तो प्रवासात जवळ पाणी ठेवत नसे. स्टेशनचं पाणी चाखल्याशिवाय गावचं पाणी जोखता येत नाही– असं त्याचं मत. पण कधीही अभ्यास न केलेल्या मुलाला परीक्षेत कॉप्या पुरवल्यावरही काहीच लिहिता येत नसतं, तसंच कधीही कुणीच न फिरवलेल्या त्या नळातून पाणी सोडा नुसती हवा तरी फुसफुसत बाहेर येईल ही अपेक्षाच मूर्खपणाची होती. शेवटी त्याने तो नाद सोडला. आता दुसरा पाय भिंतीवर टेकवून तो उभा राहिला.

रात्र वाढत चालली तशी थंडीही वाढत चालली होती. त्याने दोन्ही हात एकमेकांवर चोळले आणि मग दोन्ही तळव्यांनी गाल शेकले. डोळे शेकले. आता जरा बरं वाटू लागलं. डोळ्यांवरचे उबदार हात त्याने हळूच खाली घेतले. सावकाश डोळे उघडले. समोरचं दृश्य बघून त्याला जरा नवलच वाटलं. पलीकडे दूर कसला तरी उजेड दिसल्यासारखा झाला. त्याने पुन्हा डोळे चोळले. नीट निरखून पाहण्याचा प्रयत्न केला. 'हो. उजेडच. मग आतापर्यंत का नाही दिसला?'

पुढे काही अंतरावर रुळांच्या पलीकडे असलेल्या मालधक्क्यासारख्या जागेवर, हातगाड्यांच्या मागे विस्तव पेटलेला दिसत होता. 'या वेळेला इथे कोण असणार? असतील कुणी गांजेकस, गर्दुले नशा करत बसलेले, दुसरं कोण? पण काही का असेना, आपला थोडा वेळ तरी जाईल.' त्याच्या मनाने स्वतःच प्रश्न विचारून स्वतःच उत्तर दिलं. 'माणूस हा एक प्रवासी आहे असं कुणीतरी म्हटलं आहे ते खरंच आहे आणि वेळ न जाणं ही या प्रवाशाची सर्वांत मोठी समस्या आहे हे त्याहूनही खरं आहे.'

त्याची पावले आपसूकच त्या उजेडाकडे वळली. शेकोटी नुकतीच पेटल्यासारखी दिसत होती आणि तिच्याभोवती बसलेली दोन माणसेही नुकतीच जमिनीतून वर आल्यासारखी वाटत होती.

***

मालधक्क्यावर जिकडेतिकडे पडलेला कचरा, विरून गेलेले बारदाने, रस्स्या, सुतळ्यांचे गुंते, आडव्यातिडव्या लावून ठेवलेल्या हातगाड्या–ढकलगाड्या आणि विरलेल्या तागाचा भरून राहिलेला एक विचित्र वास या सर्वांना पार करत तो त्या शेकोटीपर्यंत पोचेस्तोवर त्या दोघांनी त्याच्याकडे काही विशेष लक्ष दिल्यासारखं दाखवलं नाही. जणू काही तो त्यांच्या रोजच्याच बैठकीतला होता आणि ते जणू त्याचीच वाट पाहत होते. एकाने बसल्याबसल्याच जरा सरकल्यासारखं करून त्याला बसायला जागा करून दिली.

दोघांचेही गणवेशासारखे सारखेच कपडे पाहून दोघेही कुठेतरी एकाच ठिकाणी काम करत असावेत, त्याला वाटलं. 'असतील कीमॅन, फोरमन, खलाशी–फलाशी इथेच. नाहीतर हमाल. पण

शेकोटीभोवती रिकामपणात बसणारे हे खेडूत इतके शांत, चूपचाप? आश्चर्य आहे. बहुधा या भुक्कड गावात राहून त्यांच्या आयुष्यात बोलण्यासारखं काही घडतंच नसेल!'

विस्तव आता चांगलाच पेटला होता. त्याचा प्रकाशही आता चांगलाच स्थिर झाला होता. त्या दोघांपैकी एका रासवट, उग्र चेहऱ्याच्या जाड भुवयांवाल्या माणसाने आतापर्यंत काखेत बांधलेले हात मोकळे केले. कमरेच्या मागे जमिनीवर टेकवले. मग थोडा मागे रेलून तो पायाचे तळवे शेकू लागला. पण तेवढ्याच वेळात त्या रासवट माणसाचे हाताचे तळवे त्याच्या नजरेने टिपलेच. दुरूनही ओळखू येणारे. रेशमासारखे तलम. जणू दुसऱ्याच कुणाचे तरी आणून चिकटवलेले. कुतूहल म्हणून मग त्याने त्या दुसऱ्या माणसाच्या हाताचे तळवेही हळूच पाहिले. 'इतक्या सुरेख, सुकुमार, सुंदर गुळगुळीत चेहऱ्याच्या माणसाचे तळहात इतके रुक्ष, ओबडधोबड? नुसत्या चेहऱ्याकडे पाहून कुठला माणूस कुठलं काम करत असेल हे सांगणं खरोखरच अवघड आहे, नाही?'

आता अंगही बऱ्यापैकी शेकून झालं होतं आणि जीभही वळवळ करत होती. गप्प बसून राहणं त्याला अवघड होत चाललं होतं. ''हे गाव कुठलं? पोपटखेडच ना? आणि तुम्ही काय करता इथं?'' न राहवून शेवटी त्याने त्या जाड भुवयांवाल्या माणसाला विचारलंच.

''ऑ?...हं...,'' जाड भुवयांवाल्या माणसाने पाय जमिनीवर टेकवले. ''हे गाव? तुम्हाला शेवटी जिथे जायचं आहे ते हे नाही ना? मग जाणून घेण्यात काय अर्थ? आणि मी? मी हा विस्तव पेटता ठेवतो. पूर्वी या लाईनवर वाफेची इंजिनं होती. त्यांच्या बॉयलरमध्ये सतत कोळसा घालून ती चालू ठेवावी लागत. तसंच काम आहे माझं असं समजा.''

''हॅ हॅ... इंजिनासाठी कोळसा घालणं ठीक आहे. पण हा एवढासा विस्तव पेटता ठेवणं हे काय काम झालं?''

''होय, हेच माझं काम आहे. आणि वाटतं तेवढं ते सोपं नाही. दिवसभर रानात, शिवारात भटकावं. दगड- धोंड्यांवरून, ओढ्या-नाल्यातून, दऱ्या-खोऱ्यातून फिरावं. विशाल वृक्षांच्या भोवती, तळ्याकाठच्या गर्द जाळ्यांत घुसावं. अंगात हजार काटे टोचून घ्यावेत तेव्हा कुठे या काटक्या, हे सरपण मिळतं आणि हा विस्तव पेटता राहतो. झालंच तर, तुमच्यासारखा एखादा येणारा-जाणारा बोललाच तर त्याच्याशी घटकाभर बोलावं, एवढाच काय तो विरंगुळा.''

''म्हणजे इकडे कुणी फारसं येत नाही वाटतं?''

''तसं लोक येतात,'' आता त्या सुंदर दिसणाऱ्या माणसाला कंठ फुटला. ''पण मुद्दाम वाट वाकडी करून कोण कशाला या अंधाऱ्या कोपऱ्यात येईल? त्यांना हा उजेड दिसला तरच.''

''का? इतका धगधगणारा विस्तव कुणाला दिसत नाही म्हणता? मला तर इतक्या दुरुनही दिसला.''

''ज्याला दिसायचा त्याला दिसतो. ज्याला दिसायचा नाही, त्याला दिसत नाही. हा प्रकाश सरळ रेषेतच धावणारा असला तरी सरळ वळणाचा नाही.'' एवढं बोलून तो सुंदर चेहऱ्याचा माणूस त्या प्रकाशाकडे एकटक पाहू लागला.

''बरं बुवा! असेल तसं.'' आता त्याने त्यांच्या अधिक नादी न लागायचं ठरवलं होतं. बाहेर पडलेला धुक्याचा पडदा अधिकच घट्ट होत चालला होता आणि मघाशीच घशाला पडलेली कोरड घसा अधिकच खरवडत चालली होती. ''पाणी तरी मिळेल का हो इथं प्यायला?,'' त्याने जो उत्तर देईल त्याला विचारलं.

‘‘नाही. आमच्याकडे पाणी नाही. आम्ही ठेवत नाही.’’

‘‘का?’’

‘‘कारण इथे चुकूनही पाणी ठेवलं व ते चुकूनही या विस्तवावर सांडलं तर तो अकाली विझून जाईल, म्हणून आम्ही इथे चुकूनही पाणी ठेवत नाही. पण जर फारच तहान लागली असेल तर तिकडे पाहा...,’’ जाड भुवयांवाल्या माणसाने अंधारात कुठेतरी बोट दाखवलं. ‘‘तिकडे स्टेशन मास्तरचं घर आहे. तिकडे मिळेल पाणी कदाचित, पाहा बुवा!’’

तो उठला आणि अंधारातच त्या माणसाने दाखवलेल्या दिशेने जाऊ लागला. तिथून उठल्याबरोबर त्याला अंधार एकदम गडद झाल्यासारखा वाटला. ‘शेकोटी आहे की उदबत्ती? चार पावलांपर्यंतही उजेड पडला नाही तिचा? विझली की काय?’ पण त्याने मागे वळून पाहिलं नाही. गवतातून चाचपडत त्या घरापर्यंत पोचेस्तोवर त्याचे पाय दवाने पूर्ण भिजून गेले होते. ओले बूट-मोजे घातल्यावर येणारं विलक्षण अवघडलेपण त्याला अस्वथ करत होतं.

‘कोपऱ्यावरच हे बदामाचं झाड आहे ना म्हणून. म्हणूनच या घरातला मिणमिणत्या दिव्याचा प्रकाश आधी नाही दिसला. नाहीतर उगाच कुठल्यातरी विस्तवाची राखण करत बसलेल्या त्या नशाबाज अवलियांची बडबड नसती ऐकावी लागली.’

ते अगदीच नमुनेदार क्वार्टर होतं. चहूबाजूंनी मोडकळीस आलेलं तारेचं कंपाउंड, ठिकठिकाणी आधार देऊन उभं असलेलं जीर्णावस्थेतील फाटक, आपल्याच मस्तीत उभे असलेले कडुनिंब आणि सुबाभूळ, कुणीतरी कधीतरी हौसेने लावून मग टाकून दिलेली दोन-चार फुलझुडपं, व्हरांड्याच्या जाळीदार भिंतीला टेकून उभी असलेली एक खटारा सायकल आणि अंगणात कुलूपाची तोटी असलेला एकटाच उभा नळ! सगळं कसं अगदी चित्रातल्यासारखं होतं.

त्याने हळूच म्हणून उघडलेलं फाटक शेवटी करकरतच उघडलं.

अशा भलत्या वेळी हे असलं दार ठोठावल्यावर एखादा आळसावलेला, चिडलेला, बाह्यांचे बनियन अन् पैजाम्यातला अर्धटकला मनुष्य हातात टॉर्च आणि काठी घेऊन बाहेर येईल, असंच कुणालाही वाटलं असतं.

दरवाजा उघडला.

पण त्याच्या समोरचं चित्र काही वेगळंच होतं. मनोहर होतं. मोहक होतं.

‘कुठल्या दरवाज्यामागे काय दडलेलं असेल, कुणास ठाऊक?’

त्याच्यासमोर एक तरुणी उभी होती. अपुऱ्या उजेडातही चमकणाऱ्या तिच्या गौरवर्णाची तुलना केवळ चांदण्या रात्री रानातून फेसाळत जाणाऱ्या शुभ्र झऱ्याशीच करता आली असती. रेल्वेच्या रूक्ष काटकोनी वातावरणातल्या यांत्रिकी अंधारातही तिच्या शरीराचे घाट उठून दिसत होते. तिच्या डोळ्यांवर हलकेच पसरलेली झापड निद्रेतून आलेली न वाटता कुणाची तरी वाट पाहून आल्यासारखी वाटत होती.

‘असलं स्त्रीलावण्य त्या मी मी म्हणणाऱ्या अलीबाबाच्या गुहेतही नसेल. अन्यथा त्याचा भाऊ कासीम सोडा, खुद्द अलीबाबाही गुहेतून बाहेर पडायचा मंत्र राजीखुशीने विसरायला तयार झाला असता. ही जरूर त्या स्टेशन मास्तरची उपवर मुलगीच असावी.’ असं स्वतःशीच ठरवून त्याने विचारलं.

‘‘माफ करा हं, या अवेळी तुम्हाला त्रास देतोय. मी एक प्रवासी आहे. इथे स्टेशनवर कुठेच प्यायचं पाणी नाही आहे. थोडं पाणी मिळेल का प्यायला?’’

‘‘त्यात काय एवढं? या ना, आत या!’’ दूरच्या डोंगरमाथ्यावरच्या देवळातील घंटेचा मंजूळ

नादच त्याच्या कानी आला.

''हो हो!'' म्हणतच तो तिच्यामागे गेला. लगोलग तिने दरवाजा लावून घेतला. दारात पाऊल टाकल्याबरोबर तो थबकला. प्रखर उजेडाने त्याचे डोळे दिपले. आपसूकच मिटले. आतापर्यंत घनगर्द काळोखाला सरावलेले डोळे त्या उजेडाने भाजून निघतात की काय अशी त्याला धास्ती वाटली. मग हळूहळू त्याने हात डोळ्यांवर तसाच ठेवून पापण्या उघडण्याचा प्रयत्न केला.

त्याच्या समोरचं दृश्य एखाद्या सरकारी क्वार्टरमधलं नक्कीच नव्हतं.

'छे छे! हे शक्यच नाही!'

त्याला वाटलं आपण जणू काही इंद्रलोकीच्या एखाद्या प्रासादातच उभे आहोत. कुठून उगवतोय हे न कळणाऱ्या झगमगीत प्रकाशात त्या दालनाचा कोपरा न् कोपरा उजळून गेला होता. आकाशापर्यंत पोचणाऱ्या रत्नजडित घेरदार स्तंभांनी त्या दालनाच्या परिघावर गर्दी केली होती. हवेत आल्हाददायक मंद सुगंध पसरलेला होता. दालनाच्या मध्यभागी एक चंदेरी पाण्याचं चमचमतं तळं होतं आणि त्यात विहरणारे राजपक्षी कुठून तरी ऐकू येणाऱ्या तंतुवाद्याच्या सायंकालीन रागाच्या तानेवर संथपणे माना डोलवत होते.

वळवून वळवून आता त्याची मान दुखू लागली.

'नाही! नाही! हे सगळं खोटं आहे. फसवं आहे. आपलंच स्वप्न आहे. थंडीमुळे, प्रवासामुळे, तहानेमुळे आपल्याला नक्कीच ग्लानी आली आहे. हे सगळे आपल्याच कमजोर मनाचे खेळ आहेत.' मग अचानक त्याला तिची आठवण झाली. 'कुठे गेली ती?'

ती तिथेच होती. त्याने बावचळून पुन्हा एकदा तिच्याकडे पाहिलं. ती बदलली नव्हती. ती तीच होती. तिच्या चेहऱ्यावरचं स्मितही तसंच होतं. त्याने तिच्याभोवती एक प्रदक्षिणा मारली.

'नाही. हे काही खरं नाही. म्हणजे हेच तर फक्त खरं आहे, जे आपल्यापुढे आहे. अस्सल बावनकशी शारीर लावण्य. या दगडमातीच्या भिंती, हे हिरे, माणकं, मोती, हा लखलखाट या हाडामांसाच्या जिवंत सौंदर्यापुढे अगदीच कुरूप आहेत.'

तो हिंमत करून तिच्याशी काही बोलणार, तेवढ्यात त्याला सभोवताली काहीतरी फरक जाणवला. पुन्हा एकदा त्याचं लक्ष जिवंत आकर्षणापासून त्या निर्जीव भोवतालाकडे ढळलं. आतापर्यंत ती दोघे ज्या भव्यदिव्य दालनात उभी होती त्याच्या भिंती नाटकाच्या देखाव्याप्रमाणे कोणीतरी अचानक वर उचलून घेतल्या. त्या उचललेल्या भिंतीखालून सटकता येईल या विचारात तो तिकडे धावला; पण तोवर भिंतींच्या जागी रेशमी पडदे सळसळत खाली आले आणि त्यांनी त्याला आपल्यात गुरफटून घेतलं. त्यांच्या मुलायम पाशातून त्याने फडफडत कशीबशी स्वतःची सुटका करून घेतली व पुन्हा एकदा थबकला. मघाचं ते तळं, ते राजपक्षी नाहीसे झाले होते. प्रकाशाचा भाव बदलला आणि तो जास्तच अंधारा झाला. तो मंद सुगंध, तो मात्र अद्याप होता. पण त्या सुगंधाचीही आता त्याला नशा चढू लागली. तंतुवाद्ये आता रात्रीचे शृंगारिक राग आळवत होती.

त्याला एकाएकी जाणीव झाली, तो आता एका शयनगृहात उभा होता आणि मध्यभागी असलेल्या सेजावर फक्त जेमतेम दिव्यांच्या प्रकाशात लपेटलेलं तिचं रसरशीत तारुण्य मोहाचं एक खुलं आमंत्रण घेऊन त्याचीच वाट बघत पहुडलेलं होतं.

नुकतंच पोटभर पाणी प्यायलेल्यालादेखील अमृताचा कुंभच पुढे आल्यावर तहान ही लागणारच. तो कुंभही रिता होण्यास उत्सुक होताच. तेव्हा त्यानेही त्या अपूर्व प्रेमामृताचा आस्वाद घेण्यास जराही

विलंब केला नाही. कोणीही काही बोलण्याची गरज तर तशीही नव्हतीच.

आता त्याला अगदी मोकळंमोकळं वाटत होतं. मनावरचं शरीराचं दडपण दूर झालं होतं. ऐन युद्धाच्या धुमःश्चक्रीत आपला भाता रिकामा झाला तरी मारलेला प्रत्येक बाण वर्मी बसल्याचं पाहून एक आगळं समाधान एखाद्या निष्णात योद्ध्याला वाटतं, तसंच त्याला त्या क्षणी वाटलं. आणि जिच्या नजरेच्या तीरांनी घायाळ होऊन आपण हा जीवघेणा खेळ खेळण्यास उद्युक्त झालो, तिची अवस्था तरी कशी आहे, याचीही त्याला उत्सुकता होती. तो तिच्याकडे कुशीवर वळला. अतिश्रमाने गुलाबी पडलेल्या तिच्या ओठांतूनही तोच आनंद ओसंडत होता. तो बघतच राहिला.

एका सावध क्षणी अचानक भानावर आला. त्याने गोंधळून इकडेतिकडे पाहिलं.

'बापरे! हे काय करून बसलो आपण? कोण ही बाई? आपण कोण, कुठून आलो? आणि हे काय झालं?' त्याने दोन्ही हातांनी डोकं गच्च धरलं. पण थोड्याच वेळात आपण काय केलं असावं याचा त्याला अंदाज आला. 'मोहात इतके वाहवत गेलो आपण? आपला स्वतःवर थोडाही ताबा नाही?' त्याची मती गुंग झाली. 'पण आपण इथे आलो कसे? अन् ही जागा तरी कुठली?' त्याला ना काही कळत होतं ना काही आठवत होतं. तेवढ्यात त्याच्या पाठीवरून एक मोरपिसाचा हात फिरला. त्याने मान वळवली.

ती... तीच होती.

तो दचकून मागे सरकला. तिच्या निळ्याशार डोळ्यांत त्याला भूतकाळ दिसू लागला. हळुहळू सगळं आठवत गेलं. तो उतरला ते स्टेशन... शेकोटीभोवतीचे ते खेडूत... ते स्टेशनमास्तरचं घर, ज्याचा दरवाजा ठोठावून तो आता तिथे फसला होता... दरवाज्यापलीकडची ती तरुणी आणि नंतरचा तो अपघात!

'खरंच अपघात होता का तो? अपघात अनिच्छेने होतो. खरंच आपली इच्छा नव्हती? मग चूक म्हणता येईल. पण चूक ही नियमाविरुद्ध गेल्याने होते. आपण निसर्गनियमांविरुद्ध गेलो? मुख्य म्हणजे एखाद्या गोष्टीचा परिणाम पाहिल्यानंतर ती चुकीची का बरोबर ते ठरवता येऊ शकतं. मग तिच्यात अन् माझ्यात झालेल्या त्या गोष्टीचा परिणाम तरी आपणास अजून कुठे ठाऊक आहे? परिणाम सोडा, पण आपण असं का केलं, याचं कारण तरी काय?' त्याने आता पुन्हा विचार करणंही सुरू केलं. त्याच्यातला माणूस जागा झाला. स्वतःच विचारलेल्या प्रश्नांच्या गुंत्यात आता त्याचाच पाय गुरफटू लागला.

दोऱ्याचं दुसरं टोक कुणाला तरी धरायला सांगितल्याशिवाय गुंता सुटत नसतो. आता तिलाच विचारणं त्याला भाग होतं.

''तू.. तू.. कोण आहेस तू? आणि ते स्टेशन, ते घर... ते सगळं कुठे गेलं?''

''म्हणजे अजून तुझ्या काहीच लक्षात आलं नाही म्हणायचं? ती खळखळून मनमुराद हसली. आम्हाला वाटलं की ज्या अर्थी तू इथपर्यंत आलास, त्याअर्थी तू जरा तरी हुशार असशील. एक निर्मनुष्य स्टेशन. निकामी झालेला मोबाईल फोन. अशा ठिकाणी थांबलेली गाडी. तो विस्तव... तुला लागलेली तहान. आणि या अशा ठिकाणी माझ्यासारखीशी झालेली 'तशी' भेट! तुला काहीच रे कसं लक्षात नाही आलं?'' तिच्यात डोळ्यातले मिष्किल भाव लपता लपत नव्हते.

एव्हाना तो जरा सावरला होता. तरीही तोंडातल्या तोंडातच बोलला, ''माझं तर डोकंच कामातून गेलंय. तुझा एकही शब्द मला कळलेला नाही. पण मला कळलं काय आणि नाही कळलं काय? खरं

काय आणि खोटं काय? मला काहीही विचारू नकोस. तू कोण आहेस, हे मला माहीत नाही. पण मी माणूस आहे आणि माझे प्रश्न खरे आहेत, एवढंच मला कळतं. तुझी ही बडबड ऐकून मला तर तूही त्या शेकोटीवाल्यांपैकीच एक वाटते आहेस.''

''बरोबर आहे. आता कुठे तुला थोडं थोडं समजू लागलं आहे. पण आता तूसुद्धा तात्पुरता का होईना, आमच्यापैकीच एक झाल्याने तुला आवश्यक ते सगळंच सांगायला काही हरकत नाही. तू आजवर ज्या जगात राहत होतास, ते एक वेगळं जग होतं. वेगळी सृष्टी होती. ती सृष्टी किती प्रचंड गुंतागुंतीची आहे याची तुला कल्पनाही नसेल. कायम एकमेकांच्या जिवावर टपलेले मानवी आणि अ-मानवी सजीव त्यात आहेत. शहाण्या शेजाऱ्यांप्रमाणे नेहमी आपसांत पाऊस-वाऱ्याची देवाणघेवाण करणारे सागर, पर्वत, पठारं, वाळवंटं त्यात आहेत. स्वतःचे स्थान अढळ राखण्यात गुंतलेले ध्रुवीय प्रदेश आहेत. अनंत काळ एकमेकांपासून अंतर राखून एकमेकांभोवती निरुद्देश पण नियमबद्ध फिरणारे ग्रहगोल-तारे आहेत. एखाद्या समारंभात सालंकृत सुवासिनीप्रमाणे मिरवणाऱ्या दीर्घिका आहेत. असं बरंच काही सूक्ष्मातलं सूक्ष्म आणि विशालातलं विशाल, प्रत्येकजण स्वतःचं अस्तित्व टिकवून आहे-'' ती मध्येच थांबली. तो अद्याप तिच्याकडे बावचळूनच पाहत होता.

''या प्रचंड गुंतागुंतीच्या सृष्टीची देखभाल करणं हे तर मुळीच मामुली काम नाही. आणि हे कोण करतं, माहीत आहे?''

''मला कसं माहीत असणार?''

''तो जाड भुवयांवाला, रासवट चेहऱ्याचा कुरूप माणूस. होय, तोच. तोच या सृष्टीचा कार्यपालक, कार्यवाहक आहे. तो एवढासा विस्तव तुला दिसला ना? तोच तर या सृष्टीचा प्राण आहे. सृष्टीतल्या असंख्य व्यवस्था - अव्यवस्थांमुळे, एकमेकांत मिसळून जाणाऱ्या पदार्थांमुळे तर कधी त्यांच्यातील अंतर्विरोधामुळे तो प्राण कधी भडकून उठतो. कधी निखारे बनून लकाकत राहतो. तर कधी समाधानी चितेप्रमाणे शांत जळत राहतो. पण वेळेआधी त्याची राख होऊ न देणं हे त्या पालकाचं काम आहे व वेळ आली की त्याचा विनाश करायचा हे त्या अंतकाचं... इतकं सोपं आहे ते. आणि हा अंतक म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून तो दुसरा देखणा सुकुमार देहाचा राजबिंडा माणूस.''

''पण-''

त्याला मध्येच तोडत ती म्हणाली, ''थांब. मला माहीत आहे, तुझ्या मनात कुठला प्रश्न आला आहे. तू विचार करतो आहेस की मी हे काय भलतंच सांगते आहे. इतक्या मोठ्या सृष्टीचा पालनकर्ता कसा सर्वशक्तिमान, तेजःपुंज असावा. सुखशय्येवर आरामात पहुडलेला असावा. माझ्यासारख्या गौरांगिनी दासी त्याच्या दिमतीला हजर असाव्यात. बसल्या जागी त्याने जगाची चिंता करावी. या उलट सृष्टीचा विनाशक कसा क्रूर, रानटी, जटाजूटधारी, आयुष्यभर बर्फाळ पर्वतांवर तपःश्चर्या करून बर्फासारखीच कठीण-काळी त्वचा झालेला असावा असंच कल्पनाचित्र तू आताच मनात रंगवलं होतंस की नाही? पण तेच खरं असेल, असं तुला का वाटलं? बहुधा आजवर तू असंच वर्णन ऐकलं असशील. त्यात तुझी चूक नाही. अनेक वर्षे पिंजऱ्यात घालवलेला हिंस्र पशू जसा अरण्यात सोडल्यावर शिकार करू शकत नाही, तसंच सवयींच्या विचारांनी बांधलेल्या कुंपणातील ज्ञान कुंपणाबाहेरची वाट दाखवू शकत नाही.''

त्याने तिच्याकडे एका निर्बुद्ध नवलाने पाहिलं.

''पण तो रासवट चेहऱ्याचा माणूस तुला जे म्हणाला, ते खरंच आहे. तो विस्तव पेटता ठेवणं, ती

सृष्टी तगवणं हे काही सोपं काम नव्हे. सगळ्या ब्रह्मांडात फिरून तप्त वायू, कठीण ग्रहगोल, अतिशीत सागरतळ, सगळं स्वतः पालथं घालून, वेचून वेचून इंधन आणावं लागतं. हे करता-करता बिचाऱ्याचं बाह्य शरीर निबर, कुरूप, बेढब बनलं आहे. पण त्याचे तळहात तू पाहिले होतेस ना? किती मुलायम, नाजूक होते, नाही? असणारच. कारण तो विस्तव आपल्या हातांनी पेटता ठेवण्याचं काम मात्र फार नाजूक आहे आणि त्यासाठी त्याच्यासारखे कापूसहातच हवेत. याउलट तो बिचारा अंतक बघ. त्याला कधीतरीच काम असतं. कुठेही जायचं-यायचं नसतं. म्हणून तो आपल्या मूळ रूपातच तुला दिसला. पण कुणाचाही का असेना, विनाश करण्याचं काम मात्र खरोखरंच अवघड असतं. त्याकरता मनाप्रमाणे हातही कठोर असावे लागतात.

आता तोसुद्धा स्वतःच्या तळहाताकडे एकटक पाहू लागला.

''ऐकतो आहेस ना?'' तिने विचारलं.

त्याने मान वर केली. त्याच्या चेहऱ्यावर निराशा पसरली होती. ''आणि तुझं काय? पण त्यापेक्षाही महत्त्वाचं म्हणजे माझं काय? मी तुमचा असा काय गुन्हा केला की तुम्ही मला या जाळ्यात अडकवलं?''

''कोणी कोणाला ना अडकवू शकतो ना सोडवू शकतो. हा कोण्या अज्ञात सूत्रधाराचा न संपणारा खेळ आही. येथे देखावे आपोआप बदलतात. संवाद आपोआप सुचतात आणि पडदेही आपोआप पडतात. आपण फक्त यातली पात्रे. आपला प्रवेश आला की रंगमंचावर यायचं, आपलं काम करायचं आणि ते झालं की मग अंधारात जाऊन आपला पुढचा प्रवेश येईस्तोवर वाट बघायची. एवढंच आपलं काम! ज्याला जसं आणि जितकं काम सांगितलं आहे, त्याने तेवढंच करत राहणं हा सृष्टीचा एक नियमच आहे. आता राहता राहिले मी. तर एव्हाना तुझ्यासारख्या बुद्धिमान माणसाच्या लक्षात आलंच असेल की माझं काम निर्मितीचं, उत्पत्तीचं! उत्पत्ती, स्थिती आणि विनाश या जन्म-पुनर्जन्माच्या चक्रातून स्वतः सृष्टीच मुक्त होऊ शकत नाही तिथे जन्मभर मुक्तीसाठी धडपडणाऱ्या इतरांची काय कथा?''

''पण, अगं महामाये...,'' तो आता खरोखरच चिडला होता, ''माझं या सगळ्यात काय काम आहे? मला तुमचं ते ज्ञान नको आणि तुझी ती मुक्तीही नको. मला माझ्या घरी जाऊ दे. तसंही तुम्ही तिघं हा तुमचा खेळ कधीही खेळू शकता...''

''अगदी बरोबर!'' ती म्हणाली. ''पण विनाशानंतर लगेचच पुन्हा उत्पत्तीचं काम सुरू झालं पाहिजे. तसाच नियम आहे. सृष्टी स्वतःच तिचे बनवलेले नियम पाळते, म्हणूनच तिचे अगणित घटक तिचे नियम पाळतात. आणि तिचे सगळे घटक हे नियम पाळतात, म्हणून सृष्टी स्वतः स्वतःचे नियम पाळू शकते. आणि उत्पत्तीचं काम नर-मादी दोघांचंही आहे- हासुद्धा एक नियम आहे, हे काही मी तुला सांगायला नको. तर बरं आहे. तू आता जाऊ शकतोस. तुझं काम संपलं.'' ती रूक्षपणे उठली. ''आणि हो, तुला तहान लागली होती ना? पाणी पाहिजे ना? तो दरवाजा दिसतो आहे, तिकडे जा.'' तिने एका बंद दरवाज्याकडे इशारा केला.

खरं म्हणजे आता कुठल्याही दरवाज्याकडे जाण्याची त्याची हिंमत होत नव्हती. तरीही तो उठला. तसाच विमनस्कपणे पाय ओढत तिने दाखवलेल्या दरवाज्याकडे गेला. दरवाजा उघडून बाहेर आला.

त्याला पुन्हा एकदा धक्का बसला.

बाहेर फक्त पाणी होतं. क्षितिजापर्यंत पसरलेलं निळंशार, निर्मळ, निर्भेळ, निर्विष पाणी.

ते रेल्वे स्टेशन, ते रेल्वे ट्रॅक, रेल्वे क्वार्टरचा आवार काही दिसत नव्हते. एकही झाड, एकही पक्षी काहीच नव्हतं. त्याला वाटलं, आपण ज्या स्टेशनवर उतरलो, तेच आपल्यासाठी टर्मिनस ठरलं. आपल्या आयुष्याची गाडी तिथेच संपली.


'पण टर्मिनसवर तर एक गाडी संपते, तशी दुसरी सुरूही होते. आल्या त्याच मार्गाने परत जाणारी.' त्याने मागे वळून पाहिलं.

त्या ठिकाणी कुठलाही दरवाजा नव्हता. कुठलंही घर नव्हतं. कुठलाही प्रासाद नव्हता. फक्त एक होडी त्याचीच वाट पाहत संथपणे पाण्यावर डोलत होती.

❑


वर्णमुद्राचा नवा कथासंग्रह

**वुहानचा वाफारा**





किंमत ₹ ४२४/-
सवलतीत ₹ ३५०/- ला पोस्टेजसह
घरपोच मिळेल.
संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स,
शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५०
हाच व्हॉटसॲप नंबर आहे, पत्ता त्यावरच
कळवता येईल.
अकाउंट डिटेल्स :

VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

किंवा

वर्णमुद्राचा नवा कथासंग्रह

**झुरळ आणि इतर काहीबाही**




किंमत ₹ ३२४/-
सवलतीत ₹ २५०/- ला पोस्टेजसह
घरपोच मिळेल.
संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स,
शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५०
हाच व्हॉटसॲप नंबर आहे, पत्ता त्यावरच
कळवता येईल.
अकाउंट डिटेल्स :

VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

किंवा



# ज्ञानर्षी डॉ. बाबासाहेब : एक अनावृत पत्र

## प्रभाकर बागले



अलौकिक कर्तृत्व करून गेलेल्या थोर पुरुषांचं स्मरण त्यांच्या जयंती-पुण्यतिथीच्या निमित्तानं केलं जातं. नव्या पिढ्यांसाठी ते गरजेचं असतं. पण ज्या नव्या वाचकांनी त्यांना पाहिलंच नाही, ते थोर पुरुषांविषयीचे लेख फार गांभीर्यानं घेत नसतात. अशा प्रकारच्या लेखन-वाचनात औपचारिकता येत असते. कारण बराच मोठा काळ पुलाखालून गेलेला असतो. समाज बदललेला असतो. त्याची शैली बदललेली असते. प्रश्न मात्र चिरंतन असतात. काही माणसानं निर्माण केलेले असतात तर काही समाजनिर्मित असतात. पण पक्षांच्या नेत्यांनी निर्माण केलेले प्रश्न समाजातील वस्तुस्थितीचा गुंता वाढवीत असतात. या सिलसिल्याला मोठा इतिहास असतो. या इतिहासाला भेदून तुम्ही मात्र अर्थपूर्ण प्रश्नांकडे समाजाला वळवलं, बाबासाहेब! म्हणून हा पत्रप्रपंच.

आम्ही शिक्षित झालो, विज्ञान-तंत्रज्ञानामुळं विविध विद्याशाखा निघाल्या. त्यांच्या परिभाषा निघाल्या. जग जवळ येत असल्याचा भास आजही आम्ही बाळगून आहोत. तंत्रज्ञानानं निर्माण केलेली उपकरणं, अद्ययावत संगणक आम्ही वापरत आहोत. ही उपकरणं हाताळणं आता आमच्या सवयीचा भाग झाला आहे. या मागे जी वैज्ञानिक दृष्टी काम करत असते, तीविषयी आम्ही जवळपास निरक्षर आहोत. विचार करायला आमच्याकडे वेळच नाही. परंपरेनं निर्माण केलेली कर्मकांडं आमच्या सवयींचा भाग झालेली आहेत. या दोन्ही सवयी आमच्यामध्ये गुण्यागोविंदानं नांदत आहेत. स्कोडा

कंपनीची आम्ही कार विकत घेतो, पूजा करतो. टायर नारळावर घालून तो फोडतो. आमच्या मानसिकतेतील या दोन सवयी आम्हाला कृती करायला लावतात, बाबासाहेब!

आजच्या ७० टक्के समाजजीवनातील वर्तनव्यवहारासाठी कुसुमाग्रजांनी जी प्रतिमा वापरली, ती हुबेहुब मूर्तरूपात समोर उभी राहते. समाजशरीर रेल्वेसारखं धावताना दिसतं, पण समाजमन कोळशाच्या इंजिनातून निघणाऱ्या धुरासारखं त्याच मन गतीनं मागं जाताना दिसतं. तुम्ही हे सगळं बारकाईनं अनुभवलं, बाबासाहेब. या गतीने अनेक नवे विरोधाभास जीवनात अस्तित्वात आणले आहेत. आणि त्याबरोबर काही संज्ञा आल्या. पुढील काही संज्ञांमुळं साक्षर आणि प्रगत यांच्यामधील अंतर वाढत गेलं. हा आमचा आजचा फिनॉमिनन आहे, बाबासाहेब! तुमच्या लेखी शब्द वा संज्ञा माणसा-माणसातील अंतर कमी करण्यासाठी असतात, त्या माणसांमधल्या साधनसंपन्नता (Resources) वाढवणाऱ्या असतात. या विश्वासाच्या आधारे तुम्ही तुमच्या वैचारिक जाणिवा समृद्ध केल्या.

बाबासाहेब, आम्ही मात्र या संज्ञांनी भांबावून गेलो आहोत. भवतालात जगताना अनिश्चितता, असंबद्धता, अनाकलनीयता, अर्थशून्यता, मूल्यहीनता, इंद्रियसुखासीनता, हिंसात्मकता, स्वकेंद्रितता, सत्तापिपासा, वंशीय-वर्गीय-जातीय धार्मिकता, परात्मता, पर्यावरणाविषयीची विचारशून्यता, मूलतत्त्ववादीता, विविध प्रकारच्या अस्मिता, तंत्रशरणता, तणावग्रस्तता आदी संज्ञांनी निर्माण केलेले विचित्र असुरक्षितपण आम्ही अनुभवत आहोत. आमचं मन या संज्ञांनी वेढलं आहे. जेव्हा एखादा समाज असुरक्षितता अनुभवत असतो, तेव्हा तो जात्यतीत, धर्मनिरपेक्ष असल्यासारखा वाटतो. तो सुरक्षित झाला की प्रतिष्ठेच्या मागे लागतो, एका व्यवस्थेची निर्मिती करतो, नवी व्यवस्था नवी असमानता निर्माण करत असते. या गोष्टीची स्वच्छ कल्पना तुम्हाला होती, बाबासाहेब!

म्हणून तुम्ही या संज्ञांनी व्यापलेल्या वास्तवाला, स्वकेंद्रित विचारविश्वाला, प्रश्न मुळात समजून न घेता, आकसापोटी निर्माण केलेल्या अर्थशून्य टीकेला धीरानं आणि धैर्यानं सामोरं गेलात, बाबासाहेब! (जिज्ञासूंनी, 'रानडे-गांधी-जीना' ही त्यांची पुस्तिका वाचावी. वेळ नसेल तर निदान त्याची प्रस्तावना तरी वाचावी.) आम्ही मात्र याबाबत कमी पडलोत. आम्हाला अनेक गोष्टी सहज उपलब्ध झाल्यामुळे असं झालं का? आत डोकावलं पाहिजे, एक मात्र खरं की तुमचा प्रत्येक विचार-कृती आशयघन असल्यामुळे त्या भविष्याच्या दिशेनं जाताना दिसतात. त्यामुळेच तुम्ही १९ व्या शतकातील वैचारिक क्रांतीला नवा आयाम देऊ शकलात. तुमच्या लेखनाचा बाज वेगळाच आहे. ज्ञान या शब्दाकडे कसं पाहावं, तो वाचकाच्या अनुभवाचा भाग केव्हा होत असतो हे सूचित करणारा आहे. दलित आणि दलितेतर समाजांनी 'स्व'च्या भानापाशी फार थांबून चालणार नाही. कारण त्या 'स्व'चा विस्तार झाला पाहिजे. आणि त्यासाठी ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेत उभं राहण्याची गरज असते, हे तुम्ही तुमच्या अनुभवातून व्यक्त केलं. बाबासाहेब, तुमची प्रेरणा घेऊन १०-१५ वर्षं दलित कवितेनं, आत्मचरित्रानं मराठी साहित्याला नवं क्षितिज उपलब्ध करून दिलं. तुमच्या प्रेरणेमुळं त्या लेखकांना निर्मितिप्रक्रियेत काळाचं भान विरघळून जात असतं हे कळलं. त्या क्षणात कोणी दलित-सवर्ण नसतो. तो भेदातीत क्षण असतो. तो केवळ तुमच्यामुळं प्राप्त झाला, हे त्यांना मनोमन कळलं आहे, बाबासाहेब!

पण हे क्षण क्षणजीवी असतात, याचा विसर पडला असावा असं वाटतं. Genius is one percent inspiration and ninety nine percent perspiration. खरं म्हणजे ज्ञानयज्ञात तुम्ही जे ज्ञान टाकलं, त्याचा लौकिक यू.एन.ओ.पर्यंत पोचला. तुमच्या जयंतीनिमित्त साऱ्या जगात 'नॉलेज डे' म्हणून साजरा केला गेला. कदाचित मानवी इतिहासातील ही पहिली घटना असेल. पण भारतात अनेक

खेडी आहेत, जिथं अजून पुरेसं शिक्षण पोचलेलंच नाही. हे वास्तव आणि वरील 'नॉलेज डे' यांच्यामधील अंतर्विरोध मनाला कुरतडणारा आहे. तुम्ही असे अनेक अंतर्विरोध पचविले आहेत. आणि मार्ग दाखविला आहे, आणि त्याच मार्गावर तुम्ही आत्मविश्वासानं पावले टाकली आहेत. 'स्व'च्या जाणिवेचं सातत्य टिकवण्यासाठी कष्टाची अन् निष्ठेची गरज असते. निष्ठा ही निर्मितिप्रक्रियेवर असावी लागते. आणि तिच्या जोडीला त्याचं भवतालाचं सूक्ष्म निरीक्षण आणि विविधांगी सूक्ष्म वाचनाची गरज असते. त्यासाठी कष्ट घ्यावे लागतात. मानवी वर्तनात अनेक विसंगती असतात. आणि त्याबरोबरच त्यांच्यामध्ये काही अनुबंधाच्या खुणाही असतात. माणसानं, कलावंतानं त्या अनुबंधाच्या खुणांवर लक्ष केंद्रित करावं, असं तुम्हाला वाटणं स्वाभाविक आहे, बाबासाहेब!

तुमच्या या विचारामध्ये सहअस्तित्वाची भावना महत्त्वाची आहे. सर्व प्रकारच्या कटू वास्तवाला दीर्घकाळ सामोरं तुमचं हे व्यक्तिमत्त्व सहअस्तित्वाचं मूल्य प्राणपणानं जपू शकतं यावर आज विश्वासच बसू शकत नाही, बाबासाहेब! त्याचं एक कारण या पत्रातून तुमच्यापर्यंत पोचावं असं वाटतं. बाबासाहेब, १९९० नंतरच्या जीवनात आम्ही फेकले गेलो. लोकशाही, स्वातंत्र्य, जातिभेदातील इहवाद आदी तुमच्या मूल्यांचे सांगाडे आमच्यासमोर दिसू लागले. भारतीय आणि जागतिक लोकव्यवहारात धर्म, वंश, जात आणि पैसा या चौकोनातील प्रत्येक घटकानं आपला विद्रूप चेहरा आम्हाला दाखवला. विज्ञाननिर्मित तंत्रज्ञानानं औद्योगिक क्रांती निर्माण केली. पैसा नाचू लागला. त्याच्या बळावर धर्म, वेष, जात यांच्या अस्मिता टोकदार बनल्या. त्या टोकदार ठेवण्यासाठी अत्याधुनिक शस्त्रांची निर्मिती अपरिहार्य ठरली. सत्तापिपासा वाढत गेली. या वर्चस्वभावनेची मुळे परदेशी जमिनीत येतात हे लक्षात आले. जागतिकीकरण नावाची जी संज्ञा आहे तिच्या ओटीपोटात ही सत्तापिपासा वळवळत असते. अशा वातावरणात सामान्य माणूस असहाय होतो आणि अगतिक होऊन जगू लागतो. हे पाहून समाजातली संवेदनशील मनं अस्वस्थ होतात. आणि आपल्या आशयघन जाणिवांना आपल्या शब्दांत बांधताना दिसतात. ही एक दिलासा देणारी गोष्ट आहे. बाबासाहेब आणि बाबासाहेब! एक-दोन उदाहरणं घेतो आहे. कारण दलित या तुमच्या शब्दाला 'वंचित' या शब्दाचं ठळक परिमाण आहे. त्यात भटके, आदिवासी, फासेपारधी, विस्थापित हा व्यापक अर्थ दलित या शब्दांत तुम्हाला अभिप्रेत आहे. तुमच्या आज 'असण्या'च्या या खुणा आहेत, तुमच्या अस्तित्वाची जाणीव करून देणाऱ्या आहेत.

जसिंता केरकेट्टा नावाची आदिवासी कवयित्री आहे. झारखंडमधील एका लहानशा खेड्यात जन्म झाला. नदी, पहाड, जंगल, प्राणी, कीटक, आदिवासी स्त्रीपुरुषांचं जगणं ती पाहत आलेली आहे. आईचे धार्मिक वृत्तीचे संस्कार घेत ती मोठी झाली. तीही देवाची प्रार्थना करत होती. शाळेत जाऊ लागली. आईवडिलांबरोबर तीही शहराचं जीवन अनुभवत होती. प्रार्थना करता करता तिच्या लक्षात आलं की, प्रार्थना जीवनात बदल घडवू शकत नाही. ही जाणीव निर्माण झाली. निसर्गाविषयीची ओढ अधिक घट्ट होत गेली. आदिवासी आणि निसर्ग यांच्या नात्यामधली स्पंदनं तिला भावू लागली. निसर्गातला प्रत्येक घटक सन्मानानं जगताना तिला दिसत होता. मग समाजजीवनात सन्मानानं जीवन जगता येणार नाही का? आदिवासी मुलांचं जीवन वाऱ्यावर सोडल्यासारखं का? आदिवासींचा जीवनसंघर्ष अंतहीन राहणार का? या व्यवस्थेची निर्मिती कोणी केली? अशा काही प्रश्नांचं काहूर तिला स्वप्न पाहायला मजबूर करतं. एकीकडे तिचं शिक्षण सुरू होतं. उपजीविकेसाठी सटरफटर कामं तिला करावी लागत होती. आतल्या संवेदनांना वाट सापडत नव्हती. पण तिची जिद्द कायम होती. तिला

आधार तिच्या स्वप्नांचा होता. कारण भवतालातल्या वास्तवातली 'निगेटिव्हिटी' दाट होत होती. म्हणून तिला स्वप्नाच्या सर्जकतेच्या आधारानं जगावं लागत होतं. स्वप्नामधली पॉझिटिव्हिटी तिला बळ देत होती. तिला पत्रकार म्हणून काम मिळालं. थोडं व्यक्त होता आलं. पण तिच्या अभिव्यक्ती-स्वातंत्र्याच्या मुक्त खुणा तिच्या लेखनात दिसू लागल्या. पत्रकारितेची म्हणून एक व्यवस्था असते. अभिव्यक्ती-स्वातंत्र्याला व्यवस्थेत बटीक म्हणून राहावं लागतं हे तिच्या लक्षात आलं.

जीविताचा संघर्ष संपत नाही. या संघर्षाच्या प्रवासातच तिच्या अभिव्यक्तीची क्षमता निर्मितिप्रक्रियेत आकारत गेली. एक आगळंवेगळं रसायन तिला कवितेकडे नेताना दिसतं. तिची स्वप्न पाहण्यातली अंतर्मुखता एकाच वेळी प्रगल्भ आणि टोकदार झालेली तिच्या काही कवितांतून दिसते. तुमच्या अस्तित्वाच्या खुणा तिच्या कवितेत दिसतात, बाबासाहेब! तुमच्याविषयीच्या एका गोष्टीची जाणीव अव्यक्त राहिली. ती म्हणजे जिथं जिथं संघर्ष सर्जकरूपात अभिव्यक्त होतो तिथं तुम्ही सशरीर असता बाबासाहेब. तुम्ही जसिंताला लिहितं ठेवलं, सगळ्याच वंचितांना तुम्ही प्रेरित केलं. पण संघर्षाच्या प्रक्रियेत ज्ञानर्षी आकार घेऊ शकतो, अशा घटना इतिहासालाही अचंबित करणाऱ्या असतात, बाबासाहेब! हे तुमचं भविष्यमुखी समकालीनत्व मानवी दुःखाशी नातं सांगणारं आहे.

जसिंतानं जेव्हा लॅटिन अमेरिकेत तिच्या कविता सादर केल्या, तेव्हा 'हे तर आमचंच वास्तव आहे' असा फीडबॅक तिला मिळाला. कारण दुःखाला जात नसते, धर्म नसतो, प्रदेश नसतो. तिची एक सोपी कविता पहा-

**'पहाडपर लोग पहाड का पानी पीते है ।**
**सरकारका पानी वहाँ नहीं पहुँचता ।**
**मातृभाषा के लिये वहाँ  स्कूल नही पहुँचता**
**अस्पताल में डॉ. नहीं पहुँचता**
**वहाँ नेटवर्क नहीं पहुँचता**
**जहाँ कुछ भी नही पहुँचता**
**वहाँ धर्म और गाय के नामपर**
**आदमी की हत्या के लिये इतना जहर कैसे पहुँचता है ?'**

जसिंताचं व्यवस्थेलाच टोकदार प्रश्न विचारण्याचं भान या कवितेत व्यक्त होतं. या प्रश्न विचारण्याच्या प्रक्रियेत तिला 'स्व'चं स्वरूप कळत असावं. ही वैचारिक प्रक्रिया म्हणजे तुमच्या आत असलेली एक प्रयोगशाळाच असते, बाबासाहेब! आज दलित, आदिवासी, वंचित तुमच्या या प्रयोगशाळेचा उपयोग करताना दिसतात. हे खूप महत्त्वाचं आहे. पण बाबासाहेब, तुम्ही तुमच्या प्रयोगशाळेला विकसित केलं आणि तुमच्या वैचारिकतेला वैज्ञानिक दृष्टिकोनाचं परिमाण दिलं. हा दृष्टिकोन विज्ञानशाखेशी निगडित असतो, हा गैरसमज तुम्ही दूर केला, बाबासाहेब! हे फार मोलाचं काम आहे. सर्व लोकव्यवहाराचं माध्यम भाषा हेच असतं. आणि सामान्यपणे समाजाच्या अंगवळणी पडलेली परंपरा त्या भाषेला नियत करत असते. ही भाषा टिकून राहावी म्हणून हितसंबंधीय गट स्वार्थासाठी प्रयत्नशील असतात. सामान्य माणसं बोलताना दिसतात. पण त्यांची विचारप्रक्रिया बधिरावस्थेत जाणीवपूर्वक ठेवलेली असते, बाबासाहेब! हे तुम्ही अचूकपणे ओळखलं.

त्या बधिरावस्थेच्या कारणांचा शोध तुम्ही घेतला. शरीर–आत्मा, स्वर्ग–नरक, विविध कर्मकांडं आदी संज्ञांनी भाषेचा गळा घोटल्याचं लक्षात आलं. म्हणून तुम्ही आधी भाषेचा गळा मोकळा केला. तिला तिचं प्रवाहीपण मिळवून दिलं. त्यामुळे तुमची ही भाषा बांधवांच्या विचारक्षमतेला थेट भिडू शकली. त्यांच्या या क्षमतेनं प्रथमच पहाट पाहिली, बाबासाहेब! तुमच्यामुळं प्रत्येकाच्या लक्षात आलं की ही निद्रिस्त विचारक्षमता म्हणजे माणसाच्या आत असलेलं एक inbuilt lighthouse आहे. या प्रकाशात शिक्षणाच्या मदतीनं व्यक्तिमत्त्व उजळलं जाऊ शकतं. बाबासाहेब, तुम्ही वंचितांच्या जीवनात जे मन्वंतर घडवून आणलं, ते भारतभर पसरलं आहे.

या पत्रात जसिंता या आदिवासी कवयित्रीचा मी उल्लेख केला आहे. आता राजू केंद्रे या झपाटलेल्या व्यक्तीचं नाव तुमच्या कानावर टाकावं, असं वाटतं. वंचितांच्या निर्मितिक्षमतेची उंची वाढवून त्यांना नामवंत संस्थांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळावे म्हणून कार्यरत असणारा हा तरुण आहे. तो स्वतः टाटा इन्स्टिट्यूटमध्ये शिक्षण घेत होता. लंडनच्या SCAS या विद्यापीठातही त्यानं शिक्षण घेतलं. त्याचं एकलव्य नावाचं प्रतिष्ठान आहे. तो स्वतः भटक्या जमातीतील मेळघाट (बुलढाणा) मध्ये राहत होता. या प्रतिष्ठानच्या वतीनं वंचितांना शिक्षण दिलं जातं. महाराष्ट्राचं शैक्षणिक धोरण शिक्षण आणि सामाजिक न्याय देण्यात अपयशी ठरलं. ज्या वंचितांचा संबंध फक्त जमिनीशी, झाडाशी आहे, त्यांच्यामध्ये अक्षर रुजवणं किती कठीण असणार! त्यांच्या एका जमातीची भाषा कोरकू. आपल्यासाठी इंग्रजी ही परकी भाषा. कोरकूभाषकासाठी मराठी ही परकी भाषा. राजू केंद्रे यांनी वंचितांच्या आकलनक्षमतेची सुपीकता लक्षात घेऊन अभ्यासक्रमाचं एक कौशल्यपूर्ण नेटवर्किंग अस्तित्वात आणलं. ते म्हणतात, ‘ज्या कोरकूभाषकाला मराठी परकी भाषा वाटत होती, आज तो इंग्रजी लिहितो, बोलतो आहे. हा आमूलाग्र बदल नाही का?’ हे राजू केंद्रेंचे शब्द आहेत बाबासाहेब!

या वंचितांकडे– त्याच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष देण्यासाठी मेंटॉर्स असतात. विद्यार्थ्यांना सक्षम करणाऱ्या मेंटॉर्सचं कौशल्य, कार्यक्षमता आणि जिव्हाळा या गुणांचं सातत्यही टिपलं जातं. या निकषांच्या आधारे मेंटॉर्स, ॲडव्हायझर्स म्हणून त्यांची नियुक्ती केली जाते. या विद्यार्थ्यांसाठी ग्लोबल स्कॉलर प्रोग्राम असतो. हे विद्यार्थी स्वबळावर नामवंत संस्थांमध्ये वा कंपनींमध्ये त्यांच्या नियम–निकषांना यशस्वीपणे उतरतात, शिष्यवृत्ती मिळवतात; ऑक्सफर्ड, केंब्रिज गाठतात. राजू केंद्रे यांचं कार्य दूरवर पसरलं आहे. फोर्ब्स जगातील उत्तम आणि भविष्याभिमुख ३० तरुण कार्यकर्त्यांची निवड करत असते. भारतामधून राजू केंद्रे यांची निवड झाली. लंडनच्या रॉयल सोसायटीचे ते आर्टचे फेलोही आहेत.

ते जेव्हा कोलंबिया विद्यापीठात गेले, तेव्हा त्यांना आनंद झाला, अभिमान वाटला आणि नम्रपणाची भावनाही अनुभवल्याचं एका मुलाखतीत त्यांनी आपलं मत व्यक्त केलं. जणू त्यांचे ज्ञानेंद्रियं बाबासाहेबांसोबत साक्षात् बोलत आहेत असं त्यांना वाटलं. त्या भारावलेल्या अवस्थेत केंद्रे यांना बाबासाहेबांच्या ज्ञाननिर्मितिप्रक्रियेचा आवाका लक्षात आला असावा. कोलंबियाच्या तीन वर्षांच्या कालावधीत मूळ लेखन करत असताना त्यांनी ज्या विविध विषयांवरचे कोर्सेस पूर्ण केले, ते पाहून त्यांचे शिक्षक थक्क झाले. केंद्रे त्या शिक्षकांचा तो अभिप्राय पाहून विनम्र झाले.

म्हणून बाबासाहेब, या पत्रात मी केंद्रेंविषयीची थोडी माहिती तुमच्या कानावर टाकली. ती इतर वंचितांना प्रोत्साहन देणारी आहे.पण केंद्रे मात्र अस्वस्थच दिसतात. कारण सर्व निकषांवर यशस्वीपणे उतरणारे त्यांचे विद्यार्थी मात्र मुद्दाम डावलले जातात. हे त्यांचं शल्य आहे. बाबासाहेब, व्यवस्थेची

मानसिकता एवढी खडकाळ असते का हो? हाच अनुभव केंद्रे आज घेताहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी मुख्य प्रवाहातील कंपन्या–संस्थांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळावं यासाठी ते झगडताहेत. बाबासाहेब! त्यांचे हे खालील दोन शब्द कदाचित तुमच्या स्मृतिबद्ध अनुभवाला जाग आणतील. 'हे असं आहे; पुढे जाणं अपरिहार्य आहे' म्हणजे असं आहे व्यवस्थेचं स्वरूप; हे गृहीत धरून मार्ग काढायचा आहे. आज सायबरविश्वात एक आभासिक व्यवस्था प्रचंड गतीनं आकार घेत आहे. जे प्रगत गुणवंत नेटवर्कनिर्मित आभासिक व्यवस्थेत आहेत, त्यांच्या श्रीमंतीला 'Sky is the limit'. आणि जे नेटवर्कच्या बाहेर आहेत त्यांच्या दारिद्र्याला 'Sky is the limit'. मग असं वाटायला लागतं बाबासाहेब, समाज स्थितिशील असला तरी असमानता विकसनशील असते आणि तो परिवर्तनशील असला तरी असमानता अधिक गतिमान झालेली दिसते. २१ व्या शतकातल्या सामान्य माणसाच्या जीवनातली ही Predicament, हा पेच अधिक धारदार दिसतो आहे, बाबासाहेब! ज्या समानतेमागे तुम्ही संघर्षशील राहिलात आणि राज्यघटनेत जिला 'अक्षर' केलं, तिचं वस्त्रहरण होताना दिसतं आहे. हे तुमचं अपयश नाही, बाबासाहेब! उलट समानतेच्या अक्षरत्वाला एक समृद्ध प्रतीक म्हणून तुम्ही अस्तित्वात आणलेलं आहे. असमानता कालप्रवाहात नॉशिया निर्माण करत असते. समतेची जाणीव नॉशियातील असते. या समतेची रुजवण तुम्ही भारतीयांत केली आणि समतेसाठी संघर्षाला पर्याय नाही, हे सांगितलं.

पण या समतेच्या जाणिवेमागील तुमच्या व्यापक दृष्टिकोनाचं आकलन करण्यात आम्ही कमी पडलो. समतेची सर्वांगीण जाणीव असली की समूहाची निर्मितिक्षमता अंकुरित होत असते. तिच्यात विविधता असते आणि ती समतेच्या जाणिवेला पीळ देणारी असते. ती साधनसंपन्न (resourceful) असल्यामुळे कोणत्याही अडचणीवर मात करण्यात कुशल असते. समतेचा या अंगानं विचार करता येतो, हे आजवर कुणाच्या लक्षात आलं नाही असं वाटतं. कारण मध्ययुगीन जातीय भावनेची आमच्यावरील पकड दिवसेंदिवस घट्ट होते आहे, बाबासाहेब! सर्व भारतातील वंचित समाज आपआपल्या परीनं स्वयंपूर्ण होण्याच्या प्रयत्नात आहे. पण संधीचं क्षितिज व्यापक होताना दिसत नाही. उद्योजकता–अर्थविचार सातत्यानं अधोरेखित झाला पाहिजे आणि तो समतेच्या अंगानेच झाला पाहिजे. कारण समतेच्या वातावरणातच समाजाच्या प्रज्ञेचं पोषण होत असतं ही तुमची मूलभूत धारणा पुसट होते की काय, असं वाटत राहतं, बाबासाहेब! स्वयंकेंद्रितता वाढते आहे. आणि ज्ञानेंद्रियांनी 'स्व'च्या भोवती फिरावं असं प्रस्तुत केंद्राला वाटतं आहे. आणि हे केंद्र मात्र 'काम'या संज्ञेभोवती फिरतं आहे. अल्पवयीन मुलीही शिकार होताहेत. आमच्या आत्ताच्या वृत्तपत्रांवरून नजर फिरवली तर तुमचं संवेदनशील मन व्यथित झाल्याशिवाय राहणार नाही, बाबासाहेब! आमच्या चंगळवादानं आमची विचारनिर्मितीप्रक्रिया बधिर करून टाकली आहे. बाबासाहेब, तुम्ही आम्हाला विचारनिर्मितीचे स्रोत दाखवले, ते मोकळे केले. 'अत्त दीपोभव'तील मुख्य भाव तुम्ही समाजमनापर्यंत नेला. आम्ही घड्याळाचे काटे उलट्या दिशेनं नेले. मन निःसंदर्भ असलेल्या आजच्या तरुणाला जर विचारलं की तुला 'अत्त दीपोभव' याविषयी काय वाटतं? तू कसा विचार करतो? 'त्यात विचार करण्यासारखं काय? प्रत्येकाकडे आज हँडसेट असतो, सर्च करायचं, टॉर्च प्रकाश देतो; वस्तू सापडते, मला मीही सापडतो. यात टेन्शन घेण्यासारखं काय? असं सगळं सोपं झालंय, बाबासाहेब!

❑

# तत्त्वभान दर्शन




दोस्तांनो,

'वर्णमुद्रा' प्रकाशित 'तत्त्वभान'ला अतिशय उत्तम प्रतिसाद लाभला. फेसबुक, रील्स, व्हाटस्‌ॲप, इंस्टाग्राम इत्यादि 'समाजमाध्यमां'वर ग्रंथाची बरीच चर्चा झाली. त्याचप्रमाणे 'अक्षरनामा' या मराठी वेबपोर्टलवर आणि 'मुक्त-संवाद' या नियतकालिकात परिचय प्रसिद्ध झाला. १६ नोव्हेंबर २०२३ च्या 'जागतिक तत्त्वज्ञान दिना'स प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाच्या सर्व प्रती फेब्रुवारी २०२४ अखेर संपल्या, हे निदर्शनास आणून देण्यास आम्हास आनंद होत आहे. लेखक श्रीनिवास हेमाडे आणि प्रकाशक मनोज पाठक यांना व्यक्तिगत प्राप्त झालेले दूरध्वनी, मेसेजेस, इमेल्स आणि प्रत्यक्ष भेटीतील वाचकांच्या प्रतिसादांनी ग्रंथाचे वैचारिक आणि साहित्यिक मोल अधोरेखित झाले. मराठी सारस्वतात एक अनोखी भर पडल्याचा ल. सा. वि. अनेकांनी व्यक्त केला. केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर बृहन्महाराष्ट्र आणि अनिवासी भारतीय मराठी वाचकांकडूनही संपृक्त प्रतिसाद लाभला, हे नमूद करण्यास विशेष आनंद होत आहे.

या निमित्त 'वर्णमुद्रा'च्या अक्षरमांदियाळीतील लेखक आणि आपले सर्वांचे मित्रद्वय तत्त्वज्ञानप्रेमी विचक्षण वाचक -समीक्षक, लेखक प्रा. डॉ. दीपक बोरगावे आणि प्रा. डॉ. सुरेंद्र दरेकर यांनी फेसबुकवर अतिशय विस्तृत प्रतिसाद दिला, त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे कमीच आहेत.

प्रा. डॉ. सुरेंद्र दरेकर यांनी तर फेसबुकवर ‘तत्त्वभान’संबंधी केवळ एकच लेख लिहिला असे नव्हे तर त्यांनी चक्क दहा लेखांची ‘स-विस्तार’ लेखमाला लिहून स्वतंत्र ‘तत्त्वभान दर्शन’ वाचकांना घडवून वैचारिक मेजवानीच दिली. एखाद्या पुस्तकाबाबत इतके विस्तृत लिहिले जावे, ही गेल्या काही वर्षांमधील अनोखी घटना मानली पाहिजे.

‘वर्णमुद्रा’च्या वाचकांसाठी प्रा. डॉ. दीपक बोरगावे आणि प्रा. डॉ. सुरेंद्र दरेकर यांचे ते प्रतिसाद देत आहोत. प्रा. दरेकर यांचे सर्व दहा लेख या अंकापासून अनुक्रमे देत आहोत. ‘तत्त्वभान दर्शन’ दहाव्या समाप्तीच्या लेखाच्या निमित्त लेखक श्रीनिवास हेमाडे यांनी व्यक्त केलेले मनोगतही या अंकात देत आहोत.

आपल्याही प्रतिसादांच्या अपेक्षेत आणि प्रतीक्षेत....

**मनोज सुरेंद्र पाठक**

## श्रीनिवास हेमाडे यांनी व्यक्त केलेले मनोगत

१३ मार्च २०२४ बुधवार

मित्रहो,

‘तत्त्वभान’चे रसिक वाचक आणि रसग्राहक प्रा. सुरेंद्र दरेकर यांच्या ‘तत्त्वभान’च्या रसग्रहणात्मक परीक्षण परिचय लेखमालेतील दहावा लेख देत आहे. जागतिक महिला दिनी ०८ मार्च रोजी हा शेवटचा भाग त्यांनी प्रसिद्ध केला.

डिसेंबर २०२३ ते मार्च २०२४ दरम्यान त्यांचे एकूण दहा लेख प्रसिद्ध झाले.

एका अभ्यासू जिज्ञासू ज्येष्ठ मित्राने एखाद्या ग्रंथाचे इतके दीर्घ आणि साक्षेपी विवेचन करावे, त्यातील शक्तिस्थळे आणि शक्ती पुरवावी लागेल अशा कमकुवत जागा दर्शवून आपले भाष्य व्यक्त करावे आणि त्या ग्रंथाच्या पुढील वाटचालीची दिशा अधोरेखित करावी, ही मराठी वैचारिक साहित्यातील दुर्मीळ घटना बऱ्याच काळाने घडत आहे.

ग्रंथपरीक्षणे, परिचय विविध वैचारिक नियतकालिके, संशोधन पत्रिका आणि वृत्तपत्रे इत्यादी माध्यमांमधून येतच असतात. त्यांना काही मर्यादा येतात. पण गेल्या दशकापासून समाज माध्यमे अतिशय प्रभावी आणि जागतिक दर्जाची ठरत असून त्यांची पोचही आंतरराष्ट्रीय पातळीवर जात आहे.

प्रा. सुरेंद्र दरेकर यांची ही ‘तत्त्वभान’च्या निमित्ताने ही परिचय-परीक्षण लेखमाला त्या दर्जाला आणि त्या पातळीवर पोचली आहे, हे आपल्या लक्षात आणून देण्यात मला विशेष आनंद होत आहे.

दरेकर यांच्या या लेखमालेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची शीर्षके. लेखनाला काहीएक शीर्षक असणे नितांत आवश्यक असतेच. पण प्रस्तुत लेखमालेच्या प्रत्येक लेखाचे शीर्षक एकमेवाद्वितीय आणि एवम् गुणवैशिष्ट्यपूर्ण झाले ते त्यांनी प्रत्येक लेखाच्या आशय आणि विषयाच्या मांडणीनुसार थेट ज्ञानरायांच्या ज्ञानदेवी- ‘ज्ञानेश्वरी’शी नाते जोडल्यामुळे!

प्रस्तुत अंतिम परिचय लेखाचेच शीर्षक पाहा. ते आहे :

**तेथ अभिप्रावोचि अभिप्रायातें विये : तत्त्वभानच्या निमित्ताने -१०**

ही ‘ज्ञानेश्वरी’ अर्थात ‘भावार्थदीपिका’च्या अध्याय ९ च्या २७ व्या श्लोकातील ओळ आहे. पूर्ण श्लोक आहे.

**अर्थ बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्रावोचि अभिप्रायातें विये ।**
**भावाचा फुलौरा होत जाये । मातीवरी ।।**
**म्हणौनि संवादाचा सुवावो ढळे । तऱ्ही हृदयाकाश सारस्वते वोळे ।**
**आणि श्रोता दुश्चिता तरी वितुळे । मांडला रसु ।।**

याचा अर्थ असा की सामान्यतः वक्ता बोलतो आणि मग त्याला अर्थ प्राप्त होतो. आधी 'शब्द' मग 'अर्थ'. (meaning precedes word) इथे मात्र अर्थ शब्दांच्या आधी प्रकट होतो. जणू काही 'शब्द' कधी प्रकट होईल आणि कधी त्यात आपण सामावले जाऊ, अशी वाट बघत अर्थ आधीच येऊन उभा राहिला आहे (word precedes meaning). मग अर्थांनी तो शब्द विचार परिपक्व होतो, त्याचा अभिप्राय बनतो. पुढे एक अभिप्राय दुसऱ्याला जन्म देतो. वक्ता आणि श्रोता यांच्यात संवाद शृंखला गुंफली जाते. संवाद म्हणजे वक्त्याच्या विचारांशी श्रोत्यांची होणारी अनुकूलता! या संवादाला सुवायूची (सुवावो) उपमा देतात. सुवायू म्हणजे, जलवर्षाव करणाऱ्या मेघांना एकत्र आणणारा वायू. सुवायूमुळे मेघ एकत्र येतात. जलवर्षाव करून तृषार्त धरतीला सचैल करतात. तसे वक्ता व श्रोता यांच्यात सुमेळ साधला जातो. वक्त्याला जे म्हणायचे आहे तेच नेमके श्रोत्याच्या मन, मेंदूपर्यंत जाते आणि तसे वर्तन घडत जाते.

'भावार्थदीपिका'मधील ओळींचे उपयोजन 'तत्त्वभान'च्या परिचय-लेखांसाठी अर्थपूर्ण शीर्षकाच्या रूपात करून प्रा. दरेकर यांनी 'तत्त्वभान'मधील प्रत्येक लेख, त्यातील विषय, मुद्दे यांची नाळ आपल्या परंपरेशी जोडली आहेच, पण पुस्तकातील प्रतिपाद्य विषय अधिक आध्यात्मिक (metaphysical) पातळीवर उंचावला आहे. हा एक वेगळा तात्त्विक दृष्टिकोन आहे. त्याचे आपण मनापासून स्वागत करणे हाँ उत्तम प्रतिसाद आहे.

आपली 'मायमराठी' तत्त्वचिंतनाला अतिशय मौलिक मूलभूत उपयोजानाची भाषा आहे, ती कोणताही कठीण तत्त्वविषय मांडू शकते. ती भाषा, शब्द, संज्ञा, संकल्पना आणि संकल्पनाप्रवाह, गहन अर्थवत्ता अर्थहानी न होता सुकर करण्याची परिपूर्ण क्षमता ही भाषिक व तात्त्विक आयुधे आणि लय, ताल, सूर, गेयता ही सौंदर्यसाधने इत्यादींनी परिपूर्ण संपृक्त आहे, याचा आदर्श ज्ञानदेवांनी शेकडो वर्षांपूर्वी घालून दिला. इंग्लिश जागतिकच नव्हे तर आंतरभारतीचीही ज्ञानभाषा बनली आहे, हे वास्तव बनल्याच्या पार्श्वभूमीवर आपल्या मराठी सारस्वतांच्या मातृभाषेत – आपल्या मराठीत ज्ञाननिर्मिती केली पाहिजे याचा जणू दंडक ज्ञानदेवांनी फार पूर्वीच घालून दिला. तेव्हा तर संस्कृतचा बडेजाव होता. त्याला आव्हान देऊन आणि आवाहन करत त्यांनी मराठीत ज्ञाननिर्मिती केली. ती परंपरा आपण मराठी भाषक लोकांनी चालवली पाहिजे, यात शंका नाही. त्या परंपरेचा मी पाईक बनू शकण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे, याचे मला समाधान आहे. इतर सुजाण मित्रांना त्याचे सहर्ष 'निमंत्रण' आहे.

सुईण मातेपासून बाळाची नाळ तोडून त्याचा जगातील प्रवेश सुकर करते. जगाला नव्या आगमनाची चाहूल देते. त्याला स्वतंत्र अस्तित्वाची जाण होत राहील असे पाहते. प्रा. दरेकर यांनी ही नाळ तोडली नाही तर; ज्ञानाच्या प्राचीन परंपरेशी नाळ जोडण्याचे सुईणीचे महत्कार्य 'तत्त्वभान'संदर्भात केले आहे, ही अतिशय मौलिक व थोर साहित्यिक आणि तत्त्वज्ञानात्मक घटना आहे. त्यांच्या शीर्षकांनी सर्व लेख आशयघन सजले आहेत, यात शंका नाही.

प्रा. दरेकर यांच्या परीक्षणलेखाचे आणखी एक दृश्य वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे चित्रमय सादरीकरण.

प्रत्येक लेखाला त्या लेखाचे प्रारंभपृष्ठ आणि तत्त्ववेत्त्यांची छायाचित्रे यांची सुंदर व आकर्षक मांडणी त्यांनी केली आहे. असे 'कलात्मक काम' (Art Work) करणे फारच वेळ देऊन मन लावून करावे लागते. चित्रे शोधणे, पृष्ठाचे छायाचित्र काढणे, ते योग्य त्या PPT मध्ये रचणे हे मोठे किचकट काम आहे. ते सारे श्रम प्रा. सुरेंद्र दरेकर यांनी केले!

मित्रहो, आपण जाणतोच की 'तत्त्वभान' हा ग्रंथ वैचारिक आहे, तत्त्वज्ञानाचा निरपेक्ष परिचय करून देणारा आहे. पण तो परिचय शुष्क, कोरडा, तर्ककर्कश आणि वाचकांना कमी लेखणारा, त्यांना तुच्छ लेखणारा, त्यांच्यावर अविश्वास दाखवणारा नाही. उलट त्यांना सोबती समजणारा, त्यांच्यावर विश्वास दाखवणारा, त्यांना वैचारिक प्रवासातील मित्र-सोबती समजणारा, त्यांना समान समजणारा आहे. त्याच्या लेखनात आणि रचनेत लालित्य आहे. लेखक वाचकांना 'निमंत्रण' देतो आहे. वाचकांना हळुवारपणे तत्त्वचिंतनाचे प्रशिक्षण देऊ पाहतो आहे, तत्त्वज्ञान विषयाचे (पूर्वसुरींनी निर्माण केलेले) पारंपरिक भय दूर करून 'तत्त्वचिंतनाशी मैत्र कसे साधावे' याची दिशा दाखवणारा आहे. या अर्थाने ज्ञानदेवांशी माझी नाळ जुळते, हे प्रा. दरेकर यांनी अधोरेखित केले आहे, याबद्दल मी त्यांचे किती आभार मानावेत याचा मला उमज पडत नाही.

प्रा. सुरेंद्र दरेकर यांच्या ह्या समग्र परिश्रमाचे कौतुक करावे, ते कमीच आहे. मी माझ्याकडून आणि ज्या वाचकांसाठी त्यांनी हे अथक परिश्रम घेतले, त्या सर्व वाचकांच्या अर्थात तुमच्यातर्फे मी त्यांच्या ऋणात राहणे योग्य समजतो.

**– श्रीनिवास हेमाडे**

❑

## म्हणुनि संवादाचा सुवाओ ढळे : तत्त्वभानच्या निमित्ताने – १

**प्रा. डॉ. सुरेंद्र दरेकर**

**लेखांक ०१, प्रसिद्धी दिनांक : ०८ डिसेंबर २०२३**

अतिशय बांधेसूद व उत्कृष्ट मुद्रणातील देखण्या रूपाकाराचे 'तत्त्वभान' पुस्तक हाती आल्यावर एका वेगळ्या विषयावरील ग्रंथप्राप्तीचा अनोखा आनंद होणे स्वाभाविकच. मराठीत अशी पुस्तके क्वचितच बघायला मिळतात. यापूर्वी दीप्ती गंगावणे यांचे 'युरोपीय तत्त्वज्ञानाच्या पाऊलखुणा' वाचताना अशीच भावना होती.

या पुस्तकाचे स्वरूप बरेच संश्लिष्ट प्रकारचे असले तरी यातील मुख्य गाभ्याचा विषय म्हणजे २०१४ मध्ये वर्षभर लोकसत्ता दैनिकात साधारण तत्त्वज्ञानीय अंगाने लिहिलेल्या पन्नास स्फुट लेखांचे संकलन असा आहे. जीएंना उल्लेखत जवळपास जी.ए. शैलीतच सोलापूर या गावास समर्पित अर्पणपत्रिका व ऋग्वेदातील स्वस्तिसूक्ताने सुरू होत तत्त्वज्ञान अभ्यासक डॉ. शरद देशपांडे यांच्या प्रतिक्रियेशी संपणारा हा ग्रंथ एका बैठकीत नाही तरी सलग आतुरतेने वाचावा असाच आहे.

लेखकाने या ग्रंथामागील भूमिकेचे सूतोवाच यातील 'तत्त्वभानचे निमंत्रण' या मनोगतात पहिल्याच परिच्छेदात करत नंतर अभ्यासपूर्ण तरी सुघड नर्मविनोद शैलीत तिचा विस्तार केला आहे.

त्यानुसार सदर लेखांचा हेतू तत्त्ववेत्ता मनीषीवर्ग ज्या गहन प्रश्नांचा शतकानुशतके उहापोह करत आले आहेत त्यांच्या सखोल विवेचनाचा नसून त्याविषयी केवळ 'भान' देण्याचा, जिज्ञासा चेतवण्याचा आहे. म्हणजेच त्यातील तत्त्वप्रचुर प्रमेयात्मकता वगळून असा विषय अगदी नवशिक्या तत्त्वप्रेमींना कळेल अशा भाषेत मांडण्याचा आहे. हीच या ग्रंथाची मर्यादाही असल्याने शंकाप्रद विवाद्य व गंभीर विषयसंबंधाने दुराग्रह टाळलेला आहे.

एका व्यापक दृष्टिकोनातून हे अशा चर्चेत सर्वांना सहभागी करून घेण्याचे निमंत्रण आहे. यातील निमंत्रण व आमंत्रण, तसेच तत्त्वज्ञानीय चिंतन व विमर्श या संकल्पनांतील भेद स्पष्ट करण्याच्या दृष्टीने महर्षि पाणिनी ते रेने देकार्त यांना संबोधत केलेले विवेचन अतिशय मूलगामी स्वरूपाचे आहे. यामध्ये मला भावलेल्या दोन गोष्टी म्हणजे अमेरिकन तत्त्ववेत्ता विदुषी मेरी वॉरनॉक यांचे 'तत्त्वज्ञान हा असा खेळ आहे की ज्यात जगातील कोणत्याही माणसाला भाग घेता येतो.' हे अखंड शिवणीचे अपरिमेय वस्त्र आहे की ज्यात प्रत्येक व्यक्ती धागा विणणारी कबीर बनू शकते हे उद्धृत आणि डच-ज्यू तत्त्ववेत्ता बारूच स्पिनोझाचे 'What Paul says about Peter tells us more about Paul than about Peter' हे उद्धृत (प्रा. मे. पुं. रेगे यांनी रसेलच्या 'तत्त्वज्ञानाच्या समस्या' या अनुवादित ग्रंथाच्या आरंभी हे उद्धृत दिलेले आहे) या दोन्ही उक्तींचे अनेक अर्थ रूढ असले तरी त्याचा मथितार्थ 'ज्याविषयी बोलायचे आहे अशा वस्तुनिष्ठतेला आत्मपर वरचढ असू नये', हे पथ्य लेखकाने सर्वत्र राखले आहे. त्यामुळे हा ग्रंथ कथित संकल्पानुसारी सर्वतोसुलभ तसेच स्वीकृत झालेला आहे असे निश्चितच म्हणता येईल, हे या लेखांना सर्वक्षेत्रीय मान्यवरांनी दिलेल्या प्रतिसादावरून दिसून येते. हे प्रतिसाद ग्रंथाच्या शेवटी 'प्रस्तावनेऐवजी' या शीर्षकाखाली स्वतंत्र विभागात दिले आहेत.

हा विभाग सहा संवादगटांत विभागला असून त्यांची व्याप्ती किमान एक परिच्छेद ते अडीच ते तीन पृष्ठांची आढळून येते. यात विस्तारभयास्तव नामनिर्देश न करता बोलायचे तर कला, साहित्य, संस्कृती, समाजकार्य, राजकारण, तत्त्वज्ञान व वैचारिक जगताच्या सर्व क्षेत्रांतील मान्यवरांचा समावेश दिसून येतो. यात मला भावलेली गोष्ट म्हणजे या प्रतिक्रिया केवळ उथळ जुजबी प्रोत्साहन शुभेच्छापर नसून या व अशा उपक्रमांच्या आवश्यकतेचे प्रतिपादन करणाऱ्या आहेत. प्रातिनिधिक स्वरूपात यातील डॉ. सुधीर रसाळ यांची पुस्तकारंभी दिलेली प्रतिक्रिया घेतली, तर प्रबोधनाचा ऐतिहासिक वारसा पाहता वर्तमानात आपण एक समाज म्हणून वैचारिकात कितीसे विवेकी पुरोगामी विधायक आहोत याची त्यांनी सप्रमाण कडक हजेरी घेतली आहे. ते मुळातूनच वाचण्यासारखे असले तरी त्यातील 'विचारवंताच्या सामाजिक प्रश्नांवरील विचारांमागे जर तात्त्विक भूमिका नसेल तर ते विस्कळीत आत्मविसंगत गैरलागू होण्याचा धोका असतो', सारखे एखादे वाक्यही आपण कालौघात एका मौलिक परंपरेची घोर उपेक्षा केल्याचे द्योतक म्हणावे लागेल. या एकूणच लेखमालेचा काहीशा तपशिलात सविस्तर विचार करणे आवश्यक आहे. तरीही इंग्रजीत ज्याला 'सामान्य भाषा तत्त्वज्ञान' (Ordinary Language Philosophy) म्हणतात त्याला थोड्या वेगळ्या अर्थाने तरीही काहीसे समांतर या पुस्तकाने साध्य केले आहे असे म्हणता येईल. या दृष्टीने या पुस्तकाच्या अंतरंगाचा क्रमशः जमेल तसा आढावा घेण्याचे तूर्तास योजिले आहे. एकुणात संग्रही असावा, अशा या ग्रंथाबद्दल लेखक, प्रकाशकांचे अभिनंदन.

**प्रतिसाद**

Sunil Salunke : तत्त्वभान वाचायची उत्सुकता वाढवणारे विश्लेषण.

Sharad Deshpande : मीही या पुस्तकाबद्दल लिहायचे ठरविले आहे. ही तुमची प्रतिक्रिया मार्गदर्शक आहे.

Surendra Vithal Darekar :

Sharad Deshpande : मी जमेल तसे सवडीने आस्वादपर लिहिणार आहे. तुम्ही विद्याशाखीय पद्धतीने याचे जरूर परीक्षण करावे. मलाही ते उपयुक्त होईल.

Ashwini Ayachit : मला हे पुस्तक हवे आहे. पुस्तकपेठेत मिळेल काय?

Shriniwas Hemade : मनापासून धन्यवाद सुरेंद्रजी!

प्रोफेसर शरद देशपांडेही लिहिणार आहेत, हा दुग्धशर्करा योग आहे. तुम्ही दोघे मान्यवर लिहिता आहात, ही मला उत्साहित करणारी गोष्ट आहे. दोघांचेही मनःपूर्वक धन्यवाद, पुन्हा एकदा.

Deepak Borgave : मीही वाचतो आहे, सुरेंद्र.

Vilas Wagholikar : अशा पुस्तकांची अनुक्रमणिका महत्त्वाची ठरते. धन्यवाद.

## ।। 'तत्त्वभान' या पुस्तकाच्या निमित्ताने ।।

**दीपक बोरगावे**

**प्रसिद्धी दिनांक : १४ डिसेंबर २०२३**

'तत्त्वज्ञान' हा विषय प्रत्येक व्यक्तीसाठी महत्त्वाचाच असतो. तो प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात धर्म, राजकारण, अर्थकारण, कुटुंब, समाज, शिक्षण, साहित्य, कविता, सिनेमा, स्त्री-पुरुष नाते, लैंगिकतेचे प्रश्न, सत्तेचे प्रश्न, सत्ताकेंद्राचे प्रश्न, सत्तेचा हलता लंबक, हिंसा, अहिंसा, दारिद्र्य, भूक, भूकबळी, चित्र, फोटोग्राफ्स, टेलिव्हिजन, पुस्तके किंवा आजची उदाहरणे सांगायची झाल्यास अँड्रॉइड फोन, लाखो ऑनलाईन साइट्स, व्हाट्सॲप, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर... अशा हजारो विषयाच्या निमित्ताने कोणत्या ना कोणत्या रूपात तो उपस्थित होतच असतो. पण हे त्या व्यक्तीला समजतेच असे नाही. काही जणांना ते समजते, पण त्याचे संपूर्णतः आकलन किंवा भान निर्माण होतेच असे म्हणता येत नाही. आपण बऱ्याचदा हा विषय जिथल्या तिथे सोडून देतो आणि हा काही आपला विषय नाही, म्हणून रिकामे होऊन जातो.

काही लोक असे म्हणतात की, तत्त्वज्ञान वगैरे शिकवू नको आम्हाला. तुझा 'शानपणा' तुझ्याकडेच ठेव. आम्हाला काय करायचंय तुझ्या तत्त्वज्ञानाशी, लेका? तुज्या शाळंत दिवं लावात जा तिकडं.

असे म्हणून कोणतीही व्यक्ती तत्त्वज्ञानापासून आपली सुटका करून घेऊ शकत नाही. हा विषय असतोच नेहमी... स्वतःभोवती, मोबाईलच्या स्क्रीनवर, एखाद्या भयंकर ऑनलाइन साइटवर, घराच्या बाहेर, रस्त्यावर आणि भर बाजारातसुद्धा.

संगीत, कविता, कादंबरी, लोककला, नाटक, सिनेमा, आर्थिक प्रश्न, समाजकारण, राजकारण,

सांस्कृतिकीकरण (Culturalisation), समाजीकरण (Socialization), ज्ञान, शिक्षण, निरक्षरता, ज्ञान लपवण्याची साधने, ज्ञान पाजळण्याचे मार्ग... या आणि अशा गोष्टी खूप दूर राहिल्या. निव्वळ जगण्याचे प्रश्न जरी आपण लक्षात घेतले, तरी त्याच्याशी तत्त्वज्ञानाचा संबंध हा कुठल्या ना कुठल्या अर्थाने येतच असतो.

असो... हा प्रश्न तसा फार मोठा आहे. म्हणूनच मनोज पाठक यांनी आमचे मित्र श्रीनिवास हेमाडे यांचे 'तत्त्वभान' हे जे पुस्तक प्रसिद्ध केले आहे (वर्णमुद्रा प्रकाशन, शेगाव २०२३) ते तत्त्वज्ञानाशी कुठल्याही अर्थाने संबंध नसणाऱ्याने तर प्रथमतः वाचायला हवे असे मला स्वतःला वाटते.

अशी एक गोष्ट नेहमी सांगितली जाते बघा. म्हणजे मी शाळा महाविद्यालयात असल्यापासून ती ऐकत आलो आहे. पुढे साहित्य आणि संस्कृतीचा गांभीर्याने अभ्यास करायला सुरू केल्यानंतरदेखील, ही गोष्ट मी नेहमी इकडेतिकडे वाचत, ऐकत आलो आहे. काय बरं ही गोष्ट? तत्त्वज्ञान हा विषय फार अवघड असतो. त्याच्या नादाला कोणी लागू नये वगैरे... हे काम तत्त्वज्ञानाचा सर्वंकष अभ्यास असलेलाच माणूस करू शकतो वगैरे वगैरे, हे अर्धसत्य आहे. मी स्वतः 'तत्त्वज्ञान' या विषयाचा रीतसर अभ्यासक जरी नसलो, तरी तत्त्वज्ञान हा विषय साहित्य, समाज, संस्कृती, इतिहास, मानसशास्त्र, राजकारण, अर्थकारण या अंगाने मी अभ्यासत आलोच आहे. त्यानिमित्ताने अनेक ग्रंथ.... अगदी झाक देरिदापर्यंत आडवेतिडवे वाचून काढले आहेत.

'तत्त्वज्ञान' हा विषय कोणालाही समजू शकतो, असा माझा स्वतःचा एक समज आहे. आणि श्रीने (श्रीनिवास हेमाडे) हे आपल्या पुस्तकातून समजावून सांगून हे सिद्धच केले आहे (अर्थात तो 'तत्त्वज्ञान' या विषयाचाच रीतसर प्राध्यापक असल्यामुळे त्याला हे सहज शक्य झाले आहे).

तत्त्वज्ञान हा विषय अवघडच असतो यात काही वाद नाही. पण तो अजून अवघड करून सांगण्याची एक पद्धती आपल्या संस्कृतिविश्वात विद्वानांनी रूढ केली आहे. याला छेद देण्याचा यशस्वी प्रयत्न हेमाडे यांनी केला आहे.

'तत्त्वज्ञान' हे आपणाला समजू शकते. त्याचा आपल्या प्रत्यक्ष जगण्याशी संबंध काय असतो, याची जाणीव होऊ शकते. म्हणून तर 'तत्त्वभान' हे सदर 'लोकसत्ता' सारख्या दैनिकातून प्रसिद्ध होत गेले आणि त्याला साक्षेपाने चांगला अशा प्रकारचा प्रतिसादही मिळाला. हाच या गोष्टीचा दणकट पुरावा आहे. शेवटी, समाजात आम्हां मास्तरांचा हा असा मोठा अन्वय असतोच, हे असे प्रबोधित करण्याचे उद्योग मीही नेहमीच करत असतो.

असो... हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यापासून यावर वाचकांच्या उड्या पडत आहेत. या पुस्तकाची पहिली आवृत्ती संपण्याच्या मार्गावर आहे, हे यावरून सिद्ध होते. याची लवकरच दुसरी आवृत्तीदेखील प्रकाशक नक्की काढतील यात मला काही संशय येत नाही.

'तत्त्वभान' नावाची गोष्ट आपल्यात उपस्थित असतेच. त्याचा साक्षरतेशी, निरक्षरतेशी; सुसंस्कृततेशी, अ-सुसंस्कृततेशी (?); सभ्यता आणि असभ्यतेशी काहीही संबंध नसला, तरीही हे पुस्तक वाचल्यानंतर किमान साक्षर, सुसंस्कृत आणि सभ्य वाचकांच्यात हे 'तत्त्वभान' या पुस्तकामुळे अधिक गडद होईल याबद्दल शंका वाटत नाही.

❑



# सायलेंट आणि इतर कविता

## रवीन्द्र दामोदर लाखे




मनात चाललेलं बाहेर येण्यासाठी आपल्या नकळतही आपले काही प्रयोग चाललेले असतात. अगदी सामान्य माणसाचेही. खूपदा प्रयोग आयुष्याच्या पृष्ठभागावर चाललेले असतात. हे प्रयोग म्हणजे युक्त्या-प्रयुक्त्याही असू शकतात. जुन्या जाणत्या कवींचे असे प्रयोगही अथांग आशय देणारे म्हणून गाजले आहेत. जगण्याचे प्रयोग कधी कधी चमत्कृतीसारखे असतात. जादूई वास्तवाच्या मागे लागताना कधी कधी वास्तव मागेच विसरलं जातं आणि जादुई मात्र साथ देत राहतं. असं काहीसं सागर अचलकरच्या 'सायलेंट आणि इतर कविता' या संग्रहातून दिसून येतं. काही रचना विलक्षण आहेत. आपल्यात जेलसी निर्माण करणाऱ्या आहेत. या रचनांमधली विलक्षणता आपल्याला कुठं घेऊन जाते- ते पाहू.

**काळ्या रंगाविरोधात**

काळ्या रंगाविरोधात
घोषणा देत एक जनसमुदाय
जात आहे काळ्या डांबरी रस्त्यावरून,

काळ्या रंगाचं जे काही दिसेल
त्यावर ते दगड भिरकावून पाहत आहेत

इतक्यात आकाशात त्यांना आकाशात काळे ढग दिसतात:
मग ते ढगांवर दगडी हल्ला चढवतात

काही वेळात
पाऊस सुरू होतो आणि
काळे ढग नष्ट होतात.
मोर्चा निघालाय आता
ढग आम्हीच नष्ट केल्याच्या आविर्भावात

अंधाराच्या
दिशेने.

जमावानं एकदा ठरवलं की काळा किंवा हिरवा किंवा भगवा रंग वाईट की माणसाचा या बाबतीतला प्रक्षोभ आता अशा टोकाला पोचलाय की त्या रंगांचा निसर्गही नष्ट करायला तो मागे पाहणार नाही. पण इथल्या युक्तीत एक गोष्ट अशी आलेली आहे की त्या काळ्या ढगांवर दगड भिरकावला तर पाऊस पडतो– हे कसं काय? आशयाची रेषा पटकन वेगळं वळण घेते आणि ती संपूर्ण कवितेला वेटोळं घालते. ते वेटोळं असं असतं की तेच फक्त दिसतं. या कवितेतला माणसाचा प्रक्षोभ सर्जनशील म्हणावा का? तर तसं नाही म्हणता येत. आकाशातल्या काळ्या ढगांवरही दगड फेकण्याची कवितेतली युक्ती आपल्या कुठल्याही आयुष्यविषयक आशयाचा आयाम दाखवत नाही. पण एकूण कविता वाचली तर ती मोहवून टाकते. या संग्रहातील प्रत्येक कवितेत वाचकाला संमोहित करायची ताकद आहे.

काही कविता तुम्हाला काव्यात्मक अन्वय लावायला कंपल्शन करते. जसा जादूगार आपल्याला संमोहित करून काही गोष्टी करवून घेतो. उदाहरणार्थ ही कविता पाहा :

**टाके**

तू सुईवर एक अर्धवट
ओळ लिहिलीस.
आणि मी
दोरीवर एक
अर्धवट ओळ लिहिली.

कुणीतरी माझी ओळ
तुझ्या ओळीत ओवली :

आणि पाहतो तर काय!
पानभर टाकेच टाकेच.

सुई दोरा अशी जोडी त्यांच्या कार्यानुसार प्रसिद्ध आहे. कवीने इथं मी दोऱ्यावर लिहिली एक अर्धवट कविता असं म्हणणं सयुक्तिक ठरलं असतं.

कुणीतरी माझी ओळ
तुझ्या ओळीत ओवली

कवितेच्या इथपर्यंतच्या टप्प्यावर वाचक संमोहित झालेला असतो. कवीही कदाचित. त्या संमोहनावस्थेत कवीच्या या कवितेत वरच्या सर्व ओळींशी दूरान्वये संबध असलेली एक प्रतिमा येते. पान वहीचं किंवा कवितेचं पान. आणि पानभर टाकेच टाकेच. टाका आणि जखम यांचं एक नातं उगाचंच वाचकाच्या मनात उमटतं; पण काव्यात्मक चिंतनाची रेषा स्पष्ट नसल्यामुळे काव्य नेहमी पृष्ठस्तरीयच राहतं.

अर्थात काही कविता आहेत ज्यांना काव्यात्मक चिंतनाची जोड मिळाली आहे. त्या कविता मात्र एक वेगळीच उंची गाठतात. ती उंची समग्र मराठी कवितेत उठून दिसेल अशी आहे. तिला अनन्यसाधारण म्हणता येईल एवढी. उदाहरणार्थ पुढील कविता पाहा –

**कवीची आत्महत्या**

पहिल्याच ओळीत
कवीची आत्महत्या असते
मात्र,
कवी शिताफीने टाळतो पहिल्या ओळीला;
आणि कवितेची सुरुवात करतो
थेट दुसऱ्या ओळीपासून ...

लोक विचारतात कवीला
पहिल्या ओळीबद्दल;
पण कवी अत्यंत चलाखीने दुसऱ्या ओळीकडे
बोट दाखवतो आणि लोकांचं लक्ष
विचलित करतो.

पहिली ओळ टाळूनही,
कवीला भीती वाटत आहे पहिल्या ओळीची
लोकांचं लक्ष विचलित करूनही
त्याला भीती वाटत आहे लोकांच्या प्रश्नांची.

लोक आपल्याकडून पहिली ओळ लिहून घेणारच;
याची कवीला आता खात्री पटत चाललीये.
कवीला आता जास्त दिवस टाळता येणार नाही
पहिल्या ओळीला.

कवीची पहिली ओळ, शेवटची ओळ ठरणार आहे
याची लोकांना कल्पना नाहीये.

सापडलेल्या युक्तीचा किंवा व्यक्त होण्याच्या तंत्राचा वरील कवितेत मंत्र झाला आहे. या संग्रहातील अशा काही कवितांमुळे आज प्रसिद्ध होणाऱ्या तरुण कवींच्या कवितासंग्रहांपेक्षा हा संग्रह उजवा वाटू शकेल, असे वाटते. सागरनं त्याला सापडलेल्या युक्तीचा वा तंत्राचा अंगभूत मंत्र होईस्तोवर वाट पाहावी - आणि पुढे कविता लिहावी - थोडक्यात, या संग्रहाचे वाचन वाचकाला आनंद देऊन जाते.

सायलेंट आणि इतर कविता
कवी : सागर अचलकर
मूल्य : १५० रुपये
प्रकाशक : वर्णमुद्रा प्रकाशन, शेगाव

❑





# ते कोण लोक आहेत

## जनसामान्यांच्या अस्वस्थ जीवनाचे पडसाद

## किरण शिवहर डोंगरदिवे



''कौन है ये लोग'' असा एक संवाद एका चित्रपटातील नायक परिणामकारकतेने बोलला होता. ते वाक्य मला कायमस्वरूपी स्मरणात राहिले. सामान्य माणसाच्या न्याय हक्कासाठी चित्रपट असो वा साहित्य, एक सशक्त माध्यम असते आणि त्याचा योग्य वापर झाला की कधी 'जॉली एलएलबी' तर कधी 'जय भीम'सारख्या चित्रपटकृती बाहेर पडतात आणि मनाला अस्वस्थ करतात. साहित्याचंही थोड्याफार फरकाने तसंच आहे; मात्र या ठिकाणी दृश्याची परिणामकारकता नसल्याने साहित्यिकांचा कस जास्त लागत असतो. दुर्दैवाने आजच्या काळात मोठ्या प्रमाणात फक्त प्रसिद्धीसाठी गोलमोल लिहिणारे साहित्यिक यांचे प्रमाण जास्त आहे. वैचारिक कुपोषण पाहिले आणि तशामध्ये 'ते लोक कोण आहेत' हा पांडुरंग सुतार यांचा संग्रह नुकताच वाचण्यात आला की, सामान्य माणसाच्या वेदनेला वाचा फोडणारे साहित्यिक अजूनही अस्तित्वात आहेत याची खात्री पटते. आणि मराठीत अजूनही गांभीर्याने लिखाण करणारे कवी आहेत, याबाबतची खात्री देता येते. वर्णमुद्रा पब्लिशर्स यांच्याकडून आलेल्या ह्या देखण्या संग्रहात एकूण तीन भागात ४७ कविता आहेत. ह्या तीन भागातील पहिला भाग म्हणजे 'पाठ फिरवून चालत गेलेले लोक' हा होय. या विभागातील पहिल्या 'कदाचित' या कवितेत कवी म्हणतात,

मी कविता लिहिली नाही तरी
लाल तांबड्या मुरमाड मातीतून सृजनासाठी
आसुसलेल्या बीजांतून कोंभ टरारू लागतील

असे सांगून कवी कविता लिहिली नाही तरी जगातील कोणत्याही घटनांना विशेष फरक पडणार नाही. जगरहाटी सातत्याने सुरू राहील. निसर्ग त्याच्या ताकदीने स्वतःचे काम करत राहील, याची जाणीव असल्याचे सूचित करत असतात. त्याचप्रमाणे कवींनीसुद्धा आपण जगाचे सर्वेसर्वा आहोत ह्या भ्रमात राहू नये असे सुद्धा त्यांना सुचवायचे असावे असे वाटते. मात्र असे असले तरी कवी जगाला आकार देण्याचे काम करतात, हे सांगत असताना 'कवितेच्या उदास दुपारी' या कवितेत–

'त्रयस्तासारखा निघून गेला नसता मंटो कवितेच्या अशा उदास दुपारी....'

असे कवी म्हणतात, तेव्हा कवी प्रत्येक संवेदनशील गोष्टीवर व्यक्त होतो. तो त्रयस्थपणे निघून जाऊ शकत आहे, असे सूचित करतात. याच कवितेत देशाच्या फाळणीचे काही संदर्भ कवीने अगदी बेमालूमपणे पेरले आहेत. एखाद्या कवितेत हातोड्याची टकटक करत राहणारे कामगार, तर एखाद्या कवितेत भुकेल्या, पोटुशी, नागव्या स्त्रीकडे पाहून नंतर कॅनव्हासवर तिचे चित्र रेखाटणारा अस्वस्थ असा चित्रकार, नेहमीसारखा होमवर्क करण्याचा कंटाळा येणारी शाळेतील विद्यार्थिनी. हे सर्व लोक आपल्या आजूबाजूला असतात, मात्र आपल्या कवितेचे विषय आपल्या आजूबाजूला आहेत ते नेमकेपणाने टिपून शब्दचित्रासारखे ते वाचकांसमोर उभे करण्याचे कसब पांडुरंग सुतार यांना जमून आले आहे.

'कधी कधी खेळण्यांशी एकट्याने खेळत बसतात मुले
एकट्याने रडूनही घेतात, दमतात रडून रडून'

अशा ओळीतील भयावह वर्तमान, किंवा त्याच कवितेतील 'मुलांचे झोपेत बंदुकीचे स्वप्न पाहणे' ह्या संकल्पना वर्तमानकाळातील भावनाशून्यता, लहान मुलांचे एकाकी जीवन, त्यामुळे विभक्त कुटुंब आणि त्यातील एकाकीपण त्यातून मुलांना हवी तेवढी सुरक्षितता न मिळणे, यांत्रिक होऊन जाणे यातील मध्यमवर्गीय दुःख कवींनी सूक्ष्मपणे टिपले आहे. 'खिडकीतून', 'तटस्थतेच्या अत्युच्च टोकावर', 'युद्ध कदाचित नंतर सरून जाईल' अशा कवितांमधून जनसामान्यांबाबत कवीने केलेले भाष्य महत्त्वाचे ठरते. मात्र अनेकदा ह्या कवितांचा विस्तार अधिक झाला आहे असे वाटत राहते. 'शांत झोपी गेलेल्या मुलाची कविता' या कवितेत प्रेम म्हणजे काय असते? म्हणजे काय? राष्ट्र म्हणजे काय? जमीन, महासागर, स्वातंत्र्य? घर? इतकेच काय तर लेणी, स्मारके, पुतळे ह्यांसह धर्म, तत्त्वज्ञान, नीती, अनीती अनेक बाबींचा सूक्ष्म आढावा घेणारी कविता समोर येते. यात युद्धपिपासू सत्ताधीशांच्या अनाठायी दुराग्रहामुळे लाखो सैनिकांचा बळी जातो असा विचार मांडलेला दिसतो. 'कल्याण टु डोंबिवली' या कवितेतही रेल्वे स्टेशन, तेथील वातावरण, प्लॅटफॉर्मवरील माणसं, त्यांचे तेथे होणारे व्यवहार यांबाबत चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. 'मुंबई, आमची मुंबई' या कवितेत मुंबईचे वर्णन केलेले आहे, हे वर्णन करत असताना 'मुंबई स्थितप्रज्ञ ज्ञानेश्वराच्या ओवीसारखी' अशा ओळीतून मुंबईमध्ये घडणाऱ्या घटनांचा लोकांच्या मनावर आणि जीवनावर काहीही परिणाम होत नाही, ते स्थितप्रज्ञासारखे आपले कार्य करत असतात, असे कवीला सुचवायचे आहे. मुंबईप्रमाणे मदुराई, तेथील मीनाक्षी मंदिर याचे वर्णन आपल्याला वाचायला मिळते. मात्र त्यात अचानक एखादी ओळ उसळी घेऊन समोर येते ती अस्वस्थ करते जसे,

'बंदिस्त आहे अंधाऱ्या गाभाऱ्यात मीनाक्षी
मिणमिणत्या उजेडात तिच्या डोळ्यातले दुःखही दिसत नाही कुणाला
दिसत नाही तिच्या डोळ्यांतून खळखळ वाहणारी वेन्गेई'

स्त्रियांना भारतीय समाजाने मंदिरात देवी करून बसवले तरी प्रत्येक स्त्रीच्या मनातील दुःख कायम राहिले आहे. तिची बाजू कधी समजून घेतली गेली नाही, असे कवीला म्हणायचे आहे. 'अजिंठा', 'रात्रंदिवस', 'माणसे मरत असताना', 'युद्धे कदाचित', अशा सर्वच कविता वेगळ्या जाणिवांची अनुभूती देणाऱ्या आहेत.

'आतल्या आत कुजबुजत असणारे लोक' या दुसऱ्या भागात पांडुरंग सुतार यांनी माणसाच्या मनातील अव्यक्त भावना आणि त्या संदर्भाने मनामनाची होत जाणारी तगमग शब्दांकित केलेली दिसून येते. नदीला आलेला पूर आणि त्यात टिटवीचे वाहून गेलेले घर, आणि त्या आकांतातून टिटव्यांचा नव्याने सुरू झालेला संसार ह्या संकल्पनेत अस्वस्थता आणि तगमग यातून सकारात्मक जीवनशैलीचा सकारात्मक संदेश पांडुरंग सुतार यांनी दिलेला आहे. त्याचवेळी या भागामध्ये रेल्वेच्या डब्यात एखादी गरीब परकरी मुलगी पोट भरण्यासाठी गाणे गाताना, प्रवाशांशी लगट करताना दिसते, तेव्हा–

'पोरी गाणे गा, पण पुरुषाच्या अंगाशी
लगट नको करत जाऊस'

असा सल्ला देण्याचा विचार कवी करतात, पण मनात असूनही ते लगेच बोलत नाहीत, तर आपण हा सल्ला पुढच्या वेळी देऊ असा विचार करतात. ही 'टू बी ऑर नॉट टू बी'ची मानसिक अवस्था मुंबईतील मध्यमवर्ग सातत्याने घेऊन फिरत असतो, त्याचे प्रतिनिधित्व या ठिकाणी कवीने केलेले दिसून येते. 'निरंतर पाऊस पडतोय'मधील ओलीचिंब धास्ती किंवा 'मेंढपाळ' कवितेतील मेंढपाळाच्या जीवनाची सूक्ष्म कंगोरे टिपणारी निरीक्षणक्षमता आपल्याला या संग्रहात सातत्याने दिसत राहते. आजच्या वर्तमानावर भाष्य करत असताना कवी 'ही कोणती वेळ' या कवितेत म्हणतात,

'मुलांचे निरागस जन्म नाहीत माणसांचे माणूसपण होरपळलेले
स्त्रियांच्या सृजनशीलतेची अग्निपरीक्षा पाखरांना पंख मिटून घेण्याची शिक्षा
निरागसतेचा निर्मम अंत
सत्यापाठी लपलेले सौंदर्याचे मायावी सिद्धांत
धैर्याला हात नाहीत... ममतेला स्तन नाहीत..
अहिंसेला बळ नाही... ही वेळ ही कोणती वेळ... ?
जगण्याला श्वास नाही... मरणाला भय नाही.'

एकंदरीत बदलत गेलेला भूतकाळ, अस्वस्थ वर्तमानकाळ आणि समोर उभा ठाकलेला भयावह भविष्यकाळ याबाबतचे सखोल चिंतन पांडुरंग सुतार यांनी या संग्रहात सातत्याने केलेली दिसून येते.

'तळघरात मूक बसून असलेले लोक' या भागात पाठमोरा बसून असलेला अनोळखी माणूस या कवितेमध्ये आत्मचरित्रात्मक जाणिवांच्या नोंदी आढळून येतात. जसे बोर्डिंगमध्ये शिक्षणासाठी जाणे, सातवी फायनलची परीक्षा, ग्रॅज्युएट होणे, बेरोजगार फिरणे आणि या सर्वांमध्ये शिक्षणाचा गंध नसलेल्या, आयुष्यभर संसारासाठी खस्ता खाणाऱ्या, मुलांच्या भविष्यासाठी वर्तमानाचं ओझं डोक्यावर घेऊन चालणाऱ्या बापाचं व्यक्तिमत्त्व अशी अनेक भावनिक गुंतवळ कवींनी एकत्र मांडली आहे. 'सृजनसूक्ते' या कवितेतही सर्वसामान्य माणसाच्या मनात असणारे आपल्या सहचारिणीचे महत्त्व कवींनी

अधोरेखित केले आहे. मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे ही कविता आत्मचरित्रात्मक कविता आहे, असे म्हणायला हरकत नाही. पांडुरंग सुतार जेव्हा,

‘बापजाद्यासारखा लाकडातून माणूस उभा करता आला नाही
म्हणून मी कविता लिहिली...’

असे म्हणतात, तेव्हा मराठी कविता आता आत्मचरित्रात्मक मांडणीकडे वळू लागली आहे, असे म्हणावे वाटते. हीच जाणीव मला अजीम नवाज राही यांचा ‘तळमळीचा तळ’ हा संग्रह वाचताना झाली होती. ‘शब्दच आहे तुमच्या माझ्यात संबंध राखून’ या कवितेतही ज्ञानेश्वर, तुकाराम, तुलसीदास, कबीर ते अगदी बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानापर्यंत पांडुरंग सुतार यांची कविता पोचते आणि माणूस नावाच्या बिंदूपाशी थांबते.

सारांशाने विचार केला तर कवीच्या प्रातिभ अनुभवाला अतिशय सूक्ष्म अशी निरीक्षणक्षमतेची जोड असून, कवी मनातील कल्लोळ व्यक्त करत असतांना भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ ह्यांवर भाष्य करत स्वतःच्या कवितेला पुढे नेत राहतात. प्रत्येक बाबीवर विस्तृतपणे भाष्य करत कवी आपला विषय वाचकांच्या पर्यंत पोचवण्यात यशस्वी होतात.

मुक्तछंदामध्ये असलेली पांडुरंग सुतार यांची ही कविता लाघवी आणि अल्हाददायक असून वाचकांना गुंतवून ठेवणारी आहे. वर्णमुद्रा प्रकाशनासाठी रोहन कोळी यांनी आकर्षक आणि आशयानुरूप असे मुखपृष्ठ तयार केले आहे; पण अनेकदा मुखपृष्ठाकडे पाहिल्यावर ‘ही महानगरातली गर्दी असून कोरोना काळातील निर्वासितांची गर्दी आहे की काय?’ असेही वाटते. अर्थात तसे असले तरी विशेष फरक पडत नाही; कारण दोन्ही ठिकाणांचे दुःख, वेदना, संवेदना आणि रोजीरोट साठी होणारी भटकंती, मनातील राग, आग, आणि त्वेष समान पातळीवर आहे, यात शंका नाही. पांडुरंग सुतार यांच्या पुढील लिखाणासाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा.

ते लोक कोण आहेत
(कवितासंग्रह)
कवी : पांडुरंग सुतार
वर्णमुद्रा प्रकाशन, शेगाव
पृष्ठ : १५० किंमत : ३७४ /-

❑




वर्णमुद्राचा नवा कवितासंग्रह

**ते कोण लोक आहेत**




किंमत ₹ ३७४/-
सवलतीत ₹ ३००/- ला पोस्टेजसह घरपोच मिळेल.
संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसअॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.
अकाउंट डिटेल्स :

VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

किंवा



# ‘हद्दपार होणाऱ्या भाषेकडे’: एक टिपण

## शिरीष चिंधडे




ज्या कवितेची थोडीशी चर्चा करावीशी वाटते ती आधी वाचू.

**नव्या शब्दांमध्ये**
**भाषा गुदमरली**
**नव्या हवेत श्वास**
**आपला जुना बत्थड मेंदू थकतो**
**जुना कवी धापा टाकतो**
**तो पळून जाऊ शकणार नाही आता**
**मागच्या काळात**

**त्याने शस्त्रे परजून**
**सोलून उलटी टांगावी का भाषा ?**

**झूल फाटलीय**
**जी झाकणार नाही आता**
**कवीच्या जुन्या भाषेची लाज**

**हद्दपार होणाऱ्या भाषेकडे**
**अगतिक बघतोय कवी.**

मनोज सुरेंद्र पाठक यांचा अलीकडेच प्रकाशित झालेला अडुसष्ट कवितांचा 'अधिसत्ता' (पोएट्रीवाला) हा संग्रह विस्तृत आणि विविध अनुभव-आशय-विषयाचे क्षितिज ताब्यात घेण्याचा प्रयास करतो. तरीही काही कवितांचे विषयसूत्र, उदाहरणार्थ ईश्वर, आई-वडील, असे एकच आहे. त्यातून काही एकाश्म, एकसंध सूत्रगुंफण, जीवनदृष्टी आढळते का, हे स्वतंत्रपणे पाहणे आवश्यक आहे. प्रस्तुत टिपणात फक्त आरंभी दिलेल्या कवितेचा विचार आहे.

कलाविष्काराचा माध्यमविचार तसा जुनाच आहे. भाषा किंवा शब्दविरहित संप्रेषण साहित्येतर कलांमध्ये शक्य असते. चित्रकार ते रंगांतून आणि आकारांतून, संगीतकार ते सुरांतून (आणि जुजबी शब्दयोजनेने), नट, नृत्यकार ते बरेचसे देहबोलीतून करतात. 'बरेचसे' कारण दोहोतही थोडीफार शब्दनिष्ठ कथनात्मता (गीत/भाषा) असतेच. (''गीतं, नृत्यं तथा वाद्यं, त्रियं संगीतमुच्च्यते'' असे सूत्रच आहे.) मत आणि अर्भक, प्रेमिक आणि नेत्रहीन (बरेच प्रेमिक असे असतात, असा कविसंकेत आहे!) स्पर्शातून संप्रेषण साधतात. मात्र कवी, साहित्यिक यांना भाषेविना केवळ मौन बाळगावे लागेल. अर्थात व्यक्त होण्याची उबळ दाबणे शक्य नसल्याने शेवटी ते भाषेची मनधरणी करतात; भाषेला शरण जातात. आणि इथे ते, म्हणजे कवी, एका सापळ्यात सापडतात. कोणती भाषा, कोणता शब्द? जिवंत नदीसारखी सतत प्रवाही असणारी आणि बदल स्वीकारीत जाणारी भाषा हा सापळा लावत असते. संदर्भहीन झाल्याने शब्द, म्हणी, वाक्यरचना, अलंकार, प्रतीके, प्रतिमा चलनातून बाद होतात, अप्रस्तुत ठरतात, विस्मृतीत जातात, शेवटी शब्दकोशात आराम करीत पहुडतात. निसर्गाप्रमाणेच भाषेलादेखील पोकळी मान्य नसल्याने (म्हणजेच मनुष्य हा बोलबोलबोलणारा प्राणी असल्याने) नवे शब्द, नव्या म्हणी, नव्या वाक्यरचना, प्रतिमा, प्रतीके जुन्याची जागा घेतात, कारण सर्व भोवताल बदललेला असतो. त्याला सामोरे गेलेल्या कवीला आपली अनुभूती आविष्कृत करू शकेल असे नवे शब्द आवश्यक वाटतात. आता यातून कशी वाट काढायची, याचा शोध कवीला घ्यावा लागतो, हा उखाणा कवीला सोडवावा लागतो. इथे उभा राहतो त्याच्या मनात नव्या-जुन्याचा घनघोर संघर्ष. जुने तर सहजी सुटत नाही, सोडवत नाही, कारण त्यातही काहीतरी आकर्षक, अर्थवाही उपयोगाचे संचित असल्याचे त्याला पटलेले असते, पण नव्या संदर्भचौकटीत ते अपुरे, तोकडे असल्याचीही बोच लागल्याने त्याला नव्या शब्दांचा/भाषेचा शोध घ्यावा लागतो.

पण ते सगळ्यांना कुठे जमायला? चित्ता आपले ठिपके बदलू शकत नाही ना! अनेक कवींना आणि प्रत्येक काळात हा तणाव जाणवत असतोच. केशवसुत तर जरासे वैतागून विचारतात, अशी असावी, तशी नसावी (माझी) कविता हे तुम्ही कोण सांगणारे? तेंही कवीना ठरवू देत. कवींची/कलावंताची ऑटॉनमी ते ठाशीवपणे नोंदवितात. ''निरंकुशः कवयः'', हे स्मरण ते देऊ इच्छितात. मात्र ते ठरवता ठरवता त्यांची दमछाक झालेली दिसते, कारण काहीसे उद्वेगाने ते (कवितेविषयी) म्हणतात, ''जिने मला वेडे केले तिच्यावरी ही फिर्याद!'' कदाचित याच वैतागाचे, तणावाचे विश्लेषण कुसुमाग्रज त्यांच्या 'मालक' (हिमरेषा ) कवितेत एका रूपकातून करताना दिसतात. डोंबारी किंवा अस्वल आणि दरवेशी यांच्या खेळाचे हे रूपक आहे. ती कविता छोटीच पण सूचक आहे.

**मी शब्दांच्या घालून बसतो अमाप राशी**
**जखमी होता धावत जातो शब्दांपाशी**
**शब्दच झाले मालक आता सर्व जिण्याचे**
**जनावराने काबिज केला हा दरवेशी.**

धरलं तर चावतं, सोडलं तर पळतं, असा हा खेळ. अस्वलाला हाकलून द्यावं तर सर्व दाणागोटा समाप्त, जगणे मुश्कील; धरून ठेवावं तर नव्या युक्त्या, कसरती त्याला जमत नाहीत. आणि जुन्या कसरतीतून तर तो बाहेर निघूच शकत नाही; तो पळून जाऊ शकत नाही मागच्या काळात. तो नवे शिकला नाही तर कुचकामी ठरणार, कालबाह्य होणार. मग कुठले मायबाप गिऱ्हाईक, वाचक! नवे शिकणे तसे आसान नाही. इथे प्रश्नांचे वारूळ फुटते. जुने म्हणजे सारे कुचकामी का? फक्त नवे तेच सारे स्वीकार्य का? या प्रश्नांनी गुदमरल्यासारखे होते, धाप लागते, मेंदू बत्थड बनतो. मागे जावे तर जुने शब्द, जुने आशय चलनबाह्य झालेले दिसतात. जुनी भाषा सोलून तिला नवे कातडे चढविणार तरी कसे? की आता सोडूनच द्यावं, हे उलटं टांगलेले कलेवर? कातडेच फाटले आहे तिथे आता झाकणार तरी काय आणि कसे? झूलच फाटलीय, असे कवी म्हणतो, तेव्हा पुन्हा एकदा दरवेशी आणि जनावर यांचे सूचन जाणवते! जुन्या भाषेची, आशयाची झूल भिरकावून द्यायची म्हणजे नग्नता आली, कारण नवी झूल, नवी भाषा, नवा आशय पत्करणे, आत्मसात करणे, त्यातून हवे ते व्यक्तविणे सोपे का आहे? निसर्गाला, कवीला पोकळी तर मंजूर नाही; व्यक्त होणे तर थांबत, थांबवत नाही, उबळ रोखता येत नाही.

ठोस उत्तरे नसणाऱ्या या अवस्थेमुळे- आजचा-कवी अगतिक बनला आहे का, भयग्रस्त झालेला आहे का, भ्रमचित्त होतो आहे का? ''गुजरा हुवा जमाना आता नहीं दुबारा / हाफिजखुदा तुम्हारा'' ही हातातून, जीवनातून काहीतरी सुटलेपणाची, तुटलेपणाची, निखळलेपणाची केवळ व्यक्तिगत, वैयक्तिक कुंठा, व्यथा, काळजीग्रस्त अवस्था नाही; मग सगळी कविताच थांबणार, संपणार तर नाही ना, ही या मागे जगड्व्याळ धास्ती, भीती, शंका दबा धरून बसलेली आहे का? भाषाच गेली, मेली म्हटल्यावर उरले/उरते ते काय? आणि जुनी-नवी यांपैकी चांगली-वाईट कविता कशी ठरवायची, कुणी ठरवायची? स्वतः कवीने, वाचकाने, संपादकाने, समीक्षकाने, की काळाने? आणि तेही विशेषतः चांगले कवी, चांगले वाचक, चांगले संपादक, चांगले समीक्षक (चांगले प्रकाशक सुद्धा?!) यांची वानवा असताना? (तशी ती खरोखर आहे का?) एके काळी (जुने?) कवी भवभूती यांनादेखील हाच प्रश्न पडलेला होता :

**अनंत आहे काळ आणखी पृथ्वी ही विपुला**
**समानधर्मा कुठे कधितरी मिळेल माझा मला**

ही आशा भवभूतीनेही धरलेली होती. ''पुराणमित्येव न साधु सर्वं, जुनाट जे जे ते त्याज्य सारे'', असा प्रश्न कवी कालीदासालाही पडलेला होताच. साहीर हे छान कवितेत नम्रपणे कबूल करतो : ''मै पल दो पल का शायर हूँ...''

**कल और आएंगे नग्मो की खिलती कलियां चुनने वाले**
**मुझसे बेहतर कहने वाले, तुमसे बेहतर सुनने वाले...**

हा प्रवाह असा सुरूच असतो.

आणखी एक विचार सुचतो. वयानुसार, काळानुसार आपली सर्जनशीलता सरत, संपत चालली

आहे; साहजिकच याचे भय, धास्ती, दुःख अनेक कवींना, कलावंतांना अस्वस्थ करीत असते, ट्रॉमा निर्माण करीत असते (तारुण्य निघून जात असलेल्या प्रमदेप्रमाणे). कविता लिहिणे संथावू लागल्याचे जाणवू लागल्यानंतर, विहिरीचा सगळा तळ खरवडून झालेला आहे, असे एकदा कुसुमाग्रज म्हणाले होते. तांबे कवी हेच जरा गोडगोड शब्दांत सांगतात, ''मधुघट रिते झाले आहेत रे सख्या आता. कितीही ताटकळत राहा, वाट बघा, वेध घ्यायचा प्रयत्न करा, पण काही केल्या काहीच स्फुरत नाही अलीकडे, आता.'' कवी डब्ल्यू. बी. येट्स याच्या 'लास्ट पोअम्स'पैकी 'द सर्कस ॲनिमल्स डेझर्शन' ही कविता सर्कसच्या सलग-सांग रूपकातून हीच शुष्क रितेपणाची, वठलेपणाची व्यथा व्यक्त करते :

**I sought a theme and sought it in vain,**
**I sought it daily for six weeks or so.**
**Maybe at last, being cut a broken man,**
**I must be satisfied with my heart, although**
**Winter and summer till old age began**
**My circus animals were all on show,...**

म्हणजे हा एकूण संपत जाण्याचा, शुष्क-रिक्त होण्याचा सनातन ताण-तिढा सार्वत्रिक दिसतो. त्यातून कुणालाही सुटका, मुक्ती नाही. (अपवाद कदाचित क्लिओपात्रा, मोनालिसा यांचे!) असो.

आणखी एक विचार जरा अधिक खुलाशाने. सगळा तळ खरवडून झाला आहे किंवा माझे सगळे सर्कस-प्राणी पळून/मला सोडून गेलेत, असे जेव्हा एखादा कवी म्हणतो, किंवा मला ज्ञात/अवगत असलेली भाषा कालबाह्य, हद्दपार होते आहे, असे जेव्हा त्याचे भयोद्गार असतात तेव्हा, खरे तर, आपण आता (या बदललेल्या नव्या, प्रचलित अपरिचित परिसंस्थेत (इकॉलजी), अनुभवविश्वात आणि भाषाव्यवहारात अप्रस्तुत (इरेलेव्हंट) होत चाललो आहोत, मिसफिट झालो आहोत, कुचकामी ठरतो आहोत; नवे सांगण्याजोगे आता आपल्याजवळ काहीच उरलेले नाही (मधुघट रिकामे झाले आहेत), ही धास्ती त्याला व्यक्त करायची असते का? कालजयी, रससिद्ध जीवनभाषिते करणाऱ्या कवींना जरामरण यांचे भय नसते, असे म्हटले गेले आहे : ''नास्ति तेषां यशःकाये जरामरणजं भयं.'' पण मग टिकाऊ नसलेल्या, कालप्रवाहात वाहून जाणाऱ्या अशा भयग्रस्त कवींचे/कवितेचे काय करायचे? ती काय कलेच्या क्षेत्रातली भाकड भरताड का? त्यांचा पूर्णपणे अव्हेर करायचा की त्यांना काहीएक ऐतिहासिक स्थान मंजूर करायचे, की 'हे देखील लिहीत होते बरं का'!? कविवर्य तांबे एक उत्तर देतात : ''सेवा ही पूर्विची स्मरोनी/ रोष न सखया, दया करी!'' ...म्हणजे वाङ्मयेतिहासकाराच्या दयेवर जगणे आले, असा कुत्सित, तुसडा अर्थ तर नव्हे ना? असो.

साहित्य, कला यांच्या विश्वात कायमची उत्तरे नाहीत, नसतात; कालानुसार तुलनेने चांगले-वाईट, श्रेष्ठ-कनिष्ट अशीही वर्गवारी /विल्हेवाट नसते; प्रगती-अधोगती असे मूल्यनिर्धारण नसते, म्हणजे कलेच्या क्षेत्रांत एकापेक्षा दुसरा काळ, दुसरे साहित्य श्रेष्ठ अशी जजमेंटगिरी अमान्य असते. संबंधित युगधर्म ते सारे ठरवितो, त्याला मान्यता देतो. 'हे सरस, ते रद्दी' असे म्हणणारे आजचे आम्ही-तुम्ही कोण, ते ठरविणारे घाश्या-कोतवाल? प्रश्न मांडणे शक्य; अन्तिमोत्तरे अग्राह्य, अशक्य, अवांछित. थोडक्यात काय की कवितेचे विश्लेषण करणे म्हणजे कांदा सोलून काढण्यासारखे असते; डोळ्यांत पाणी आणि हातात काही नाही; असे कुठेतरी वाचले होते. ते इथे आठवले.

कलाकृतीने जीवनातल्या निदान काही प्रश्नांची उत्तरे द्यावीत, तसेच नवे प्रश्नही निर्माण करावेत,

अशी चोखंदळ आस्वादकाची अपेक्षा असते. परिणामस्वरूप, मनोज सुरेंद्र पाठक याची ‘हद्दपार होणाऱ्या भाषेकडे’ ही कविता मला समजली आहे की नाही वगैरे विचारांचे, प्रश्नांचे वादळ माझ्या मनात उठलेय. तुमच्या?

❑






पूर्वप्रभा आणि पश्चिम आभा
शिरीष चिंधडे
४२४/-
पुस्तक आढावा-ओळखपर लेख




लकडी पूल ते लंडन पूल
शिरीष चिंधडे
४८४/- प्रवासवर्णन




जगावेगळी जीवने
शिरीष चिंधडे
३२४/- निबंध




सृजनस्रोत
शिरीष चिंधडे
४२४/- ओळखपर लेख

संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स,
शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसअ‍ॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.

अकाउंट डिटेल्स :
VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK


किंवा



# सर व्ही. एस. नायपॉल आणि भारत

## (An Area of Darkness)

पुरुषोत्तम देशमुख




नायपॉल यांनी आपल्या भारतभेटीबद्दल जी पुस्तकं लिहिली त्यापैकी पहिल्या 'An Area Of Darkness' मध्ये त्या एका वर्षात त्यांनी जे जे पाहिलं, अनुभवलं त्याबद्दल ते लिहितातच, त्याचबरोबर काहीसं चिंतनात्मक आणि आत्मचरित्रात्मकही लिहितात. भारत त्यांनी पाहिलाही नव्हता तरी तेव्हा त्यांना त्यांच्या आजोबांकडून आणि वडिलांकडून इथल्या सांस्कृतिक परंपरांबद्दल, इतिहासाबद्दल, वातावरणाबद्दल बरंच काही ऐकायला मिळत होतं. त्यामुळे त्यांना या देशाबद्दल कुतूहल आणि हा देश प्रत्यक्ष अनुभवण्याची उत्सुकताही निर्माण झाली होती. त्याशिवाय पुस्तकांतून, वर्तमानपत्रांतूनही त्यांना बरंच काही वाचायला मिळत होतं.

'An Area Of Darkness' मधील लेखन सुरू करण्यापूर्वी त्यांची 'A House for Mr. Biswas' ही कादंबरी आणि 'The Middle Passage' हा लेखसंग्रह प्रकाशित झाला होता. पण प्रवासवर्णनपर लेखन वेग घेऊ शकलं नव्हतं. भारताचा प्रवास न संपणारा, थकवणारा पण आनंददायक असल्याचं त्यांना माहीत झालं होतं. पण प्रत्यक्षात त्यांना अनुभव वेगळाच आला. त्यांचे पूर्वज साठ-एक वर्षांपूर्वी भारतातून त्रिनिदादमध्ये सागरी मार्गानं आले होते, तेव्हा त्यांना किमान ६ आठवडे लागले होते. स्वतः नायपॉल यांना भारतात पोचायला तेवढा काळ लागला नाही, पण वेदना आणि कष्ट तेवढेच

पडले. ते म्हणतात, इ. एम. फॉस्टर किंवा रुडयार्ड किपलिंग यांना भारत जसा भावला तसा आपल्याला भावला नाही. भारतात आल्यावर जिकडेतिकडे अस्वच्छता, दारिद्र्य आणि नैराश्य त्यांना दिसलं, आणि तीच तीच दृश्यंही दिसली पुन्हा-पुन्हा. हे सगळं पुन्हा-पुन्हा काय लिहायचं पुस्तकात, आपलं लिखाण इथे आल्यावर थांबणारच आहे, एका लेखकाचा अंत अशाप्रकारे होणं हे निश्चितच दुर्दैवी आहे असं त्यांना वाटू लागलं, अस्वस्थ वाटू लागलं. ही अस्वस्थता दोन प्रकारची होती शारीरिक आणि मानसिक, तर कधी-कधी दोन्ही प्रकारची. भाषेचा प्रश्न होताच, इथल्या लोकांना त्यांची भाषा कळण्यात अडचणी होत्या आणि त्यांना लोकांच्या भाषा कळण्यात. आपण बोलणंच विसरून जाऊ की काय अशी शंका त्यांच्या मनात वारंवार डोकावू लागली. भारताच्या प्रवासानं त्यांना धक्काच बसला. इथलं दारिद्र्य, हालअपेष्टा, अस्वच्छता पाहून लिहिण्याचा मूडच गेला त्यांचा असं ते म्हणतात. प्रवासवर्णनाऐवजी परत कादंबरी लेखनाकडे वळावं की काय पण त्यासाठी तरी कथानक सुचायला पाहिने ना। पण आपल्यातला लेखक जिवंत ठेवायला काहीतरी करणं आवश्यक होतं.

नायपॉल यांचा भारतातील प्रवास काश्मीरपासून सुरू झाला. तिथल्या थंडगार वातावरणात. एका साधारण बऱ्या हॉटेलात काही दिवस मुक्काम केल्यावर त्यांना लिहिण्याची ऊर्मी येतेय असा अनुभव येऊ लागला. त्यांनी लिहायला सुरुवातही केली तसा मूड पूर्णपणे सुधारला. त्यामुळे त्यांचं मनःस्वास्थ्यही सुधारलं. काश्मीरच्या सुंदर निसर्गामध्ये जादूच अशी आहे की मनावर पसरलेलं मळभ कधी दूर झालं ते दुःखी माणसालासुद्धा कळत नाही. नायपॉल यांना एकक्षण तर असं वाटलं होतं की लगेच लंडनला परत जावं. ते तसे लगेच निघाले असते तर तो त्यांचा एक अर्थानं पराभवच ठरला असता, पण तसं काही झालं नाही. 'An Area of Darkness' मधले लेख त्यांच्या लेखणीतून आपोआप स्रवू लागले असं ते म्हणतात.

ग्रीसमधील अलेक्झांड्रियाच्या मार्गे मुंबईला येताना त्यांचा गाईड कोएल्हो नायपॉल यांच्या सोबतच होता. त्यानंच नायपॉल यांच्याकडे असलेल्या दारूच्या बाटल्या मुंबईला पोचण्यापूर्वी नाहीश्या करण्याची सूचना दिली होती. मुंबईमध्ये दारूबंदी असल्याची माहिती दिली होती. दारूसाठी परमिट गरजेचं होतं. नायपॉल यांना दारूचं व्यसन होतं असं नाही, पण कॅरिबियन देशांमध्ये दारू ही सामान्य बाब होती, परमिटची गरज नव्हती. पण नायपॉल यांच्याकडे ते नव्हतं. कोएल्होची सूचना नायपॉल यांनी फारशी मनावर घेतली नव्हती. मुंबईला पोचण्यापूर्वीच जाऊन संबंधित लोकांना भेटावं लागलं, त्यासाठी बरेच हेलपाटे घालावे लागले. प्रत्येक ठिकाणी सगळं काही सविस्तर सांगावं लागलं. अशात काही दिवस गेल्यावर एकदाचं परमिट तर मिळालं, मग त्या दोन बाटल्यांसाठी पुन्हा तशीच यातायात, भारतात आल्यावर, विशेषतः मुंबईला आल्यावर तिथल्या प्रशासनाचा हा अनुभव ते बराच काळ विसरू शकले नव्हते. तसंच तिथलं दमट हवामानही त्यांना तितकंच त्रासदायक वाटलं होतं, असंही ते म्हणतात.

त्रिनिदाद बऱ्याच बाबतींत स्वयंपूर्ण असलं तरी इतर अनेक बाबतीत त्याचे भारताशी संबंध तेव्हाही नायपॉल यांच्या म्हणण्याप्रमाणे बरेच होते. कारण असंख्य भारतीय तिथे जाऊन स्थायिक झाले होते. घरगुती उपयोगाच्या भारतीय उत्पादनांना आणि कामगारांना तिथे सतत मागणी असे. गवताच्या चटया, पितळी भांडी-कुंडी, सुती कापडाचे रंग वगैरे भारतातूनच आयात केले जात. सुतार, गवंडी, चांभार वगैरे भारतीयच असत. देवादिकांची रंगीबेरंगी चित्रं इकडूनच त्रिनिदादमध्ये नेऊन विकली जात आणि भाविक हिंदू ती आपल्या घरात लावत असत. तिथे स्थायिक झालेले भारतीय आपले धर्म, आपली संस्कृती आणि परंपरा कसोशीनं आणि मनोभावे जपत असत.

पण स्वतः नायपॉल म्हणतात त्याप्रमाणे, त्यांचं मूळ भारतीय असूनही, त्यांना हिंदू संस्कृतीचा, धर्माचा, धार्मिक विधीचा अभिमान वगैरे नव्हता. त्याची फारशी माहितीही नव्हती. उलट हे सर्व अनावश्यक आणि विसंगतींनी भरलेलं आहे असं त्यांचं मत होतं. पण त्यांचा इतर कुणाला या बाबतीत विरोध नव्हता. कारण मुळात ते स्वभावानं सर्व बाबतीत अलिप्त होते. हिंदू धर्मच काय, कुठलाही धर्म त्यांना प्रभावित करू शकला नाही. त्यांच्या आई-वडिलांनी त्यांच्यावर संस्कार केले असतीलच, पण त्यांनी स्वतः ते कधी जुमानले नाहीत. जन्मानं ब्राह्मण असूनही त्यांनी गळ्यात कधी जानवं घातलं नाही, असं ते म्हणतात. त्याचं कारण असं असावं की, ज्या परिस्थितीत ते सर्व भारत सोडून तिकडे गेले, ज्या परिस्थितीत त्यांचे आजोबा, वडील त्या काळात तिथे जगले, त्या काळात अस्तित्व टिकवणं हेच सर्वांत महत्त्वाचं आणि सर्वांत कठीण काम होतं. शेकडो-हजारो भारतीय लोक, वेगवेगळ्या धर्मांचे-जातीचे एकत्र राहत होते त्या काळात. असे असताना जीव वाचवणं स्वतःचा आणि एकमेकांचा हाच एकमेव धर्म होता. माणुसकी हाच एकमेव धर्म होता, तिथे धार्मिक संस्कारांना काहीच महत्त्व नव्हतं. सगळेच ऊस तोडणारे किंवा तत्सम कार्य करणारे मजूर होते, त्यात सर्व जाती-धर्मांचे लोक होते तसे ब्राह्मण लोकही होते. सगळ्यांचं राहणं-खाणं-पिणं एकत्रच होतं. अशाप्रकारे त्यांचे विचारही वास्तववादी होते.

असं असलं तरी मुस्लीम लोकांबद्दल नायपॉल यांना कधी विश्वास वाटला नाही. जगाच्या इतिहासात मुस्लीम लोकांचं वर्तन आणि व्यवहार त्यांना संशयास्पद वाटत होते. इतरांपेक्षा ते लोक काहीसे वेगळेच असल्याचं त्यांचं मत बनलं होतं. त्यांची संस्कृती, विचार आणि आचार - या सगळ्याच गोष्टी इतरांपेक्षा तेव्हाही वेगळ्याच होत्या. त्यामुळे त्यांच्याबद्दल कुणाला आपुलकी नव्हती, उलट दुरावाच होता. अर्थात आपल्या कुटुंबीयांच्या कर्मठ जीवनपद्धतीत नायपॉल वाढले असले तरी स्वभावानुसार हिंदू धर्माच्या संदर्भात ते अलिप्तच होते. हे वास्तव असल्यामुळे आपण हिंदू आहोत असं का समजावं आणि त्याचा अभिमान तरी का असावा आपल्याला, असा प्रश्न ते स्वतःलाच विचारत. या मागेही काही तत्त्वज्ञान असावं कदाचित असं ते मानत. त्यांच्या या नकारामागेही एक प्रकारचं हिंदुत्व आहे असं त्यांचे काका म्हणत. आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत असं स्पष्ट करण्याचा ते प्रयत्न करीत, जातीची एक धूसर जाणीव, आपण भ्रष्ट असण्याचं भय असण्याची शक्यता त्यांना वाटत असावी कदाचित. त्यांची कुणावर श्रद्धा नव्हती आणि श्रद्धा या संकल्पनेवरही विश्वास नव्हता. कुणा देवावर किंवा साधू-संतावरही भक्तीमध्ये आकंठ बुडालेला असल्यानं त्यांना भारताबद्दल आपुलकी असण्याचं कारण नव्हतं. होती ती जाणून घेण्याची उत्सुकता, होतं ते कुतूहल.

भारतीय शासन व्यवस्थेतील कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या टोकाच्या अहंकाराच्या किंवा स्वाभिमानशून्य नम्रतेच्या आठवणी ते लिहितात. त्यांच्याकडे असलेल्या दोन्ही बाटल्या जप्त झाल्या होत्या. त्या परत मिळवण्यासाठी मुंबईतच परमिट मिळवावं लागलं, तेही काम सोपं नव्हतं. अनेक सरकारी ऑफिसेस मुन्शी प्रेमचंद, भारतीय इंग्रजी कादंबरीकर कॅप्टन मनोहर माळगावकर यांनी भारतीय मानसिकतेवर केलेलं भाष्य, त्यांचा संपत्तीचा लोभ, दारिद्र्य वगैरेबद्दल नायपॉल आपली निरीक्षणं मांडतात. त्यांचा सगळा सूर टीकेचा, निराशेचा आणि अप्रियता व्यक्त करणारा आहे.

भारतातील भिकाऱ्यांबद्दल बोलताना ते म्हणतात, मध्यमवर्गीय आणि श्रीमंत लोकांनी गरीब जनतेला आळशी आणि भिकारी बनवलं आहे. ठिकठिकाणी 'सदावर्तं' चालू केली आहेत. त्यामुळे भिकाऱ्यांची संख्या जिकडे- तिकडे खूप दिसते. कुठलेही श्रम न करता गरिबांना खायला मिळत गेलं

की, त्यांना ती सवयच लागते. त्यामुळे दारिद्र्य तर कमी होतच नाही, उलट लोकसंख्या वाढते. हे दुष्टचक्र आहे. लोकांना स्वाभिमान आणि श्रमप्रतिष्ठेचं महत्त्व समजावून सांगायला पाहिजे. श्रीमंत आणि स्वावलंबन, श्रम यांचा संबंध संपत चाललाय. श्रमाचं, मेहनतीचं, शारीरिक कष्टाचं काम लोकांना हलक्या दर्जाचं, कमीपणाचं आणि अपमानास्पद वाटतं, हेही नायपॉल यांनी भारतात आल्यावर अनुभवलं.

दारिद्र्यासोबतच घाणीचं साम्राज्य सर्वत्र पसरलेलं त्यांना भारतात दिसलं. काश्मीरमधील हिमालय असो को नदी-किनारे असोत, समुद्र-वाळवंट, शहरातील रस्ते- चौक-गटारी-लोक तिथे बिनदिक्कत घाण करतात, त्यांना जनामनाची लाज नसते. या संदर्भात महात्मा गांधींचा अतिशय गौरवपूर्ण उल्लेख ते करतात. ते भारतीय असले तरी त्यांची दृष्टी पाश्चात्त्यांची होती, असं नायपॉल म्हणतात. जवाहरलाल नेहरू किंवा इतर कुठल्याही नेत्याची त्या काळी तशी दृष्टी नव्हती. नेहरू तर रोमॅंटिक होते असं विधान ते करतात. गांधीची ही दृष्टी क्रांतिकारकाची होती आणि म्हणून सर्वार्थानं महात्मा गांधी क्रांतिकारक होते. गांधी हे पूर्व आणि पश्चिम, हिंदू आणि ख्रिश्चन यांचं मिश्रण होते. त्यांच्यामध्ये हा बदल ते दक्षिण आफ्रिकेत जाऊन आल्यावर झाला. नेहरू त्यांच्यापेक्षा अगदी वेगळे असल्यानं गांधींइतके ते लोकांच्या समस्या, अडचणी समजू शकले नसावेत. भारतातील अज्ञान, अनारोग्य हे दारिद्र्यामुळे निर्माण झाले असल्याचं महात्मा गांधींना वाटत होतं. म्हणून पहिल्याप्रथम दारिद्र्य घालवण्याचे प्रयत्न करणं त्यांना आवश्यक वाटत होतं. गांधीना भगवद्‌गीता मार्गदर्शक वाटत होती, तसंच नायपॉलही गीतेकडे पाहत होते.

सेवा, प्रामाणिकपणा, निष्ठा, सचोटी हे गुण भारतीयांचे नाहीत, असं नायपॉल यांचं ठाम मत होतं. पैसा मिळवणं हे एकमेव उद्दिष्ट या लोकांचं असतं. कर्तव्य आणि जबाबदारीची जाणीव या लोकांना नसते. मग तो मद्रासचा शिंपी असो की व्यवसाय करणारी वेश्या असो, व्यापारी असो की एखाद्या राजकीय पक्षाचा नेता असो. स्वतःपुरता आणि तात्पुरता फायदा पाहणंच बऱ्याच लोकांचं ध्येय असतं. अगदी कामसूत्रातही असंच सुचवलंय असं नायपॉल यांना वाटतं. क्षणिक सुख आणि आनंद, मग पुढे काहीही होवो. त्याचा कुणीही विचार करीत नाही. नायपॉल यांना ही 'Moral ambiguity' (नैतिक दुटप्पीपणा) वाटते. कामसूत्र आणि इतर प्राचीन भारतीय ग्रंथांतही हेच सूचित केलंय असं विधान ते करतात. प्रत्येक माणूस हा एक बेट आहे. प्रत्येकाचं काहीतरी कार्य असतं आणि ते देवाशी झालेल्या करारात मांडलेलं असतं आणि तीच त्याची जात असते. पण हे प्राचीन काळी अंमलात येत असावं, आता सगळंच बदललंय, बिघडलंय. झाडं लावण्यासाठी खड्डे खणले जातात, त्याचे समारंभ-फोटो होतात. पण त्यापैकी ७०% टक्के झाडं लगेच वाळून जातात. माणूस आरंभशूर असतो. देवीचा रोग घालवण्यासाठी मोहिमा होतात, पण देवीचे रोगी तसेच राहतात, नवीन रोगीही होतात. गरीब, छोट्या मुलांना सकस दूध देण्याचे जाहीर कार्यक्रम होतात, पण ते दूध दुसरीकडेच विकलं जातं. तसंच रेशनच्या धान्याचं. असे भ्रष्टाचार आणि विसंगती नायपॉल ठिकठिकाणी दाखवून देतात. अस्पृश्यताविरोधी प्रचार, तिचा निर्मूलनाच्या घोषणा आणि मोहिमा हे सगळं ढोंग आहे. महात्मा गांधींच्या उदात्त विचारांचं, कल्पनांचं विडंबन त्यांचे अनुयायीच करतात. हा गांधींचा पराभवच आहे.

हे असंच चित्र नायपॉल यांना त्यांच्या पहिल्या, भारतभेटीत दिसल्यामुळेच या पुस्तकाचं शीर्षक 'An Area of Darkness' त्यांना अन्वर्थक वाटलं असावं.

❑



# शैलेंद्र मेहता यांची मुलाखत

## अथर्व देशमुख



नमस्कार! माझं नाव अथर्व देशमुख. आज आपल्या सोबत जॉईन झालेले आहेत शैलेंद्र मेहता सर आणि त्यांचे पुस्तक आहे 'अभिजात' या नावाचे. आणि त्या संदर्भात आपण त्यांची मुलाखत घेणार आहोत, त्याबद्दल बोलणार. सर, थँक्यू! तुम्ही मुलाखतीला होकार दिलात आणि जॉईन झालात.

**मेहता** : तुम्हालाही थँक्यू.

**अथर्व** : सरांचा मी थोडक्यात परिचय देतो. सर पत्रकार आहेत आणि सर प्राध्यापक राहिलेले आहेत आणि त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. आणि ज्या पुस्तकाबद्दल आपण बोलणार आहोत त्या पुस्तकाबद्दल मी सांगतो. या पुस्तकात सरांनी त्यांना प्रभावित करून गेलेल्या लेखकांबद्दल लिहिले आहे. पुस्तकाचे प्रकाशक वर्णमुद्रा पब्लिशर्स हे आहेत आणि पुस्तक जून २०२३ ला प्रकाशित झाले आहे. पुस्तकात एका लेखकावर एक लेख आहे. सरांनी हारुकी मुराकामी या जपानी लेखकाचा अपवाद वगळता मुख्यत्वे युरोपीय आणि अमेरिकन लेखकांबद्दल पुस्तकात लिहिले आहे. पुस्तकात सरांनी नेमकी कुठली कुठली मते मांडली आहेत, त्याबद्दल आपण मुलाखतीत बोलणार आहोतच. सर, अभिजात साहित्याची व्याख्या सांगू शकाल का आणि तुम्ही अभिजात साहित्य वाचनाकडे कसे वळलात आणि कशा प्रकारे तुम्हांला प्रभावित करून गेलेल्या अभिजात साहित्यिकांबद्दल लिहावे असे तुम्हांला वाटले?

**मेहता :** सर्वप्रथम तुम्हांला नमस्कार आणि तुमचे धन्यवाद.अभिजात साहित्य, म्हणजे ज्याला आपण इंग्लिश मध्ये क्लासिक लिट्रेचर म्हणतो ते, ते काळाच्या कसोटीवर टिकून राहणारं साहित्य आहे. ते कधीच कालबाह्य होत नाही. ते कालातीत साहित्य आहे. त्याचे असे एक वैशिष्ट्य आहे, की हे साहित्य सार्वकालिक असतं आणि सर्वव्यापी असतं, म्हणजे जगातल्या कुठल्याही वाचकाने ते समजा वाचलं, तर तो त्याच्याशी आयडेंटिफाय करू शकतो. कितीही वर्षं झाली, तरी अशा साहित्याचं अपील ओसरत नाही, ते तेवढंच राहतं. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या साहित्यिकांचा मी या पुस्तकात समावेश केलेला आहे, त्या साऱ्यांनी एका विशिष्ट कालखंडात हे साहित्य रचलेलं आहे आणि त्या कालखंडाचा प्रभाव त्या साहित्यावर साहजिकच आहे. पण तरीसुद्धा हे साहित्य त्या काळाचाच इतिहास सांगत नाही, तर पुढे मागे, पास्ट आणि फ्युचर, या दोन्हीकडे रिलेट करतं, दोन्हीकडे त्याचं नातं असतं. अभिजात साहित्य हे चिरंतन राहणारे साहित्य आहे.

**अथर्व :** तुम्ही अभिजात साहित्याकडे कसे वळलात आणि तुम्हांला या साहित्यिकांबद्दल का लिहावे वाटले?

**मेहता :** लहानपणापासून मला वाचनाची गोडी होती. लहानपणी आपण हाताला जे मिळतं ते वाचत राहतो. त्याचप्रमाणे माझीदेखील सुरुवात झाली. मी गोव्यामध्ये वाढलेलो आहे, त्यामुळे मी इंग्लिश, हिंदी, कोकणी आणि मराठी या चारही भाषांमध्ये वाचायचो. लहानपणापासून या चारही भाषा मला उत्तम तऱ्हेने समजायच्या. मी पंधरा-सोळा वर्षांचा असताना आमच्या गावात एक 'प्रागतिक साहित्य सेवा मंडळ' नावाचा गट स्थापन झाला. त्याच्यातनं मला समजलं की खरं साहित्य काय असतं आणि ट्रॅश साहित्य काय असतं. म्हणजे आपण ज्याला गल्लाभरू साहित्य म्हणतो, ते काय असतं आणि खरोखर ज्याच्यात साहित्यिक मूल्य आहे, असं साहित्य काय असतं, याची मला जाण आली. मग मी वाचनाच्या बाबतीत चोखंदळ होत गेलो. या पुस्तकात ज्या लेखकांबद्दल मी लिहिले आहे आणि त्यांच्या साहित्यकृतीबद्दल लिहिले आहे, ते सगळे लेखक मला आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेटले, वेगवेगळ्या मित्रांकडून भेटले, वेगवेगळ्या वातावरणांत भेटले, काही मला ग्रंथालयातून भेटले, काही पुस्तके मला वडिलांनी दिली होती त्याच्यातून सापडले. काही मित्रांनी, शिक्षकांनी किंवा परिचितांनी आणि कधीकधी अनोळखी माणसांनीसुद्धा जे रेकमेंड केले होते किंवा वाचा म्हणून सांगितलं होतं, ज्यांना माझ्या वाचनाबद्दलची गोडी माहीत होती, त्यांच्याकडून मी ही पुस्तकं मिळवली आणि वाचली. मी विद्यार्थी चळवळींमध्ये, सामाजिक चळवळींमध्ये फार सक्रिय होतो. यावेळी आपण एका विशिष्ट तत्त्वज्ञानाने भारावून गेलेलो असतो. आपण ज्यावेळी विशीचे असतो, त्यावेळी आपल्या मनात जग बदलायची फार खुमखुमी असते. या वयात मला अनेक नवीन लेखकांबद्दल फारच आकर्षण वाटू लागलं. आणि त्या लेखकांची पुस्तकं वाचता वाचता मला अनेक क्रॉस रेफरन्सेस सापडत गेले. आणि या क्रॉस रेफरन्सेसमुळे मी अनेक नवीन लेखकांकडे वळलो. आणि अशा तऱ्हेने माझ्या वाचनाच्या प्रवासाला सुरुवात झाली. याच्याबद्दल मी काही लिहीत नव्हतो, मी फक्त वाचायचो. माझं स्वतःचं लेखन मी प्रकाशित करत रहायचो. मी वेगवेगळ्या क्षेत्रात काम केलेलं आहे. मी एका कॉलेजमध्ये व्याख्याता होतो, पोलिटिकल सायन्स शिकवायचो. त्याच्यानंतर मी इव्हेंट मॅनेजमेंट मध्ये आलो. मीडिया कन्सल्टंट बनलो. पत्रकारितेकडे वळलो. त्यामुळे या विविध क्षेत्रांचा मला अनुभव मिळाला. याबद्दलही मी लिहायचो. माझे एक मित्र लोकमतचे गोव्याचे निवासी संपादक होते. त्यांनी

मला बोलता बोलता असं सुचवलं की काहीतरी तू रेग्युलरली लिहीत जा. आता कशावर लिहायचं, हा एक प्रश्न होता कारण सगळेच विषय सगळ्यांनाच माहीत असतात. कारण इंटरनेटमुळे आपल्या ज्ञानाची व्याप्ती आता एवढी वाढलेली आहे, की कुठलेही विषय आपल्याला वर्ज्य नसतात. पण आमच्या वेळी आम्ही लायब्ररीत बसून राहायचो, पुस्तकं धुंडाळत राहायचो आणि ती वाचायचो. पण अशा या काळात सर्वांना अपील होऊ शकेल असं काय असेल, असा मला प्रश्न पडला. त्यावेळी मी ठरवलं की, जगातील उत्तमोत्तम जे लेखक आहेत आणि त्यांच्या साहित्यकृती आहेत, त्या मराठी वाचकांपर्यंत पोचवाव्यात. आणि मी त्या दृष्टीने अभ्यास सुरू केला. आणि मला असं आढळलं की असं एक व्यापक स्वरूपाचं पुस्तक अजून पर्यंत मराठीत आलेलं नाही. मराठीत पुष्कळ पुस्तकं आलेली आहेत, पण या पुस्तकात मी ५२ लेखक घेतलेले आहेत. आणि हे ५२ लेखक वेगवेगळ्या बॅकग्राऊंड मधले आहेत, वेगवेगळ्या संस्कृतींमधले आहेत, वेगवेगळ्या भाषांतील आहेत. यात इंग्लिश आहेत, फ्रेंच आहेत, रशियन आहेत, रूमानियन आहेत, इटालियन आहेत, स्पॅनिश आहेत, पोर्तुगीज आहेत. मराठी वाचकांना सहसा इंग्रजी साहित्याचा परिचय झालेला असतो. पण बाकीच्या ज्या युरोपियन भाषा आहेत, त्यांच्याबद्दल आपल्याला फारशी माहिती नसते. मला या भाषांमध्ये प्रावीण्य नव्हतं, पण नंतर मी अनुषंगाने स्पॅनिश आणि पोर्तुगीज भाषा उत्तमपणे शिकलो होतो, आणि या भाषांतून मी भाषांतर करायला लागलो. त्यावेळी माझ्या लक्षात आलं की या भाषांत उत्तमोत्तम साहित्य आहे. हे आपण वाचलं पाहिजे आणि वाचून फक्त आपल्याकडे ठेवायचं नाही, तर दुसऱ्यांनादेखील त्यातून काही दिलं पाहिजे. इतरांनादेखील समजलं पाहिजे की या भाषांत कशाप्रकारे सकस आणि कसदार साहित्य निर्माण होत आहे. हे विविध सामाजिक प्रश्नांवरती असू द्या, किंवा आत्ममग्न होऊन लिहिलेलं साहित्य असू द्या, जीवनाला विविध आयाम आहेत किंवा छटा आहेत, त्यांकडे ते कसं बघतात, हे सगळ्यांना समजावं, म्हणून हे पुस्तक मी लिहायचं ठरवलं. हे पुस्तकरूपात येण्याआधी माझे हे सर्व लेख दर रविवारी 'लोकमत'मध्ये प्रसिद्ध व्हायचे. त्याला एक मर्यादा होती. हे वृत्तपत्रीय लेखन असल्यामुळे कमीत कमी शब्दांत मला जास्तीत जास्त सांगावं लागायचं. शब्दांची मर्यादा असायची. ती तशी नसती तर हे लेख अजून लांबलचक झाले असते. या लेखांतून मी वाचकांपर्यंत जास्तीत जास्त कसं पोचता येईल, याचा प्रयत्न केलेला आहे.

**अथर्व** : आपण आता पुस्तकात तुम्ही ज्या लेखकांबद्दल लिहिले आहे, त्यांबद्दल बोलू. तुम्ही एडगर ॲलन पो यांच्याबद्दल पुस्तकात लिहिले आहे. रहस्यमय भयकथांचा जनक अशी ख्याती असलेल्या एडगर ॲलन पो यांचे महत्त्व, अंगावर शहारे आणणारा कथाकार म्हणून वादातीत आहे, असे तुम्ही पुस्तकात म्हटले आहे. तर एडगर ॲलन पो यांच्याबद्दल आणि त्यांच्या साहित्यातील कुठल्या गोष्टींनी तुम्हांला प्रभावित केले, याबद्दल सांगू शकाल का?

**मेहता** : एडगर ॲलन पो ची पुस्तकं मी २१-२२ वर्षांचा असताना वाचायला सुरुवात केली. त्यावेळी वाचताना मला जी अनुभूती आली, ती वेगळीच होती. त्याआधी मी जे मराठीतील रहस्यकथाकार असतात, ट्रॅशपासून आपण जी सुरुवात करतो, आणि ज्याला आपण रहस्यकथा म्हणतो, भयकथा म्हणतो, म्हणजे गुरुनाथ नाईक असू द्या, की आपले नारायण धारपांपर्यंत सगळे लेखक असू द्या, ही पुस्तकं वाचताना मी वेगळ्या दृष्टीने विचार करत होतो, पण जेव्हा माझ्या हातात एडगर ॲलन पो पडला, तेव्हा मला एका वेगळ्याच विश्वाची जाणीव झाली, एक नवीन ओळख झाली.

रहस्यमय किंवा भयकथांचा जनक, अशी त्याची ख्याती आहे. तो फक्त चाळीस वर्षांचं आयुष्य जगला. आजही त्याच्या कथांचे आणि शैलीचे गारूड कायम आहे.

आता विज्ञानाने एवढी गगनभरारी घेतली आहे, आपल्याला नवीन नवीन साहित्यप्रकार, वेगवेगळ्या फिक्शन्स आणि नॉन फिक्शन्स वाचायला मिळतात, पण एडगर ॲलन पो अजूनही आपल्या कथांमधून नवीन पिढीच्या वाचकांमध्येसुद्धा भय हा रस निर्माण करतो. अंगावर शहारे आणणारा गूढकथाकार ,अशी त्याची ख्याती. लघुकथा या साहित्य प्रकाराची ओळख प्रथम त्याने अमेरिकन साहित्यात करून दिली. लघुकथा हा साहित्यप्रकार त्या काळात फारसा प्रचलित नव्हता. ती कादंबरीपेक्षा कशी वेगळी आहे आणि त्यात सूक्ष्म तपशील मांडणं कसं आवश्यक आहे, याचं प्रतिपादन त्यानं केलं. आजही अमेरिकन आणि इतरही देशातील लेखकांना, खासकरून लघुकथालेखकांना, त्याची शैली मार्गदर्शक ठरते. त्यावेळी अमेरिकन साहित्यावर जो डार्क रोमँटिसिझमचा प्रभाव होता किंवा भावनिक रोमँटिक परंपरावाद होता, त्यातून त्याने एक वेगळं वळण साहित्याला दिलं. त्यामुळे तो अमेरिकन साहित्यातील एक मैलाचा दगड ठरतो. एडगर ॲलन पोला आपण गुप्तहेर कथांचा पण जनक म्हणू शकतो. त्याच्यानंतर अगाथा ख्रिस्ती, आर्थर कॉनन डॉयल यांच्यासारख्या लेखक-लेखिकांनी अनेक गुप्तहेरकथा लिहिल्या. आपण जेम्स बॉण्ड सारखे जे सिनेमे बघतो, ते पण फार प्रचलित झाले. पण मला वाटतं त्याची सुरुवात एडगर ॲलन पो पासून झाली. त्याच्या कथांमध्ये जी पात्र आहेत, ती म्हणजे एकदम वेडी, बुटकी आणि शिवाय जी वर्णने आहेत, अंधार कोठड्या, गॉथिक किल्ले आणि विक्षिप्त प्रकारची लोकं या सारख्या गोष्टींचा भरणा आपल्याला त्याच्या साहित्यामध्ये आढळतो. आणि म्हणूनच कदाचित तो अनेक शतकांनंतर सुद्धा आज लोकांच्या मनात अजूनही उरलेला आहे. त्याच्या कथांवर नंतर अनेक चित्रपट बनवले गेले. H.P. Lovecraft आणि Stephen King यांसारख्या लेखकांनी सुद्धा नंतर उल्लेख केला की आपल्या साहित्यकृतीवर एडगर ॲलन पो चा प्रभाव कसा होता ते. एक दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याकाळी अमेरिकेमध्ये कॉपीराईटचे निर्बंध नव्हते. त्यामुळे इंग्लंडमध्ये जे लेखक लिहायचे ती पुस्तकं सर्रास अमेरिकेमध्ये उपलब्ध असायची. पण अमेरिकन लेखक त्या साहित्याची स्पर्धा करण्यात कमी पडत होते. अशावेळी एडगर ॲलन पो आणि काही इतर त्यांचे जे सहकारी होते किंवा समकालीन होते, त्यांच्या पुढारपणामुळे तिकडे नियकालिकांसाठी जी लघुकथा हा एक नवीन घटक त्यांनी प्रचलित केला, तो अंमलात आणला. आणि त्यामुळे लघुकथेचा एक नवीन प्रवास सुरू झाला. ‘फॉल ऑफ अशर’ ही त्याची सर्वांत पहिली कथा. आणि ती १८३९ मध्ये प्रकाशित झाली होती. याच्यात एक शापाने ग्रस्त असलेला तरुण, त्याला फेफरं येतं. आणि तो आपल्या मृतप्राय भासणाऱ्या जुळ्या बहिणीला जिवंत पुरून टाकतो, अशा प्रकारचं ते सार आहे. आतासुद्धा ही कथा अंगावर शहारे आणते, म्हणजे या कथेचं त्यावेळी किती मोठं अपील असेल. आणि त्यानंतर त्याची ‘मर्डर्स इन ऱ्यु मॉर्ग’ आली. याच्यात त्यानं खरा म्हणजे पहिला गुप्तहेर, एक डिटेक्टिव्ह पात्र तयार केलं. ते त्यानं खरं म्हणजे पहिल्यांदा जन्माला घातलं. त्याच्यानंतर ‘टेल टेल हार्ट’ हे एका जेलमधल्या खुन्याचं स्वगत आहे. याच्यानंतर 'The Cask of Amontillado' ही जी त्याची कथा आहे, ती पण एका उमराव घराण्यातल्या माणसाची कशी अधोगती होते आणि एक सूडनाट्य अशी आहे.

‘रेव्हन’ नावाची त्याची एक दीर्घ कविता आहे, ती पण एक वेगळ्या पद्धतीची आहे आणि एक किशोरवयीन मुलांची. कावळ्यासारखा जो रेव्हन पक्षी असतो, आपण त्याला कावळा म्हणतो, तिकडे तो रेव्हन असतो, त्या पक्ष्याशी पडलेली त्याची गाठ आणि त्याच्यानंतर त्यातून त्यानं अर्थहीनतेचा अर्थ

शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे, हे त्याचं वैशिष्ट्य. दुसरं म्हणजे तो आपल्या लिखाणाच्या बाबतीत, भाषेच्या बाबतीत, व्याकरणाच्या बाबतीत अत्यंत काटेकोर होता. हे त्याच्या साहित्याचं मला वाटतं, सर्वांत मोठं वैशिष्ट्य आहे. त्यानं अनेक पुस्तकं लिहिली. अभिजात साहित्याची व्याख्या काय, हे पहिल्यांदा त्याने सांगितले. कारण त्यावेळेस अनेक प्रकारचं साहित्य यायचं. त्यानं प्लेटो, रिस्टॉटलपासून सुरुवात करून नंतर मिल्टन किंवा कोलरिज या सगळ्या लेखकांचा अभ्यास केला आणि दर्जाहीन साहित्याची चिरफाड करून अमेरिकन साहित्याचा एक उच्च दर्जा वाचकांसमोर ठेवला, म्हणून एक समीक्षक म्हणूनही त्याचं मोठं स्थान आहे. एडगर ॲलन पो हा एक वेगळाच अवलिया होता.

**अथर्व** : सर, तुम्ही पुस्तकात गुस्ताव फ्लॉबेर यांच्याबद्दल लिहिले आहे. त्यांची 'मादाम बोव्हारी' ही कादंबरी वास्तववादी शैलीचा गुणात्मकदृष्ट्या सर्वांत महत्त्वाचा आविष्कार समजला जातो, असे तुम्ही पुस्तकात म्हटले आहे.फ्लॉबेर यांची निर्मिती कमी, परंतु मोलाची आहे, असे सुद्धा तुम्ही पुस्तकात म्हटले आहे. तर गुस्ताव फ्लॉबेर यांच्याबद्दल, वास्तववादाबद्दल आणि या कादंबरीबद्दल सांगू शकाल का?

**मेहता** : गुस्ताव फ्लॉबेरने विपुल असं लेखन केलं नाही. पण तोही एडगर ॲलन पोसारखा आपल्या लिखाणाच्या बाबतीत अत्यंत काटेकोर होता, कुठला शब्द कुठे वापरावा, यावर त्याचं बारीक लक्ष असायचं. अनेक वेळा त्याने असे केले आहे की तो लिहायचा आणि फाडून फेकून द्यायचा. जे त्याला आवडतंय, जे अपील होतंय, तेच तो ठेवायचा. वास्तववादी फ्रेंच साहित्यातील सगळ्यात उल्लेखनीय नाव गुस्ताव फ्लॉबेरचे आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत वास्तववाद हा फ्रेंच मधील साहित्यिक निर्मितीचं एक प्रबळ मध्यम बनला होता. आणि पुढच्या अर्धशतकापर्यंत या चळवळीने साहित्यावर आपलं वर्चस्व राखलं. आता याची मूलभूत उद्दिष्ट काय होती? ती त्याने आपल्या परीने लोकांसमोर, वाचकांसमोर मांडली. त्यामुळे या साहित्याच्या प्रवाहाच्या व्याख्येत अनेक वैविध्यपूर्ण मतप्रवाह आढळतात. वास्तववादी लेखकांना मूलतः साहित्य आणि विज्ञानातील काही भेद त्यावेळी दूर करायचे होते. ज्यायोगे निरीक्षण आणि नोंदींद्वारे सत्य उलगडले जाईल. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नैतिक हेतू किंवा लेखकाचा वैयक्तिक दृष्टिकोन बाजूला सारून मुख्यतः आपल्या जीवनातील जो दैनंदिन रामरगाडा आहे, त्याच्यात गुंतलेल्या लोकांचं प्रतिनिधित्व करायचं होतं. त्यांची कथा, त्यांच्या व्यथा, त्यांची जी जीवनकहाणी आहे, त्यांचे जे डे टु डे स्ट्रगल्स आहेत, त्यांचे जे प्रश्न आहेत, ते साहित्यातून त्यांना मांडायचे होते. या प्रकारच्या साहित्यात जे वारस पुढे आले, गी द मोपांसा असू दे, एमिल झोला असू दे, टॉलस्टॉय, दस्तएवस्की असू दे, या सर्वांनी कुठे ना कुठे मान्य केले आहे की फ्लॉबेरच्या शैलीचा त्यांच्यावर प्रभाव होता. तसं बघायला गेलं तर बाल्झाकचं नाव आपल्याला माहित आहे. बाल्झाकने स्वच्छंदतावाद किंवा वास्तववादाची सुरुवात केली असं म्हणतात. पण फ्लॉबेर माझ्या मते सगळ्यात श्रेष्ठ ठरतो कारण 'मादाम बोव्हारी'सारखी त्याची जी कादंबरी आहे, ती एक गुणात्मकदृष्ट्या वास्तववादी साहित्याचा एक उत्तम नमुना मानला जातो. मुख्य धारेतल्या ज्या कादंबऱ्या आहेत, किंवा मुख्यधारेतल्या कादंबरीचा जर आपण इतिहास बघितला, त्याच्यात 'मादाम बोव्हारी'चं जे स्थान आहे, ते एकदम वादातीत आहे. असं झालं की युरोपियन समीक्षकांच्या मते, त्यांनी सरळ सरळ दोन विभाग केले–फ्लॉबेरच्या साहित्याच्या आधीचा काळ आणि नंतरचा काळ. अशी एक सरळ सरळ विभागणी झाली. आणि त्याच्यानंतरचे जे लेखक होते, विचारवंत होते, जर आपण मॉडर्निझम किंवा पोस्ट

मॉडर्निझम बघितला, किंवा existentialism चा जो प्रवाह आला, तो बघितला, त्यातील अनेक विचारवंत होते, मिशेल फुको असू द्या, ज्याँ पॉल सार्त्र असू द्या, बार्थेस असू द्या, या सगळ्यांनी आपल्यावर कुठे ना कुठे फ्लॉबेरचा प्रभाव पडला होता हे मान्य केलेलं आहे. त्याने जी कादंबरी लिहिली 'मादाम बोव्हारी', ही एमा बोव्हारी– चार्ल्स बोव्हारीची पत्नी, बद्दलची कथा आहे. त्याने वर्तमानपत्रात वाचलं होतं की एका स्त्रीने, जी एका डॉक्टरची दुसरी पत्नी होती, तिने आपल्या प्रियकराबरोबर पळून जाताना आपल्या मुलांना विष देऊन ठार केलं, आणि ती अमेरिकेत आपल्या प्रियकराच्या भेटीला गेली, असा त्याचा आशय होता. हे त्यांना कुठेतरी वर्तमानपत्रात वाचलं होतं, आणि त्याच्यावर त्याला ही कथा सुचली. ही कादंबरी निर्माण करायला त्याला जवळजवळ पाच वर्षे लागली. मी आधी सांगितल्याप्रमाणे तो लिहायचा, फेकून द्यायचा, लिहायचा, फेकून द्यायचा. असं करून शेवटी त्याला जे अपील झालं, ते त्याने ठेवलं. ही कादंबरी सुरुवातीला 'पॅरिस रिव्ह्यू'मध्ये एक धारावाहिक म्हणून प्रसिद्ध झाली. ही एक शोकात्म कादंबरी आहे, एका स्वप्नाळू स्त्रीची कादंबरी आहे, तिचं लग्नानं समाधान होत नाही, ती मुलीला जन्म देते पण त्याच्यात तिला समाधान वाटत नाही. मग तिचे एका तरुणाशी प्रेमसंबंध जुळतात. त्याच्यानंतर एका जमीनदाराशी प्रेमसंबंध जुळतात. पण हे प्रेमसंबंध तिला फुलफिलिंग वाटत नाहीत. म्हणून ती काही काळ परत धर्माकडे वळते. नंतर तिला तिचा पूर्वीचा लियोन नावाचा प्रियकर पुन्हा भेटतो. आणि ती परत त्याच्या प्रेमात पडते. पण या सगळ्या प्रेमाची परिणती अशात होते की, तिला समाधान लाभत नाही. ती स्वच्छंदी प्रकारची स्त्री असते. आपण पुरुषप्रधान समाजामध्ये फक्त पुरुषाचं मन काय आहे, पुरुषाला सगळे गुन्हे माफ, अशा वृत्तीत जे वावरतो, त्यावर हे भाष्य आहे. स्त्रीला पण भावना आहेत. कारण ज्या काळात ती लिहिली होती, त्यावेळेस स्त्रीला एक गौण स्थान होतं, जे अजूनही आहेच तसं, पण आता जर एवढं आहे, तर आपण विचार करू शकतो की तेव्हा केवढं असेल, त्या काळाच्या युरोपमध्ये. तिला स्वतःच्या ज्या प्रणयसुलभ भावना आहेत, जे तिला करावंसं वाटतं, तिचं कोणाशी प्रेम जुळतं, तिला कोणाबरोबरही प्रणयसंबंध ठेवावे वाटतात, यावर समाजाची कशी नजर होती, हेसुद्धा त्यातून फार मोठ्या प्रमाणात अधोरेखित होतं. या कादंबरीवर खटला भरला गेला, अश्लीलतेचा आरोप केला गेला. या खटल्यातून काही निष्पन्न झालं नाही. साहित्यातील वास्तववाद हा कला आणि सभ्यतेच्या विरोधात गुन्हा आहे, असा पण त्याविरुद्ध आरोप झाला, जो शेवटी टिकला नाही. आता लोकं जेव्हा या कादंबरीबद्दल बोलतात, तेव्हा त्यांना त्यातील अश्लीलता जास्त जाणवते. किंवा ते अश्लीलतेबद्दलच जास्त बोलतात. फ्लॉबेरने त्याच्यात जे चित्र मांडलं आहे, त्याबद्दल कोणी विचार करत नाही. म्हणून त्याने पुढे लिहून पण ठेवलेलं आहे की 'फ्रान्समधील अनेक खेड्यांतून बिचारी माझी बोव्हारी दुःख आणि वेदनेने क्षणाक्षणाला आक्रंदत आहे'. हे एका स्त्रीचं रिप्रेझेंटेशन आहे. अशा अनेक मादाम बोव्हारी समाजात आहेत, असं त्याला त्याच्यातनं सूचित करायचं होतं.

**अथर्व** : सर तुम्ही पुस्तकात फ्योदोर दस्तयेवस्की यांच्यावर लिहिले आहे. मरणाअगोदर काही क्षणांआधी कैद्याची मानसिकता कशी असेल, याचे वर्णन त्यांच्या 'द इडियट' या कादंबरीत आहे, असे तुम्ही पुस्तकात म्हटले आहे. त्यांच्या 'द हाऊस ऑफ डेड' या कादंबरीत त्यांनी तुरुंगातील अनुभवांबद्दल लिहिले आहे. या कादंबरीचाही उल्लेख तुम्ही पुस्तकात केला आहे. तर फ्योदोर दस्तयेवस्की यांच्याबद्दल आणि त्यांच्या या कादंबऱ्यांबद्दल सांगू शकाल का?

**मेहता** : थोडक्यात सांगायचं म्हणजे जागतिक साहित्याच्या इतिहासात दस्तएवस्कीचं नाव आजपर्यंतचा एक महान लेखक असं म्हणून नियमित घेतलं जातं. त्याची 'इडियट' असू द्या, 'ब्रदर्स करमाझव' असू द्या, किंवा 'हाऊस ऑफ द डेड' असू द्या, या कादंबऱ्या नवीन पायंडा पाडणाऱ्या कादंबऱ्या होत्या. मी असं म्हणेन की, आधुनिक कादंबरीचे स्वरूप जे संपूर्णपणे बदललं होतं त्याची सुरुवात दस्तएवस्कीने केली. 'द इडियट' या कादंबरीचा सारांश असा आहे की, ती एका तरुणाची कादंबरी आहे. त्याची अनेक प्रेमप्रकरणं, समाजातील त्याचं स्थान, आणि सामाजिक संबंध, म्हणजे हा एवढा मोठा प्लॉट आहे की तो संक्षेपात सांगणं फार कठीण आहे. ती प्रत्येकाने वाचावी अशी कादंबरी आहे. सामाजिक दंभ जो असतो खोटेपणा जो असतो, याच्यावर लेखकाने कोरडे ओढलेले आहेत आणि जो नायक असतो तो फार निरागस स्वभावाचा असतो. त्याच्यानंतर जी दुसरी कादंबरी आहे 'हाऊस ऑफ द डेड', तिचा मराठीतील प्रख्यात लेखक विश्राम गुप्ते, यांनी 'मेलेल्यांची गढी' अशा नावाने मराठीत अनुवाद केलेला आहे. या कादंबरीत एक अबोल असलेल्या, स्वप्नाळू आणि अलिप्त व्यक्तिरेखेच्या अनुभवांचे चित्रण आहे. ते आत्मकथनात्मक शैलीमध्ये आहे. पत्नीचा खून केल्याच्या आरोपावरून तो तुरुंगवास भोगत आहे आणि त्याची मानसिकता, गुन्हेगारी विश्व आणि तुरुंगातील दाहक परिस्थिती यांचं वस्तुनिष्ठ चित्रण या कादंबरीमध्ये आपल्याला मिळतं. प्रत्येकाने फ्योदोर दस्तएवस्की अवश्य वाचावा अशी माझी आर्जवाची विनंती आहे.

**अथर्व** : सर तुम्ही पुस्तकात James Joyce यांच्याबद्दल लिहिले आहे. त्यांच्या 'युलिसिस' या कादंबरीत त्यांनी विकसित केलेली 'जाणिवेचा संतत प्रवाह' आणि 'अंतस्थ स्वगत' ही दोन्ही सूत्रे प्रगल्भ अवस्थेत प्रकट झालेली आढळतात, असे तुम्ही पुस्तकात म्हटले आहे. तर याबद्दल आणि James Joyce यांच्याबद्दल सांगू शकाल का?

**मेहता** : आपण जेव्हा आधुनिक साहित्य म्हणतो, आधुनिकतावादी जे साहित्य आहे, त्याच्या इतिहासातील सर्वांत महान व्यक्तिमत्त्व म्हणजे जेम्स जॉयस. हा बारकाईने वाचलेल्या आणि विश्लेषण केलेल्या लेखकांपैकी एक आहे. समीक्षकांनी त्याच्या साहित्यकल्पना धार्मिक, स्त्रीवादी, समाजशास्त्रीय, ऐतिहासिक, लैंगिक आणि आत्मचरित्रात्मक अशा वेगवेगळ्या आयामांतून अभ्यासलेल्या आहेत. त्याची जी तरल आणि खोचक विनोदबुद्धी आहे, ती त्याच्या साहित्यातून, प्रामुख्याने युलिसिसमधून आढळते. आणि आधुनिक कलाकारांचे आध्यात्मिक अलिप्तपणाचे प्रतीक, असा त्याच्यावर शिक्का मारला जातो. त्याच्या जटिल कलात्मक प्रतिमेची तुलना इंग्रजी साहित्यातील उत्कृष्ट साहित्यकृतींशी केली जाते. आणि त्याच्या साहित्याचा परिणाम Samuel Beckett, William Faulkner, Thomas Pynchon, John Irving यांसारख्या लेखकांनी मान्य केलेला आहे. युलिसिस जी आहे, तिच्यात आपण जाणिवेचा संतत, kaleidoscopic प्रवाह म्हणतो तो अनुभवतो. ही शैली खरं म्हणजे इतरांनी पण त्यावेळी आत्मसात केली होती, म्हणजे Virginia Wolf किंवा Marcel Proust यांची पुस्तकं असू द्या, तर याच्यात ती शैली आपल्याला सापडते. म्हणजे, आपण जेव्हा विचार करतो, तेव्हा तो एकसंध असा नसतो. त्या विचारात अनेक गोष्टींचा समावेश असतो आणि याच्या आधी जी शैली होती, एक नायक, एक नायिका आणि त्यांच्यामध्ये घडलेले कथानक, अशी जी साचेबद्ध कथानकाची जी शैली होती, त्याच्यात त्याने फार मोठे बदल घडवून आणले. आणि त्यामुळे त्याला फार महत्त्व आहे. ही जी कादंबरी आहे, ती फक्त तीन पात्रांभोवती फिरते. एका आधुनिक

संदर्भात हे ओडिसी या महाकाव्याचं पुनर्कथन आहे, असं म्हटलं जातं. आणि तीन पात्रं जी आहेत, टेलीमॅकस, युलिसिस आणि पेनलॉप ही जुन्या ओडिसीत, ती पात्रं त्याने लिओपोल्ड ब्लूम आणि त्याची पत्नी, मॉली ब्लूम आणि तिसरे आहे ते स्टीफन डेडलस या पात्रांतून आणलेली आहे. ही कादंबरी चोवीस तासांत घडते. यात अठरा प्रकरणे आहेत. कादंबरी सकाळी आठ वाजता सुरू होते आणि मध्यरात्र उलटून गेल्यावर दोन वाजता संपते. दर एक तासाला जे घडतं, जे काही पात्रांचे विचार आहेत, ते विचार त्याने त्यात चित्रित केलेले आहेत. हे जे kaleidoscopic लिखाणाचे चित्रण आहे, ते विसाव्या शतकातील आधुनिकतावादी साहित्याचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. आणि Joyce ने विकसित केलेली जी शैली, जिला जाणिवेचा संतत प्रवाह म्हटले जाते आणि अंतस्थ स्वगत, माणसाच्या मनात जे चाललेलं असतं, या दोन्ही गोष्टी आपल्याला त्यात प्रगत होत जाताना दिसतात.

**अथर्व** : सर, तुम्ही पुस्तकात Fernando Pessoa यांच्याबद्दल लिहिले आहे. त्यांनी आयुष्यभरात ८० च्यावर वेगवेगळ्या टोपणनावांनी लेखन केले आणि आपल्या टोपणनावांना त्यांनी 'प्रतिनावे' असे संबोधले, असे तुम्ही पुस्तकात म्हटले आहे. त्यांच्या 'Book of disquiet' या पुस्तकाचादेखील तुम्ही पुस्तकात उल्लेख केला आहे. Fernando Pessoa यांनी या पुस्तकाचे 'तथ्यविरहित आत्मकथा' असे वर्णन केले असल्याचेसुद्धा तुम्ही पुस्तकात म्हटले आहे. तर याबद्दल आणि Fernando Pessoa यांच्याबद्दल सांगू शकाल का?

**मेहता** : Fernando Pessoa हा एक वेगळ्याच प्रकारचा माणूस होता. तो जेव्हा जिवंत होता, तेव्हा त्याची फारशी कोणी दखल घेतली नाही. त्याचं साहित्य त्याच्या मृत्यूनंतर मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय झालं. त्याने जी प्रतिनावे घेतली होती, त्या प्रत्येक प्रतिनावाला स्वतःचं एक व्यक्तिमत्त्व होतं. असे नाही की त्याने फक्त त्या टोपणनावाने लिहिले. त्या प्रत्येक नावात तो स्वतः जगत होता. आणि त्यांच्या मनात जे विचार चालले होते, त्यांची जी मनस्थिती होती, ती त्याने वेगवेगळ्या पात्रांच्या साहाय्याने आपल्या साहित्यातून उलगडून दाखवली आहे. त्याचे एक पुस्तक हे दुसऱ्या पुस्तकापेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. त्याने मृत्यूपूर्वी जे पुस्तक लिहिले होते, 'Book of Disquiet', जे त्याच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाले. त्या पुस्तकात त्याने सोआरेस नावाचा जो माणूस आहे, तो एक कारकून आहे आणि त्याच्या जीवनाबद्दल त्याने लिहिले आहे. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे ती एक साधीसुधी कथा आहे पण त्याला अनेक वेगवेगळे कंगोरे आहेत. आणि सोआरेस या पात्राला, त्या प्रतिव्यक्तिरेखेला, मी म्हणेन, Fernando Pessoa ने आपल्या सर्वांत जवळचा मानले होते. हा एक अल्पवयीन कारकून, जो भाड्याच्या खोलीमध्ये आयुष्य घालवतो. त्याने स्वतःचे वर्णन त्याच्या व्यक्तिमत्त्वाची विकृती, असे केले आहे. हे जे पुस्तक आहे, ते पुष्कळ वेळा आपल्याला random स्वरूपात आढळतं, त्याने त्या नोंदींसारख्या jotting करून ठेवल्या होत्या. पण ते एकत्र आणून त्याच्यावरती कथा निर्माण केली, त्याच्यावरती ऑक्टाव्हियो पाझसारख्या लेखकाने– ज्याला नोबेल पारितोषिक मिळाले होते, त्यानेसुद्धा Pessoa च्या या पुस्तकाला आपल्या जीवनात फार मोठे महत्त्व दिले होते. तो म्हणतो की, निरर्थक गोष्टींचा गंभीर तपासकर्ता, अशी Fernando Pessoa ची ख्याती आहे. हे वेगळ्याच प्रकारचे व्यक्तिमत्त्व होते. मला वाटतं, त्याच्या आधी आणि त्यानंतरसुद्धा अशा प्रकारचे व्यक्तिमत्त्व साहित्यात निर्माण झालेलं नाही, असे पाझने म्हटले आहे.

**अथर्व** : सर, तुम्ही पुस्तकात Arthur koestler यांच्याबद्दल लिहिले आहे. बुद्धिजीवी आणि

सामाजिक कार्यकर्ता असलेला Arthur Koestler त्याच्या 'Darkness at noon' या राजकीय कादंबरीमुळे प्रकाशझोतात आला, असे तुम्ही पुस्तकात म्हटले आहे. तर याबद्दल आणि Arthur koestler यांच्याबद्दल सांगू शकाल का?

**मेहता** : आर्थर कोस्लरने फार लिखाण केले आहे. त्याच्या सहा कादंबऱ्या आणि चार खंडांत लिहिलेलं त्याचं आत्मचरित्र, यांचा त्यात समावेश आहे. तो हंगेरीयन, जर्मन आणि इंग्लिश या तिन्ही भाषांतून लिहीत असे. त्याच्या साहित्यकृतींप्रमाणे त्याचं वैयक्तिक आयुष्यदेखील वादळी होतं यात काही शंका नाही. तो ज्यू होता. तो एक कार्यकर्ता होता, पूर्वी साम्यवादी आणि नंतर भ्रमनिरास झालेला साम्यवादाचा विरोधक, परामानसशास्त्रावरती अभ्यास करणारा माणूस, १९६० च्या दशकात डॉ. टिमोथी लिअरी यांची जेव्हा एल.एस.डी. वरती निरनिराळी संशोधनं चालवली होती, त्याच्यात त्याने स्वतः सहभाग घेतला होता. म्हणजे एल.एस.डी.चे सेवन करून माणसाची जी अतींद्रिय शक्ती आहे, ती कशी जागृत करता येईल, यावरतीदेखील त्याने फार अभ्यास केला होता. 'डार्कनेस ॲट नून' या पुस्तकाने त्याच्या नावाभोवती एक वेगळे वलय निर्माण केले. ही कादंबरी म्हणजे समाजवादी व्यवस्थेत, विचारसरणीचे जे पावित्र्य आहे ते राखण्याच्या वरकरणी हेतूने पक्षांतर्गत राजकीय विरोधकांना कसे नेस्तनाबूत केले जाते, याचे वर्णन आहे. जो युटोपिया असतो, डाव्यांचा किंवा कुठल्याही राजकीय विचारसरणीच्या लोकांचा, आता डाव्यांचा प्रभाव ओसरला आहे, आता उजव्या विचारसरणीच्या लोकांचा प्रभाव आहे, त्याच्यात पुष्कळजण युटोपिया शोधण्याचा प्रयत्न करतात, म्हणजे एक स्वप्नभूमी, पण तो कसा डिस्टोपिया असतो, तो डिस्टोपियामध्ये कसा बदलतो, याचं वर्णन आपल्याला 'डार्कनेस ॲट नून'मध्ये सापडतं. त्याची जी चौकशी चालू असते, तो एका पक्षाचा कार्यकर्ता असतो आणि एक ठरलेलं असतं, काहीही चौकशी असू द्या, शेवटी त्याला मृत्युदंडच द्यायचा आहे. म्हणून त्याचं नावच, 'भर दुपारी अंध:कार' असं आहे.

**अथर्व** : सर, तुम्ही पुस्तकात J. D. Salinger यांच्याबद्दल लिहिले आहे. त्यांच्या 'Catcher in the rye' या कादंबरीबद्दल सुद्धा तुम्ही पुस्तकात लिहिले आहे. प्रामाणिक, दंभिकतेची चीड असणाऱ्या आणि कड्यावरून कोसळणाऱ्या लहान मुलांना वाचविणारा 'Catcher in the rye' होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या होल्डन कॉलफील्डची ही कथा आहे. तर या कादंबरीबद्दल आणि J D. Salinger यांच्याबद्दल सांगू शकाल का?

**मेहता** : J. D. Salinger ची 'कॅचर इन द राय' ही कादंबरी सर्वांत जास्त खपलेली कादंबरी आहे, असे म्हणतात. या कादंबरीने एकेकाळी आणि अजूनही फार लोकांना वेड लावले होते. प्रत्येक पिढीचा चोखंदळ वाचक आवर्जून Catcher In The Rye वाचतोच. Salinger ची पार्श्वभूमी वेगळी होती. लेखनाची सुरुवात करण्याआधी तो शिक्षकी पेशात होता, आणि न्यूयॉर्क विद्यापीठामध्ये त्याने वर्षभरासाठी प्रवेश घेतला होता. पण तो फक्त उत्तम शिक्षक नव्हता, त्याच्यात फार मोठे लेखनगुण होते. त्याचे जे अनेक मित्र होते, प्राध्यापक होते, त्यांनी त्याच्यातील हे गुण हेरले, आणि त्याला लिहायला प्रवृत्त केले. 'Catcher In The Rye' कादंबरी एका कोवळ्या शाळकरी मुलाची सारी घुसमट आहे, त्याची व्यवस्थेविषयीची चीड आहे, शिक्षणव्यवस्थेबद्दलची जी अनास्था आहे, ही फक्त दोन दिवसांच्या आत्मनिवेदनातून आपल्यासमोर येते. आता या कादंबरीचे जे दूरगामी परिणाम झाले, की ही कादंबरी अश्लील आहे, ह्यात communist विचारधारा आहे, असे आरोप तिच्यावर झाले. लैंगिक

संबंधांबद्दल या कादंबरीत उघडपणे लिहिले गेले आहे. त्यामुळे या कादंबरीवर त्याकाळी अमेरिकेत टीकाही झाली. या कादंबरीला लिहून बराच काळ लोटला आहे, पण त्याचा जो तरुण नायक आहे, तो अजूनही वाचकांच्या मनात ताजातवाना आहे. जॉन लेननचा ज्या माणसाने खून केला, डेव्हिड चॅपमनने, त्याने सुद्धा लिहून ठेवले की तो लेननचा खून करण्याआधी Catcher In The Rye वाचत होता. कादंबरीतील जी घुसमट आहे, त्याच्याशी तो आयडेंटिफाय करत होता. म्हणून Catcher In The Rye चे जे महत्त्व आहे, ते कालातीत आहे.

**अथर्व** : सर, तुम्ही पुस्तकात रे ब्रॅडबरी यांच्याबद्दल लिहिले आहे. त्यांच्या 'Fahrenheit 451' या dystopian कादंबरीबद्दलसुद्धा तुम्ही पुस्तकात लिहिले आहे.तर याबद्दल आणि विज्ञानकथा या साहित्यप्रकाराबद्दल सांगू शकाल का?

**मेहता** : आर्थर क्लार्क, रे ब्रॅडबरी या पठडीतल्या लेखकांना तुम्ही विज्ञानकथांचे जनक म्हणू शकता. Jules Verne च्या कथांमध्ये विज्ञानकथांचा अंश नक्कीच सापडतो. पण आता जी विज्ञानकथा आपण वाचतो, विज्ञान प्रगत झाल्यानंतर, ती खऱ्या खुऱ्या अर्थाने प्रगत झाली आर्थर क्लार्क, रे ब्रॅडबरी यांच्या लेखनातून. त्याची 'फॅरेनहाईट ४५१' ही जी कादंबरी आहे, ती एक छोटेखानी कादंबरी आहे. ती प्रगत यंत्र युगात मानव माहिती आणि ज्ञानसंपादनासाठी संपूर्णपणे इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या कसा आहारी जातो, या विषयाबद्दल आहे. पुस्तके वाचल्याने माणूस संभ्रमित होतो, असा दावा करून शासन यंत्रणांकडून सगळी पुस्तकं गोळा करून जाळली जातात, नष्ट केली जातात. प्रगत तंत्रज्ञानामुळे आग लागण्याचे जे प्रकार असतात, ते बंद झालेले असतात. त्यामुळे अग्निशमन दलाला काही काम राहत नाही. फक्त त्यांना एकच काम राहतं की पुस्तक गोळा करायची आणि त्यांची होळी करायची. आता आपण जे आर्टिफिशियल इंटेलिजन्स वगैरे म्हणतो, त्याची मुळं आपल्याला रे ब्रॅडबरीच्या कादंबरीत मिळतील. पण त्याच्यात तो म्हणतो की हे जे तंत्रज्ञान आहे, त्याचा फायदा घेऊन, समाजातील काही घटक सर्वसामान्यांवरती कशी सत्ता गाजवू शकतील, याचं एक दारुण असं चित्र आपल्याला या कादंबरीत दिसतं. आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे १९६६ साली फ्रांस्वा त्रुफांने त्याच्यावर चित्रपट पण बनवलेला आहे, तो बघण्यासारखा आहे.

**अथर्व** : सर, तुम्ही पुस्तकात magical realism, म्हणजेच जादुई वास्तववादाबद्दल लिहिले आहे. तर याबद्दल आणि या साहित्य प्रकारात लिहिणाऱ्या लेखकांपैकी कुठले लेखक तुम्हांला आवडले आणि महत्त्वाचे वाटले, याबद्दल सांगू शकाल का?

**मेहता** : असं म्हणतात की जादुई वास्तववादाचा उगम Franz Kafka च्या मेटामार्फोसिस पर्यंत मागे नेता येतो. म्हणजे एक वेगळ्या प्रकारची शैली, जे आपलं दैनंदिन जीवन आहे, त्याचा वास्तववाद आणि एक वेगळं, ज्याची आपण कल्पना करू शकत नाही असं वास्तव, या दोन्हीचे त्याच्यात मिश्रण केले जाते. आता याच्यात अनेक लेखक, म्हणजे मला इसाबेल आयेंदे आवडते, गाब्रिएल गार्सिया मार्केस आवडतो, अलीकडचा हारुकी मुराकामी आवडतो. या लोकांनी या प्रकाराला एक वेगळी झळाळी आणली. वाचकांना एका वेगळ्या विश्वात त्यांनी नेले. ते रोजच्या जीवनातील विस्मयजनक घटनांकडे पाहण्याचे एक विवेकी सूत्र आहे, त्याच्यात व्यक्तिनिष्ठता, भावविवशता हे सगळे मानवी गुण आहेतच, पण त्यात भूत-वर्तमान-भविष्य यांचे स्मरणसूक्त आणि रोमँटिक भावभावना त्यांना इकडे फाटा दिला जातो. मार्केजच्या 'वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलिट्यूड'मध्ये हे प्रकर्षाने आपल्या डोळ्यासमोर

येते. मार्केजसुद्धा मेटामार्फोसिसने फार प्रभावित झाला होता. त्याने त्याच्या वयाच्या सतराव्या वर्षी हे वाचले. आणि त्यातून त्याला एक प्रेरणा मिळाली की, आपणही असं लिहू शकतो. अर्थात त्याचे 'वन हंड्रेड इयर्स ऑफ सॉलिट्यूड' हे पुस्तक जगभर गाजले आहे. आणि त्यानंतरचे 'लव इन द टाईम ऑफ कॉलरा' आणि इतर जी पुस्तकं आहेत ही पुस्तकंसुद्धा फार गाजली आहेत. त्यावर चित्रपट पण निघाले आहेत.

**अथर्व** : सर, तुम्ही पुस्तकात मिलान कुंदेरा यांच्याबद्दल लिहिले आहे. आणि हा लेख पुस्तकातील इतर लेखकांच्या तुलनेत मोठा आहे. मिलान कुंदेरा यांच्या कादंबऱ्यांतील पात्रे राजकीय परिस्थितीविरुद्ध ठाम संघर्ष करण्याचा प्रयत्न करतात, असे तुम्ही पुस्तकात म्हटले आहे. तर याबद्दल आणि मिलान कुंदेरा यांच्याबद्दल सांगू शकाल का?

**मेहता** : मिलान कुंदेराचा अनेक समीक्षकांनी विसाव्या शतकातील सर्वांत प्रभावी कादंबरीकार, असा गौरव केलेला आहे. गेल्या वर्षी ११ जुलैला त्याचे निधन झाले. तो मूळ झेक लेखक होता. तो चित्रपट निर्माता होता आणि एका प्रभावशाली पिढीचा तो भाग होता, जी दुसऱ्या महायुद्धाच्या अशांतीनंतर वयात आली. त्या पिढीतील अनेकांप्रमाणे मिलान कुंदेरा हा साम्यवादी चळवळीतुन आला होता. आणि त्यानंतर त्याने त्या राजवटीवर टीकासुद्धा केली. त्यामुळे त्याची पक्षातून हकालपट्टी झाली. नंतर त्याला एक सन्माननीय लेखक म्हणून पक्षात परत बोलावलं गेलं. असे अनेक वेगवेगळे अनुभव त्यांनी घेतले होते. त्याने प्राग विद्यापीठात साहित्य आणि सौंदर्यशास्त्राचा अभ्यास केला होता. वयाच्या ३८ व्या वर्षी त्याने आपली पहिली 'The Joke' ही कादंबरी लिहिली. त्याच्यात एक अल्पवयीन विद्यार्थी आपल्या प्रेयसीला भेटकार्ड देतो, त्यात एक वाक्य लिहितो 'आशावाद म्हणजे जनतेची अफू, निरोगी वातावरणात मूर्खपणाचा दुर्गंध असतो, ट्रॉटस्की चिरायू होवो'. हे तिकडच्या त्या काळातील राजवटीला पटत नाही. त्या मुलाची विद्यापीठातून हकालपट्टी केली जातेच, पण त्याला सक्तमजुरीची शिक्षा सुद्धा देण्यात येते आणि त्याला खाणीमध्ये मजूर म्हणून पाठवले जाते. त्या काळात झेक समाजामध्ये, प्राग स्प्रिंग म्हणून उदारीकरणाचा जो अल्पायुषी काळ होता, त्या काळात ही कादंबरी लिहिणं त्याला शक्य होतं. कारण या काळात थोडं लिबरल वातावरण होतं. या कादंबरीच्या तीन आवृत्त्या एकापाठोपाठ प्रकाशित झाल्या आणि तो प्रकाशझोतात आला. त्यानंतर तो फ्रान्समध्ये स्थलांतरित झाला. आणि त्याने फ्रेंच भाषेत लिहायला सुरुवात केली. त्याचे जे साहित्य आहे, त्यात प्रेम, स्मृती, राजकारण, अस्तित्ववाद अशा अनेक विषयांचा तो शोध घेतो हे दिसून येते. 'अनबेअरेबल लाईटनेस ऑफ बिइंग' ही त्याची सर्वांत प्रभावशाली कादंबरी मानली जाते. ही कादंबरी सोव्हियत वर्चस्वाच्या अशांत वर्षामध्ये प्रागमधील एकमेकांना जोडले गेलेल्या अनेक पात्रांचे परीक्षण करते. या कादंबरीत तो तात्त्विक कल्पनांचा शोध घेतो. मानवी अस्तित्वाचे स्वरूप शोधणारी ही एक कादंबरी आहे आणि ती जागतिक बेस्टसेलर बनली आहे. कुंदेराच्या शैलीत बौद्धिक गहनता आहे, आणि समृद्ध प्रतीकात्मकता आहे, त्याचं जे गद्य आहे, ते एकदम गीतात्मक आहे. हे सगळे गुण आपल्याला त्या कादंबरीतून जाणवतात. या दोन कादंबऱ्यांव्यतिरिक्त त्याने Immortality, Identity, Farewell To World, Book Of Laughter And Forgetting या अत्यंत वाचनीय कादंबऱ्या एकामागोमाग लोकांसमोर सादर केल्या. फ्रेडरिक नित्शे, मार्टिन हायडेगर यांचा प्रभाव, यांच्या तत्त्वज्ञानावर रेखाटलेल्या त्याच्या कादंबऱ्या बुद्धिजीवी वर्गाला फार भावतात. त्याच्यात जे विचार मांडलेले आहेत ते

सामान्य माणसाला समजणं थोडंसं कठीण जाऊ शकतं. पण बुद्धिजीवी माणसांना त्याच्या कादंबऱ्या अत्यंत अपीलिंग आहेत. त्याने निबंध लिहिले, नाटके लिहिली. कविता लिहिल्या. एक अष्टपैलू साहित्यिक म्हणून त्याने स्वतःचे नाव अधोरेखित केले आहे. गेल्या वर्षी तो वारल्यानंतर त्याच्यावरती अनेक लेख प्रकाशित झाले. एका वेगळ्या पिढीचा तो प्रतिनिधी होता. त्याचा निबंधसंग्रह सुद्धा महत्त्वाचा आहे. युरोपातील जवळजवळ प्रत्येक देशावर त्याचे निबंध तुम्हांला सापडू शकतील. त्याचा आवाज म्हणजे पिढ्यांचा अनुभव आणि सखोल चिंतन आणि शहाणपण असं समीक्षकांकडून म्हटले जाते.

**अथर्व** : सर तुम्ही थॉमस पिंचन यांच्याबद्दल पुस्तकात लिहिले आहे. त्यांची कल्पनाशक्ती व गाढ्या अभ्यासामुळे अगणित ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक संदर्भ शोधून त्यांचे ते वेगळ्या आयामातून स्पष्टीकरण देतात. त्यांच्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण कथाबीजांतून ते सातत्याने प्राधिकारी वर्गाबद्दलची नापसंती व्यक्त करतात, असे तुम्ही थॉमस पिंचन यांच्या साहित्याबद्दल पुस्तकात लिहिले आहे. तर याबद्दल आणि थॉमस पिंचन यांच्याबद्दल सांगू शकाल का?

**मेहता** : थॉमस पिंचनबद्दल लिहिणं म्हणजे फार कठीण काम आहे. कारण या लेखकाने एकांतवासाचा ध्यास घेतलेला आहे. तो चाहत्यांपासून, प्रसारमाध्यमांपासून नेहमीच दूर राहिलेला आहे आणि प्रसिद्धिविन्मुख असा तो माणूस आहे. त्याला प्रसिद्धीचा बिलकूल सोस नाहीये. तो आपल्या खाजगी जीवनामध्ये कोणालाच डोकावू देत नाही. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्याची एकही पब्लिक मुलाखत अजूनही प्रकाशित झालेली नाही. म्हणून त्याच्याबद्दल जाणून घेणे कठीण काम आहे. त्याची ओळख आपल्याला त्याच्या साहित्यातूनच घडते. त्याचा वैयक्तिक दृष्टिकोन, विचार काय आहेत हे आपल्याला समजणं थोडंसं कठीण आहे. एक महान कादंबरीकार म्हणून त्याची सगळीकडे ख्याती झालेली आहे. कादंबरीकार म्हणून त्याचे जे स्थान आहे, ते एकदम वादातीत आहे. 'व्ही' ही त्याची पहिली कादंबरी, जी १९६३ साली प्रकाशित झाली होती. तिला १९६४ साली नॅशनल बुक अवार्ड साठी नामांकन मिळाले. त्यात दीर्घ आणि गुंतागुंतीचे कथानक आहे. एका वेगळ्या ऐतिहासिक कालखंडामध्ये ते घडतं. त्याची मूळ कथा, नौसेनेतील माजी खलाशी बेनी प्रोफेन हा न्यूयॉर्कमध्ये येऊन एका भूमिगत कलाकारांच्या गटाला भेटतो इथून सुरू होते. अमेरिकेच्या इतिहासातील वेगवेगळ्या काळांचे दुवे जुळवत 'व्ही' या पात्राचा अंतर्गत शोध घेत जाते. यामुळे त्याला एक मोठा चाहता वर्ग मिळाला. त्यानंतर त्याची 'क्राइंग ऑफ लॉट फोर्टी नाईन' ही एकदम छोटी कादंबरी १९६६ मध्ये आली. ही ओडीपा मास या एका महिलेविषयी आहे. तिच्या प्रियकराच्या मृत्यूनंतर त्याची मालमत्ता तिला मिळते. दोन कंपन्यांचे षडयंत्र असणाऱ्या गोष्टीचा ती शोध घेते. पॉप संस्कृतीतील विविध छटांचा अनुभव आपल्याला यात मिळतो. त्यात विनोदीशैलीदेखील आहे. तिला उत्तर आधुनिक साहित्यातील अमेरिकेतील एक महत्त्वाची साहित्यकृती मानले जाते. त्याची सर्वश्रेष्ठ कादंबरी जी वाखाणली जाते, ती म्हणजे 'ग्रॅव्हिटीज रेनबो'. त्याची कथा पण फार जटिल आहे. त्याच्यात शेकडो पात्रं आहेत. दुसऱ्या महायुद्धादरम्यान जर्मन सैन्याने जे आपल्या रॉकेटचे डिझाईन केले होते, उत्पादन केले होते, त्या संदर्भातील गूढता शोधण्याचे प्रयत्न त्यात दाखवले आहेत. या कादंबरीमध्येदेखील पॉप संस्कृती, अध्यात्म, भौतिकशास्त्र, इतिहास, शस्त्रास्त्र विद्या, गणित, तत्त्वज्ञान या विषयावरचा सविस्तर अभ्यास आपल्याला दिसतो. एक लेखक इतक्या सगळ्या विषयांवरती कसा काय अभ्यास करू शकतो, याचे

एक विस्मयकारी चित्र आपल्याला इथे दिसते. त्याची सर्वांत जाडजूड कादंबरी म्हणजे 'Against The Day'. जवळजवळ हजार पानी कादंबरी. ही २००६ मध्ये प्रकाशित झाली. यात सुद्धा अनेक प्लॉट्स, शंभर पेक्षा जास्त पात्रे आहेत. यात विनोद, विडंबन, विरोधाभास यातून एवढ्या मोठ्या कथानकाला तो रंगतदार बनवण्याचा प्रयत्न करतो. नंतरच्या त्याच्या कादंबऱ्या फार प्रसिद्ध झाल्या आहेत. आणि त्याला जगभरातून वाचकवर्ग मिळालेला आहे. त्याच्या एकलकोंड्या स्वभावामुळे त्याच्या कादंबऱ्यांतूनच त्याच्या ज्ञानभांडाराचे आपल्याला दर्शन होते. मागच्या दोन दशकांतील सर्वांत विद्वान कादंबरीकार असे त्याला अनेक समीक्षकांनी म्हटले आहे.

**अथर्व** : सर, तुमचे पुस्तक अभिजात साहित्याबद्दल आहे. तर तुमच्या पुस्तकाच्या विषयाहून थोडा वेगळा प्रश्न आहे.तुम्हांला जे साहित्य अभिजात नसते, त्याबद्दल काय वाटते? म्हणजे मला जेवढी समज आहे,त्यानुसार अभिजात साहित्याचा वाचक हा संख्येने छोटा असतो, पण प्रत्येक पिढीतील वाचक असे अभिजात साहित्य वाचतो, आणि अभिजात नसलेल्या साहित्याचा वाचक संख्येने मोठा असतो, पण तो ते साहित्य प्रकाशित झाल्यानंतरच्या काही काळातीलच असतो, नंतरच्या काळातील वाचक ते साहित्य सामान्यपणे वाचत नाहीत. तर अभिजात नसलेल्या साहित्याबद्दल तुमचे काय मत आहे आणि असे कुठले अभिजात नसलेले साहित्य आहे जे तुम्हांला आवडले होते किंवा आत्ताही वाचायला आवडते?

**मेहता** : आपण जसे संगीत ऐकतो, भावगीत ऐकतो किंवा शास्त्रीय संगीत ऐकतो त्याचप्रमाणे आपण जे रोजच्या जीवनातील सार सांगणारं लेखन असतं, ते वाचतो. जे गूढ नसतं त्याबद्दल माणसाला काहीच कुतूहल नसतं. काही वर्षांपूर्वी, म्हणजे ॲलोपॅथी जेव्हा डेव्हलप झाली नव्हती, माणसाला शरीर म्हणजे काय याचे फार कुतूहल होते. आता ते कुतूहल तेवढेसे राहिलेले नाही. तरी त्यावरसुद्धा लिखाण केले जाते. सगळं माहीत असूनसुद्धा. जे माहीत नसतं, ते वाचकांसमोर कसं आणायचं, हा अभिजात साहित्याचा एक मोठा गुण आहे. मी असं म्हणत नाही की अभिजात नसलेलं साहित्य एकदम कचरा साहित्य आहे किंवा ते वाचू नये. सगळ्यांनी त्यांच्या बुद्धीच्या कुवतीला जे झेपतं, ते वाचावं. पण अभिजात साहित्याचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा सर्वांत महत्त्वाची गोष्ट जी मी आधीच नमूद केली होती, ती म्हणजे तुम्ही ते साहित्य केव्हाही वाचा, शंभर वर्षानंतर वाचा किंवा दोनशे वर्षांनंतर वाचा, ते तुम्हांला अपील होत राहील. बाकीच्या साहित्याचं तसं नाही होत. फक्त तुमचा मनोरंजन हा जर उद्देश असेल, तर तुम्ही काहीही वाचू शकता. पण तुम्हांला तुमच्या बुद्धीला चालना देणारं काही वाचायचं असेल, अभिजात साहित्य हाच पर्याय आहे . कारण माणसाला तऱ्हेतऱ्हेच्या भुका असतात, आणि प्रत्येकाची भूक तुलनात्मकदृष्ट्या वेगवेगळी असते. काहींचं पोट थोडसं खाऊन भरतं. काहींना चविष्ट पाहिजे असतं. काहींना भुकेपेक्षा चव महत्त्वाची असते. हे सगळे वेगवेगळे घटक आहेत त्याच्यात. म्हणून प्रत्येकाने आपल्या परीने त्यांना जे आवडते ते वाचावे. माझा असा आग्रह नाही की फक्त अभिजात आहे तेच वाचावं. प्रत्येकाने आपापल्या कुवतीने साहित्याचा, सिनेमाचा, कलेचा आस्वाद घ्यावा.

**अथर्व** : सर, धन्यवाद! तुम्ही मुलाखत दिली. मला वाटतं मुलाखत खूप चांगली झाली आहे. थँक्यू सर.

❑

# विकास पालवे यांची फेसबुक पोस्ट

गेल्या काही वर्षांत एका विशिष्ट राजकीय विचारसरणीकडे देशाची सत्ता गेल्यानंतर समाजमनात जो काही दुभंग निर्माण झालेला आहे, विशिष्ट धर्म आणि जातींप्रती पद्धतशीरपणे तिरस्कार, द्वेष पेरला गेला आहे त्याची परिणती व्यक्तिगत नातेसंबंधांच्या मोडतोडीतही झालेली आहे. सत्ताधाऱ्यांच्या कृपाशीर्वादामुळे फोफावलेली ट्रोलसेना समाजमाध्यमांचा वापर अनैतिहासिक माहिती आणि धार्मिक विद्वेष पसरवण्यासाठी करू लागली आहे. सत्ताधारी, पोलीस यांचा पाठिंबा असणाऱ्या झुंडींकडून केली जाणारी विशिष्ट धर्मीयांची हत्या, मशिदींवर केले जाणारे हल्ले, संविधानाच्या गाभ्यावर प्रहार करण्याचे व्यक्त केले जाणारे मनसुबे यांमुळे कित्येक शतकांपासून चालत आलेली हिंदू-मुस्लीम धर्मीयांची सामायिक संस्कृती कधी नव्हे इतकी धोक्यात आलेली स्पष्टपणे दिसते आहे. सत्ताधारी पक्ष आणि त्यांचे सुभेदार, शिलेदार यांनी या दोन्ही धर्मांत असलेल्या प्रेम आणि सलोख्याच्या वाटा पुसून टाकण्याचा चंग बांधला आहे. संग्राम गायकवाड यांची 'मनसमझावन' ही कादंबरी हा सगळा कोलाहलपूर्ण काळ अत्यंत समर्थपणे अभिव्यक्त करते. कादंबरीचा आकृतिबंध हा पात्रं, वस्तू, वास्तू यांनी आपापली स्वगतपर निवेदनं सांगणं असा आहे. प्रत्येक पात्राची सामाजिक स्थिती आणि त्याचा भूप्रदेश यांनुसार निवेदनांची भाषा बदलत जाते. या बहुस्वरीयतेमुळे कादंबरी कंटाळवाणी तर होत नाहीच, पण कादंबरीकाराच्या वेगवेगळ्या स्तरांवरील भाषेच्या उपयोजनामुळे आपण भाषिकदृष्ट्या समृद्ध होतो. कादंबरीकार काही वेळा पात्रांचं निवेदन खूप काव्यात्म पातळीवर घेऊन जातो. विशेषतः जेव्हा लालबाबाचा दर्गा, म्हसोबाचं देऊळ अशा निर्जीव वास्तू त्यांची बाजू मांडत असतात किंवा त्यांच्याशी संबंधित घडलेल्या घटना कथन करत असतात, तेव्हा त्या सामाजिक-राजकीय इतिहास, संस्कृती यांच्या काठाकाठावरून सफर घडवत काव्यात्म विधानं करतात.

चिन्मय या पात्राचं ट्विटर हॅण्डल जेव्हा बोलू लागतं, तेव्हा या माध्यमावर चालणारा विखारी प्रचार कसा असतो याची कल्पना येते. व्हॉट्सअप स्वतःची भूमिका मांडतं, तेव्हा गेल्या दहा वर्षांत नवराष्ट्रवाद्यांचा आणि नवइतिहासकारांचा (खरंतर इतिहास विकृत करणाऱ्यांचा) उदय झाल्यानंतर या

माध्यमाचा वापर लोकांना एका विशिष्ट धर्माच्या लोकांचा द्वेष करण्यासाठी कशा पद्धतीने होतोय याचा काहीएक अंदाज वाचकाला येतो. एकाच कुटुंबातील सदस्यांत किंवा नातेवाइकांत भिन्न विचारसरणीच्या लोकांमध्ये कसे ताण निर्माण होत आहेत, पुरोगामी विचारसरणी आचरणाऱ्या लोकांना कसं टार्गेट केलं जातंय हे कादंबरीकार मंजिरी, केशव, चिन्मय यांच्या व्हॉट्सअपवरील वावरावरून अधोरेखित करतो. हिंदू आणि मुस्लीम या दोन धर्मांत प्रेमविवाह करणं किती संकटांना आमंत्रण देण्यासारखं असतं आणि ते छोट्या गाव किंवा शहरातील असेल तर त्यात किती गुंतागुंत असते हे कादंबरीकार राबिया आणि सुध्या यांच्या प्रेमप्रकरणाची कशी वाताहत होते, याच्या चित्रणावरून दाखवून देतो. कादंबरीकार केवळ दुभंग निर्माण करणाऱ्या गोष्टीच सांगत नाही. पराग जोशी या पात्राचं लहानपणी अस्लमच्या घरी जाणं, त्याच्या घरात वावरणं, त्याच्या ताटातले पदार्थ खाणं या त्याच्या आठवणींतून वर येणाऱ्या गोष्टी या दोन धर्मांतील लोकांत कधी काळी असं खेळीमेळीचं नातंदेखील होतं हे दर्शवणाऱ्या आहेत.

दखनी भाषेच्या स्वगतातून त्या भाषेच्या संक्षिप्त इतिहासासोबतच तिला लगडून असणारी सामायिक संस्कृती कोणती याची कल्पना येते. लालबाबा नावाच्या एका सूफी संताने दखनी भाषेत लिहिलेली 'मनसमझावन' नावाच्या काव्यग्रंथाची पोथी अशा सामायिक संस्कृतीला बळकट करणारी अनेक उदाहरणं वागवणारी असते. यात रामभक्तीचे गोडवे गायलेले आहेत. सूफी संतांचे अनेक विचार रामदासांनी दखनी भाषेत रचलेल्या पदांत व्यक्त केले आहेत. अशी अनेक उदाहरणं हिंदू-मुस्लीम यांतल्या सौहार्द, सलोखा यांनी व्यापलेल्या वारशाची आठवण करून देणारी आहेत. ती आजच्या काळात खूपच मननीय आहेत. बाभूळगावातून एक वीट कारसेवेसाठी गेलेली असते. तिचंही मनोगत संदर्भानुसार कथनात येतं. त्यातून धार्मिक उन्मादी वातावरण, हिंसाचार आणि रामजन्मभूमी परिसरातील इतिहास या गोष्टींचा धांडोळा घेतला जातो.

देशपातळीवर घडणाऱ्या विभाजनकारी घटनांमुळे लहान गावांत पूर्वापारपासून चालत आलेल्या सामायिक संस्कृतीला कसे तडे जातात हे सांगण्यासाठी तो बाबरी मशीद पाडण्याची प्रतिक्रिया म्हणून एका छोट्या गावात लालबाबाचा दर्गा आणि त्याला लागून असलेलं म्हसोबाचं मंदिर यांत काही विघ्नसंतोषी लोकांनी निर्माण केलेला दुरावा चित्रित करतो. मंदिराला वेगळा दरवाजा पाहिजे म्हणून दर्ग्याची भिंत पाडली जाते. ही भिंत पाडली जाते, पण लोकांच्या मनात मात्र विलगीकरणाच्या भिंती उभ्या राहतात, हे कादंबरीकार थेट न सांगताही अग्रभागी आणतो.

कादंबरीकार केवळ हिंदू धर्मात निर्माण होत असलेली कट्टरता नमूद करत नाही, तर तो मुस्लीम समाजातील कट्टरताही नोंदवतो. समीर मोहोळकर या पात्राच्या निवेदनातून एक प्रसंग समोर येतो. पुरोगामी मुस्लीम संघटनेचा धडाडीचा कार्यकर्ता सलीमच्या मृत्यूनंतर मुस्लीम समाजातील कट्टरतावादी लोक 'हा आमच्या धर्माला विरोध करणारा आणि त्याचे पालन न करणारा होता, त्यामुळे तो मुस्लीम नव्हता' असं कारण देत कब्रस्तानात दफनासाठी जागा देण्यास नकार देतात. हा कादंबरीकार एखाद्या पक्षासारखा थोड्याशा उंचावरून सबंध समाजावर घिरट्या घालत सगळ्यांचे सगळे व्यवहार न्याहाळतो आहे आणि त्यांतली संगती व विसंगती नेमकेपणाने शोधून काढतो आहे, असं वाटत राहतं.

वाढत्या धार्मिक उन्मादाच्या काळात मुस्लीम समाजाला त्यांच्या मुस्लीम असण्याची सतत जाणीव करून दिली जात आहे. समीरला त्याच्या ऑफिससाठी त्याच्या आडनावावरून जागा नाकारली जाते, कॉलेजमधील सहाध्यायांच्या व्हॉट्सअप ग्रुपवर वाढत चाललेला मुस्लिमद्वेष सहन न झाल्याने तो

ग्रुप सोडावा लागतो. त्यामुळे इस्लाम धर्माचं फारसं पालन करत नसतानाही त्याला आपण मुस्लीम आहोत हे नव्याने जाणवू लागतं. हे आजचं अनेक मुसलमानांच्या वाट्याला येणारं वर्तमान कादंबरीकार यथायोग्यपणे उजागर करतो. याच परिस्थितीमुळे रॅडिकलाईज होऊन आयसिस या दहशतवादी संघटनेच्या जाळ्यात अडकणारा तरुणही कथनात येतो. कुटुंबातील सदस्यांच्या खाजगी चर्चांत प्रोपोगंडा म्हणून जे खोटे मेसेजेस व्हॉट्सअॅपवर येतात, त्यांचा संदर्भ दिला जातो आणि त्यावर तावातावाने चर्चा होते, असंही कादंबरीकार काही प्रसंगांत दाखवून देतो. हे अत्यंत वास्तव असं चित्रण आहे.

वेगवेगळ्या लोकांच्या निवेदनांतून वा कथनांतून एकच घटना वारंवार समोर येत राहते, असंही घडतं. पण त्या प्रत्येक वेळी त्या घटनेचा वेगळाच पैलू उजागर होतो आणि तोवर माहीत असलेल्या घटनेचा संदर्भ बदलतो आणि त्यात गुंतलेल्या व्यक्तींची मानसिकता, स्वभाव यांची नव्याने ओळख होते.

कादंबरी काही मूलभूत प्रश्न उपस्थित करते. त्यातले महत्त्वाचे प्रश्न म्हणजे माणसाची मतं कशी तयार होतात? त्याच्या धारणा कशा आकार घेतात? रॅशनॅलिटी खरंच किती महत्त्वाची असते? मूल्यं कशी तयार होतात? आणि हिंदू कट्टरतावादी असणाऱ्या चिन्मयच्या जीवनात जो बदल घडतो आणि तो ज्यामुळे होतो, त्यावरून या सगळ्याचा मूळ आधार हा माणूस ज्या लोकेशनवर उभा आहे त्यावर असतो. त्यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात हे कादंबरीकार ठसठशीतपणे मांडतो.

कोविडच्या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या घटना या अनावश्यकरीत्या त्या काळात सामान्यांच्या झालेल्या दैन्यावस्थेचं वर्णन करत नाहीत, ही कादंबरीतील एक वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. सामान्य लेखकाने कोविडचा काळ कादंबरीच्या अवकाशात आणतोय तर गरज नसताना प्रशासनाची अरेरावी, अनागोंदी कारभार, आरोग्य व्यवस्थेचे अपुरेपण आणि त्यामुळे सामान्यांची झालेली फरफट या बाबी चित्रित केल्या असत्या. 'मनसमझावन'मध्ये असं घडत नाही. कोविडची परिस्थिती असल्यामुळे एका महत्त्वाच्या वळणावर कादंबरी येऊन ठेपते आणि कादंबरीकार त्या कथानकापुरताच तो काळ पार्श्वभूमीला ठेवतो. तो चुकूनही कादंबरीचा अक्ष कोविड काळावरील भाष्याकडे सरकवू देत नाही. कोविड काळ नेपथ्यस्थानी ठेवून कथानकातील काही भाग फार समर्थपणे साक्षात केला गेला आहे.

आपण जर डोळे उघडे ठेवून आणि कोणतेही पूर्वग्रह मनात न बाळगता ते मुक्त, स्वतंत्र ठेवून समाजात वावरत असू तर या कादंबरीतील बऱ्याचशा घटना या आपल्या आसपास घडत आहेत हे आपल्याला जाणवल्याशिवाय राहणार नाही, इतकी ही कादंबरी आजच्या काळाची आहे. आजच्या संभ्रमित करणाऱ्या, हिंसाचार आणि बनवेगिरी यांनी हतबल करून टाकणाऱ्या काळात या चक्रव्यूहसदृश परिस्थितीतून बाहेर पडायचं असल्यास कुठला मार्ग जवळ करावा लागेल, याचं अत्यंत सुस्पष्ट चित्र कादंबरीकार आपल्यासमोर प्रस्तुत करतो. या कादंबरीतील जमालुद्दीन मुलाणी हे पात्र दत्ता साठे याला असं म्हणतं की, सध्या जे काही पोलरायझेशन होतं आहे, त्याला खरा रेझिस्टन्स हिंदू-मुस्लीम यांच्या सामायिक सांस्कृतिक वारशातूनच करता येणार आहे. हे विधान या कादंबरीचा आत्मा आहे, असंही आपण म्हणू शकतो. आणि या विधानातून प्रतीत होणारा अर्थ हा येणाऱ्या काळात होणाऱ्या राजकीय-सांस्कृतिक लढ्याचा पाया असणार आहे. त्यामुळे ही कादंबरी सध्याच्या काळाचं संदर्भपुस्तक आहे, असं म्हटलं तर ते अतिशयोक्त विधान ठरणार नाही.

**उमा नाबर :** अगदी खरं. मी एका रात्रीत वाचली व खूप जणांना सांगितलं. मनाला भिडणारी, समकालीनाशी नाळ जोडलेली विचारार्ह उत्तम कादंबरी.

**प्रवीण बांदेकर :** अतिशय नेमकेपणानं कादंबरीचं अंतरंग उलगडवून दाखवलंयस, विकास. ही खरोखरच महत्त्वाची कादंबरी आहे या काळातली.

**निरुपमा शाह :** मला जरा पसरट वाटले.

**विकास पालवे :** काय? मी लिहिलेय ते की कादंबरी?

**निरुपमा शाह :** कादंबरी.

❑




**मनसमझावन**

**संग्राम गायकवाड**

**रोहन प्रकाशन**

**मूल्य : रु. ३७५**

वर्णमुद्रा

# वर्णमुद्रा (कोंकणी)


संपादक : शैलेंद्र मेहता

निर्मिती साहाय्य आणि वितरण : दिनेश मणेरकर

पहिला अंक : ऑगस्ट २०२४

नियतकाल : त्रैमासिक



| | | |
|---|---|---|
| संपादकीय संपर्क | : | शैलेंद्र मेहता, गोवा |
| | | संपर्क : ९८२०६५४२३३ |
| व्यवस्थापकीय संपर्क | : | दिनेश मणेरकर, गोवा |
| | | संपर्क : ९५५२५५१४२५ |



# वर्णमुद्रा

## वर्णमुद्राच्या आगामी अकरा पुस्तकांचे कवी लेखक

१) गणेश कनाटे

२) दिनकर मनवर

३) गजू तायडे

४) जी. के. ऐनापुरे

५) नितीन अरुण कुळकर्णी

६) शैलेंद्र मेहता

७) प्रकाश हरी कार्लेकर

८) जयश्री दाणी

९) श्याम माधव धोंड

१०) वसंत आबाजी डहाके : ‘वाचाभंग’ आणि ‘रूपांतर’ नव्या आवृत्त्या

## । वर्णमुद्रा पब्लिशर्स ।


**(वर्णमुद्राची अलीकडची प्रकाशित २५ पुस्तके)**

५६) रागविराग - वसंत केशव पाटील, ४५०/- , कविता
५७) दीर्घ - गणेश वामन कनाटे, ४४४/-, समीक्षा
५८) हद, तुळसी परब, ४५०/-, कविता
५९) बिलामत, दिनकर दाभाडे, ५५०/-, कादंबरी
६०) झुरळ आणि इतर काहीबाही, प्रमोदकुमार अणेराव, ३२४/-, कथासंग्रह
६१) अभिजात, शैलेंद्र मेहता, ५२५/-, निबंध
६२) जगणं वाचणं, डॉ. राजेंद्र मलोसे, ४४४/-, कादंबरी
६३) हजार रक्तवर्णी सूर्य, राही डहाके, २४२/-, कविता
६४) जगावेगळी जीवने, शिरीष चिंधडे, ३२४/-, निबंध
६५) केवळ काही वाक्यं, उदयन वाजपेयी, अनुवाद : प्रफुल्ल शिलेदार, ३०४/-, कविता
६६) तरंगत तरंगत जाऊ घरंगळत, हेमंत गोविंद जोगळेकर, २२४/- कविता
६७) अश्वत्थयुग्मांचे श्लोक, संतोष विठ्ठल घसिंग, ५७५/-, कविता
६८) दुराव्याची धूळ व्यापून, बाळकृष्ण सोनवणे, २५०/- कविता
६९) अपरंपारावरच्या कविता, रवींद्र लाखे, ३०४/-, कविता
७०) तत्त्वभान, श्रीनिवास हेमाडे, ६८०/-, निबंध
७१) गनिमी काव्याचे नमुने, विश्वास कणेकर, ३००/-, कविता
७२) पेसोआच्या कविता, महेश्वर लव्हेकर, ४२४/-, कविता
७३) वुहानचा वाफारा, विजय तांबे, ४२४/-, कथासंग्रह
७४) सृजनस्रोत, शिरीष चिंधडे, ४२४/-, ओळखपर लेख
७५) सगळेच पर्याय संपले आहेत, उषा हिंगोणेकर, ३७५/-, कविता
७६) काळोखाचा राजपुत्र, सुप्रिया आवारे, ३००/-, समीक्षा
७७) सायलेंट आणि इतर कविता, सागर अचलकर, १५०/-, कविता
७८) असीम प्रदेश, मुग्धा देशपांडे, १५०/-, कविता
७९) खट्टरकाकांचे विनोद-आख्यान, हरिमोहन झा, अनुवाद : वसंत पाटील, ४२४/-, लेख

---

**मुख्य वितरक :** वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स शेगाव, जिल्हा बुलढाणा मो. : ९९२३७२४५५०
**उपवितरक :** १) पुस्तकवाला ॲण्ड कंपनी, पुणे मो. : ८६२४९७७०२९
२) मैत्री पब्लिकेशन, पुणे मो. : ९६५७२४०८२४
३) वाल्डन बुक स्टोअर, पुणे मो. : ९७६६९७५१६५
४) बुककट्टा अमरावती, मो. : ८३७८८९५९१६
**मुख्य कार्यालय :** वर्णमुद्रा पब्लिशर्स, पृथक, रामकृष्ण नगर, शेगाव जिल्हा बुलडाणा ४४४ २०३
**E mail :** varnamudra.editors@gmail.com Website : www.varnamudra.com Mo. : 9923724550


# अलीकडे प्रकाशित झालेली पुस्तके




३००/– कविता




१५०/– कविता




१५०/– कविता




४२४/– लेख

वर्णमुद्रा इ–जर्नल मार्च–एप्रिल २०२४ हा अंक मालक, मुद्रक व प्रकाशक मनोज सुरेंद्र पाठक यांनी
वर्णमुद्राच्या वेबसाईटवर प्रकाशित केला असून, अंकाची मुद्रित प्रत
। पृथक । रामकृष्ण सोसायटी, एसबीआय कॉलनी, शेगाव, जिल्हा बुलढाणा – ४४४२०३ येथून केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली.
ईमेल : varnamudra.editors@gmail.com वेबसाईट : http://www.varnamudra.com/

मुख्य वितरक
वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, मोबाईल नंबर : ९९२३७२४५५०
वर्णमुद्राचे उप वितरक
पुस्तकवाला ॲण्ड कंपनी, पुणे मोबाईल नंबर : ८६२४९७७०२९
वाल्डन बुक स्टोअर, पुणे मोबाईल नंबर : ९७६६९७५१६५
मैत्री पब्लिकेशन, पुणे मोबाईल नंबर : ९६५७२४०८२४
बुककट्टा अमरावती, मोबाईल नंबर : ८३७८८९५९१६